# भारतीय महाविद्यालय, मोर्शी
# सांस्कृतिक विभाग
## वार्षिक अहवाल : २०१८-१९

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाअंतर्गत २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय शिक्षक दिन, मतदान जनजागृती प्रचार अभियान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजनही करण्यात आले होते.

नेहरू युवा केंद्र, अमरावती व भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कु.शुभांगी पोटपिटे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड व सहभाग नोंदविला. तसेच पंचायत समिती, मोर्शी आयोजित तालुकास्तरीय ''स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धे''मध्ये महाविद्यालयातील कु.शुभांगी खुजे हिने प्रथम क्रमांक, कु.स्वामिनी वरघट हिने द्वितीय तर अरुण पवार या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक प्राप्त केला व प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनी अमरावती येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदविला. तसेच वाटर फाऊंडेशन, मोर्शीच्या वतीने महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये एकुण ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेच्या उद्घाटनपर समारंभाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ. बिजवे उपस्थित होते तर मार्गदर्शक म्हणून श्रीकांत उमक व त्यांचे सहकारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

दि.२६ ते २९ सप्टेंबर २०१८ या कालावधीत श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथे संपन्न झालेल्या 'युथ फेस्टीवल-२०१८' मध्ये महाविद्यालयातील एकुण २७ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी स्कीट, माईम, लोकनृत्य व समूहगान आदी कलांप्रकारांमध्ये सहभागी होऊन उत्कृष्टपणे सादरीकरण केले.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुप्त कलागुणांच्या सादरीकरणासाठी हक्काचे मंच उपलब्ध व्हावे या हेतूने दि.२९ ते ३१ जानेवारी २०१९ या कालावधीत वार्षिक स्नेहसंमेलन 'सृजन-२०१९' चे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा, रांगोळी, पुष्प व डिश डेकोरेशन, आनंद बाजार, नृत्य, वादविवाद, एकांकिका

व सूरसंगम आदी स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन उत्कृष्ट कलागुणांचे प्रदर्शन घडविले. सदर स्नेहसंमेलन उद्घाटनपर समारंभाचे अध्यक्ष म्हणून मा.डॉ.रमेश भ. बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा.अनंतराव सोमवंशी, सरचिटणीस मा.डॉ.सतीश व्ही. कुलकर्णी, सचिव मा.श्री.सलिल चिंचमलातपुरे, माजी प्राचार्य जी.एस.मेश्राम तर उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक मा.डॉ.सतीश तराळ आदी मान्यवर उपस्थित होते. स्नेहसंमेलनाचे आयोजक प्राचार्य डॉ.सुरेश भ.बिजवे यांनी प्रास्ताविकपर मनोगतात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने सदर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असे म्हटले. याप्रसंगी विद्यापीठाच्या उन्हाळी-२०१८ या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचे स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम प्रदान करून गौरव करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून प्रा.डॉ.भगवान साबळे, डॉ.संदीप राऊत, प्रा.व्ही.व्ही.खांडेकर व डॉ.एल.आर.टेंभुर्णे कार्यरत आहे.

**प्रा.डॉ.भगवान जे.साबळे**
सांस्कृतिक विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

## भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# राष्ट्रीय सेवा योजना

### वार्षिक अहवाल : २०१८-१९

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने योग दिन, वृक्षारोपन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्षाबंधन निमित्याने मोर्शी येथील खुल्या कारागृहामध्ये बंधीजनांना रासेयो स्वयं सेवकांनी राख्याबांधून समाजहिताची जोपासना केली. याशिवाय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रासेयोच्यावतीने पर्यावरण जनजागृती, स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती रॅलींचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्र सेवादल यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकात्मता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जी.एस. मेश्राम तर प्रमूख अतिथी म्हणून राजाभाऊ महाजन (सदस्य, भारतीय विद्यामंदिर, अमरावती) अलाउद्दीन शेख (पुणे), मा.अमोल अराटे (पुणे), सौ. कुमुदिनी कोल्हे (अमरावती) आदि मान्यवर उपस्थित होते.

रासेयो स्वंयसेवकांनी विद्यापीठ तसेच राज्य स्तरावर आयोजित शिबीरामध्ये विशेष सहभाग नोंदविला. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय आव्हान २०१८ मध्ये चेतन वलिवकर, बी.कॉम. भाग १ व प्रणिता बोरवार (बी.ए. भाग१) सहभागी झाले होते. उद्योजक विकास कार्यशाळा अमरावती येथे कु. प्राजक्ता सिरसाट, कु. ममता युवनाते सहभागी झाल्या होत्या गणतंत्र दिन पथसंचलनकरिता पुणे येथे संपन्न झालेल्या चाचणीमध्ये कु. स्वामीनी ज्ञानेश्वर वरघट सहभागी झाली होती. शेडगांव येथे संपन्न झालेल्या विद्यापीठस्तरीय विशेष शिबिरामधे महाविद्यालयाचे २ मुले व ३ मुली असे ५ स्वंयसेवक सहभागी झाले होते. तसेच चिखलदरा येथे संपन्न होणाऱ्या राज्यस्तरीय ॲडव्हेंचर कॅम्पकरिता अमरदीप अमझरे सहभागी झाला होता.

रासेयो विभागाच्यावतीने स्वंयसेवकांमध्ये सामजिक दायित्वाची जाणीव व्हावी म्हणून केरळ पूर ग्रामस्थांसाठी मदत निधी रुपये ५०००/- जमा करण्यात आला. म. गांधीच्या १५० व्या जयंती निमित्ताने महाविद्यालयात 'गांधी समजून घेताना' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दि.२ ऑक्टोबरला स्वंयसेवकांनी गांधीजयंती निमित्ताने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच म.गांधी पुतळा पाण्याने धुवून स्वच्छ करण्यात आला व तेथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्रत्येक रविवारी महाविद्यालय, बसस्थानक

उपनिबंधक कार्यालय, विविध सार्वजनिक स्थळे तसेच चर्च व मस्जिद स्थळे आदि ठिकाणी स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

रासेयो स्वंयसेवकांनी केलेल्या चांगल्या कामाची दखल घेत उन्नत भारत अभियानासाठी विद्यापिठातून निवडलेले ५ महाविद्यालय भारतीय महाविद्यालयापैकी मोर्शी या महाविद्यालयातील रासेयो पथकाची निवड करून त्याअंतर्गत दत्तक ग्राम लाडकीची निवड झाली आहे. उन्नत भारत अभियान कार्यक्रमाचे उद्घाटन लाडकी येथे दि. १० डिसेंबर २०१८ ला संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय विद्यामंदीर संस्थेचे अध्यक्ष सन्माननिय प्रा.डॉ. रमेश बिजवे, उद्घाटक म्हणून डॉ. डि.टी इंगोले तसेच प्रमूख अतिथी म्हणून मा. श्री. अनंतराव सोमवंशी, उपाध्यक्ष भारतीय विद्यामंदिर अमरावती, श्री. सलिल चिचमलातपुरे, सचिव, भारतीय विद्यामंदिर, अमरावती, ॲड.श्री.यदुराज मेटकर, सदस्य भारतीय विद्यामंदिर अमरावती आदि मान्यवर उपस्थित होते. तसेट महाविद्यलयाचे प्राचार्य श्री.डॉ. सुरेश बिजवे व माजी प्राचार्य श्री.जी.एस. मेश्राम उपस्थित होते.

दि. ११/१/२०१८ ते १७/१/२०१९ दरम्यान दत्तकग्राम लाडकी येथे विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटक मा. सुखदेवराव राऊत, सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती भा.म.वि., मोर्शी यांच्या हस्ते संपन्न झाले. शिबिरामध्ये १२० स्वंयसेवक सहभागी झाले होते. या शिबिराअंतर्गत ४ शोषखड्डे, भूमिगत बंधारा, ग्रामसफाई, बौध्दिक व्याख्याने व मनोरंजनातून समाज प्रबोधन रॅलीच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्यात आले होते. शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमास मा. अंनतराव सोमवंशी, उपाध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर अमरावती, सुखदेव राऊत, डॉ. बी.एस. चंदनकर, श्री. जी.एस. मेश्राम, प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे आदि मान्यवर उपस्थित होते.

पाणी ही ज्वलंत समस्या लक्षात घेता पाणी फाऊंडेशन द्वारा आयोजित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यलायाचे प्राचार्य डॉ. जी.एस. मेश्राम तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीकांत उमक उपस्थित होते.

रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. संदीप राऊत, महीला कार्यक्रम अधिकारी डॉ. जे.एल. रामटेके, सहा. कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. सावन देशमुख कार्यकरीत आहेत.

**प्रा.डॉ.संदीप राऊत**
रासेयो विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# इंग्रजी विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

महाविद्यालयातील इंग्रजी विभागा अंतर्गत इंग्रजी अभ्यास मंडळ गठीत करण्यात आले. त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक फंक्शन लॅब उपलब्ध आहे. बी.ए. व बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.सुरेश भ.बिजवे यांचे आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये शोधनिबंध प्रकाशित झालेले असून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चामध्ये सहभागी झाले होते.

**प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे**

इंग्रजी विभाग प्रमुख

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

---

# मराठी विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

महाविद्यालयातील मराठी विभागाअंतर्गत 'मराठी अभ्यास' मंडळ स्थापन करुन त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आयोजित कवी केशवसुत काव्य स्पर्धेमध्ये कु.श्रृती महल्ले व कु. तृप्ती चौधरी या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. दि. १ ते १५ जानेवारी २०१९ या कालावधीत ''मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'' साजरा करण्यात आला. त्याअंतर्गत काव्यसंमेलन, निबंध व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. काव्यसंमेलन स्पर्धेत चेतन वानखडे याने प्रथम क्रमांक, कु. शुभांगी खुजे हिने द्वितीय क्रमांक तर कु. श्रृती महल्ले हिने प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त केले. निबंध स्पर्धेत कु. दामिनी वानखडे हिने प्रथम तर कु.निकिता घोरमाडे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच सुंदर हस्ताक्षर स्पर्धेमध्ये राहुल कुरवाडे ह्याने प्रथम क्रमांक तर कु. मनिषा राऊत हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. सदर विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर ग्रंथ भेट व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तर या स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मराठी विभाग प्रमुख म्हणून प्रा.डॉ. भगवान साबळे कार्यरत आहे.

**प्रा.डॉ. बी.जे.साबळे**

मराठी विभाग प्रमुख

ॅभारतीय महाविद्यालय, मोर्शी

# इतिहास विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

इतिहास विभागाच्या वतीने इतिहास अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन व त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले महात्मा गांधीजी यांच्या १५० जयंती निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय बी.ए. व एम.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे उन्हाळी परीक्षा २०१८, एम.ए. (द्वितीय) या परीक्षामध्ये कु. पूजा प्रदिपराव राऊत ह्या विद्यार्थिनीने सं.गा.बा. अमरावती विद्यापीठामधून ८ वी मेरीट म्हणून प्राविण्य प्राप्त केले. ही इतिहास विभाग, महाविद्यालय व संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. संदिप राऊत यांनी स्व. बबनराव मेटकर स्मृती प्रित्यर्थ विचार प्रबोधनमालेअंतर्गत मोर्शी तालुक्यातील २१ शाळा व ३० गांवामध्ये 'संत गाडगे बाबा यांची समाजबोध चळवळ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

**प्रा.डॉ.एस.एम.राऊत**
इतिहास विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

---

# राज्यशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१६-१७**

४८ वा संसदीय अभ्यासवर्ग राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शासनातर्फे संपन्न झालेल्या 'संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा' या अभ्यासवर्गाकरिता दि. ५ जुलै २०१८ ते १२ जुलै २०१८ या कालावधीत नागपूर येथे भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील राज्यशास्त्र विभागाची विद्यार्थीनी कु. राणी गणेशराव बिलोनकर सहभागी झाली होती.

दि.२६ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ११ वाजता राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'मतदार जागृती' कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी मनोहररावजी कडू, उपविभागीय अधिकारी,मोर्शी उपस्थित होते. तर दि.२६ नोव्हेंबर २०१८ रोजी राज्यशास्त्र विभागच्या वतीने पंचायत समितीला विद्यार्थ्यांची भेट देण्यात आली.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून डॉ. रजनिश बांबोळे कार्यरत आहे.

**प्रा.डॉ.आर.जी.बांबोळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# भूगोल विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८–१९**

भूगोल विभागाअंतर्गत 'विदर्भ क्रिडा मंडळा'च्या माध्यमातून मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ३ विद्यार्थी सहभागी झाले. शिवाय भूगोल विभागातील २२ विद्यार्थ्यांनी सलग ३७ तास मेळघाट व्याघ्र प्रकल्पात 'मानव वन्यजीव संघर्ष समिती' सदस्य म्हणून कार्य केले तर दोन विद्यार्थ्यांनी 'बिबट शिकार' प्रकरणात शासकीय पंच म्हणून शहापूर येथे कार्य केले. पर्यावरण संतूलन राहावे म्हणून दसऱ्याला आपट्यांची झाडांची होणारी तोड थांबवावी म्हणून एकूण ४० विद्यार्थ्यांचा 'पोहरा' जंगलात गस्तीवर होते. भूगोल विभागाची शैक्षणिक सहल सालबर्डी येथे आयोजित करण्यात आली होती यात एकूण ७० विद्यार्थी सहभागी झाले होते.

भूगोल विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. सावन देशमुख यांची निवड भूगोल मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत 'कॉफी टेबल बुक' मध्ये 'नॉलेज पॉटर्नर' म्हणून निवड झाली. शिवाय या पुस्तकात त्यांनी स्वत: चित्रीत केलेले १५७ छायाचित्र प्रकाशित झाले. तसेच त्यांची अमरावती जिल्हा प्राणी समितीवर सदस्य म्हणून तर अमरावती जिल्हा जैवविविधता समितीमध्ये अध्यक्ष म्हणून निवड झाली. विद्यापीठाच्या 'तलवारबाजी चमु नियुक्ती समितीच्या अध्यक्षस्थानी निवड झाली. बालभारती महाराष्ट्र शासन च्या नविन अभ्यासक्रमाच्या भूगोल अभ्यास समिती सदस्य नियुक्ती झाली असून इयता ८ वी १० वीच्या स्टेट बोर्डाच्या पुस्तकांमध्ये लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

**प्रा.डॉ.एस.एम.देशमुख**
भूगोल विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८–१९**

महाविद्यालयातील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाअंतर्गत 'वाणिज्य अभ्यास मंडळ' गठीत करण्यात आले व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान, 'उद्योगजगत क्षेत्रातील आवाहाने' या विषयावर कार्यशाळेचे तसेच शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून प्रा.डॉ. जे.एल. रामटेके तसेच प्रा. व्ही. व्ही. खांडेकर व प्रा. डि.एन. काळे कार्यरत आहे तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून प्रा. डॉ. एल.आर. टेंभुर्णे म्हणून कार्यरत आहेत.

**प्रा.डॉ.जे.एल.रामटेके**
वाणिज्य विभाग प्रमुख
**प्रा.डॉ. एल.आर.टेंभुर्णे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# गृहअर्थशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल : २०१८-१९

**सर्वांगीण विकासासाठी गृहअर्थशास्त्र आवश्यक...**

गृहअर्थशास्त्र विषय हा सर्वच विषयांशी निगडीत असलेला विषय आहे. यात राज्यशास्त्र , समाजशास्त्र, मानवविकास, विस्तार शिक्षण, कुंटुब आणि कौटुंबिक संबंध, बालमानसशास्त्र, गृहसजावट, वस्त्रशास्त्र, आहार विज्ञान, अर्थशास्त्र, ग्राहक उपभोक्ता, नागरिकशास्त्र अशा सर्वच शाखांचा अभ्यास केला जातो. प्रत्येक गोष्टींचे अथवा वस्तूंचे शास्त्रोक्त ज्ञान दिल्या जाते.

गृहअर्थशास्त्र हा जीवनाशी सांगड घालणारा उपयोजनशिल विषय आहे. त्यामुळे मानवाच्या गरजांची पूर्ती करण्याची क्षमता या विषयात आहे २१ व्या शतकात स्त्रियांनी विकासाच्या दिशेने भरारी घेतली कारण पुरुषांप्रमाणे तिला विकासाची संधी मिळाली आहे. परंतु वाढत्या बेरोजगारीच्या काळात स्थायी स्वरुपाची नोकरी मिळणे कठीण झाले यातून पर्यायी मार्ग तसेच अर्थाजनाच्या वाटा तिला या विषयाने दाखविल्या आहेत.

शिक्षणातून व्यक्तीमत्व आणि उत्पादकत्व यांचा विकास झाला पाहिजे. कुं टुंब चालविण्यासाठी आपली भागीदारी समर्थपणे पेलण्याची ताकद तिला गृहअर्थशास्त्र या विषयातून मिळते.

गृहअर्थशास्त्र विषयाची विद्यार्थीनीनी ही आहार तज्ज्ञ म्हणून कार्य करु शकते. ती घरगुती अन्न उद्योग उत्तम प्रकारे चालवू शकते. यात खाद्यपदार्थ तयार करुन विकणे, डबाबंद पदार्थ तयार करणे, आहारोपचार पुरविणे, खाजगी प्रबोधन वर्ग चालविणे तसेच वस्त्रउद्योग यात ती रेडीमेड कपड्यांचे उत्पादन करणे, भरतकाम करणे, फॅशन डिझानर, वस्त्र छपाई या सर्वांचे ती उत्तम प्रकारे व्यवस्थापन करण्यात सक्षम आहे.

गृहअर्थशास्त्र विषयाअतंर्गत पाळणाघर चालविणे, बालवाडी सुरु करणे, तसेच बाल समस्या सोडविण्यासाठी पालंकासाठी सल्ला केंद्र (चाईल्ड कॉऊंसिलींग सेंटर) सुरु करता येईल.

महिलांचा विकास आणि कल्याण करणारच्या दृष्टीने त्यांना आर्थिक स्थैर्य मिळणे आणि राष्ट्राच्या विकास प्रवाहात त्यांना सामिल करुन घेणे, त्यांच्या हक्कांची जाणिव, संरक्षण आणि समानता असे उद्दीष्टे गृहअर्थशास्त्र विषयामध्ये सामावलेली आहे. देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात स्त्रियांचे योगदान लाभावे, महिलांचे शोषण थांबविण्यासाठी तिचे आर्थिक आणि सर्वांगिण सबलीकरण व्हावे, तिला नव्या जाणिवांचा, तंत्रज्ञानाचा परिचय व्हावा. स्त्रियांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी आणि स्व-जाणीव, आत्मविश्वास, तिच्या मधील सुप्त गुणांचा विकास व्हावा यासाठी सर्व विषयासोबत गृहअर्थशास्त्र विषय हा अतिशय महत्वाचा आहे.

**प्रा.अश्विनी हुड**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

**''मनशांतीसाठी नेहमी ग्रंथ वाचा जीवनात ते धैर्य व आधार देतात.''**

ग्रंथ हे पंख असतात ते उंच भरारी घेण्याची शक्ती देतात, म्हणून ग्रंथाचे वाचन करणे आवश्यक आहे. त्यामुळे आपले मन शांत आणि निर्मळ राहते. कोणत्याही महाविद्यालयाचा आत्मा म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालय जेवढे चैतन्यशिल तेवढे महाविद्यालय तेजस्वी असते. प्राध्यापक तथा विद्यार्थ्यांना ज्ञान स्त्रोत निर्माण करुन देण्याकरिता अत्याधुनिक सुविधा पुरविण्याचे कार्य महाविद्यालयाचे ग्रंथालय करीत आहे. वाचकांची मागणी पूर्ण करता यावी व ग्रंथालयाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा याकरिता अहवाल काळात अनेक उपक्रम राबविण्यात आले. एकंदरीत वाचकांचा आनंद, समाधान व त्यातच आनंद माणून महाविद्यालयाचे ग्रंथालय वाटचाल करीत आहे. वाचकांना त्वरीत व अद्यावत सेवा देता यावी याकरिता ग्रंथालयाचे संगणकीरण करण्यात आलेले आहे. ग्रंथालयाचा ओ पॅक ॲप असून त्यामध्ये ग्रंथ शोधणे सोपे झाले आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांकडून डाऊनलोडही करण्यात आलेला आहे. ग्रंथालयाचे फेसबुक पेज असून त्यावर विविध उपक्रमाचे फोटो प्रसारित केल्या जातात. दरवर्षी स्मृतीशेष विश्वास पाझारे स्मृतिप्रित्यर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उत्कृष्ट वाचक पुरस्कार देण्यात येत आहे. आतापर्यंत ८ विद्यार्थ्यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे. तर यावर्षी विजय बोरकर या विद्यार्थ्याला सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोबतच ग्रंथालयात मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांला ग्रंथालय सपोर्ट अवार्ड देण्याचे ठरविले आहे. याच विद्यार्थ्यांच्या मदतीमुळे सेमिस्टर तीन व चार ची पुस्तके लवकर वाचायला मिळाली. दि. १० ऑगस्ट २०१८ ला ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन जयंती साजरी करण्यात आली. दि. १५ ऑक्टोबर २०१८ ला भारतरत्न ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. संदीप राऊत यांचे 'वाचन संस्कार काळाची गरज' यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याशिवाय ग्रंथालय उदबोधन वर्ग, एमओपॅक, अवरनेस प्रोग्राम आणि शनिवारला सेल्फ वर्क ॲक्टीव्हीटी ग्रंथालयात घेतली जाते. यावर्षी दिड लाख किमंतीची ७०६ पुस्तके खरेदी करण्यात आली. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परिक्षेचे पुस्तके व मासिके, व्यक्तिमत्व विकासाची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध करुन दिली जातात. एंकदरीत असे म्हटले जाते.

*ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती*
*ग्रंथ उजळती, अज्ञानाच्या अंधाराच्या राती*

या अज्ञानाच्या अंधारयुग नष्ट होवून ग्रंथाच्या वाचनातून विद्यार्थ्यांच्या जिवनात नव प्रकाश येण्याकरिता आपल्या महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. अरविंद एस. पाझारे प्रयत्न करीत असतात.

**प्रा. ए.एस.पाझारे**
ग्रंथालय विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# शारीरिक शिक्षण विभाग

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

सत्र २०१८-१९ दरम्यान महाविद्यालयाच्या विविध क्रीडा संघांनी आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेतला. यामध्ये कबड्डी , व्हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, योगा व बेसबॉल चा समावेश आहे.

महाविद्यालयातील कु. प्रगती ओंकारराव वानखडे हिची स.गा.बा. अ. विद्यापीठाच्या 'योग' संघात निवड झाली तसेच यासिन सौदागर याची 'बेसबॉल' संघात निवड झाली.

त्याचप्रमाणे शा.शि. संचालक डॉ. एस.व्ही. टोपरे यांची संगाबा अमरावती विद्यापीठाच्या जलतरण संघाचे व्यवस्थापक म्हणून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता नियुक्ती करण्यात आली होती. या संघाने आंतरविद्यापीठ स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त केले. महाविद्यालयाच्या शा. शिक्षण विभागातर्फे विद्यापीठस्तरीय 'ॲकेडमी परफॉर्मन्स इंडीकेटर फॉर फिजीकल एज्युकेशन डायरेक्टर' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. ज्यामध्ये विविध महाविद्यालयाच्या एकुण ८३ शा. शि. संचालकांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय परीषदेमध्ये चेअरपर्सन म्हणून सहभाग तसेच आंतरराष्ट्रीय परीषदेत शोधनिबंध सादरीकरण.


**प्रा. डॉ.एस.व्ही.टोपरे**

शारीरिक शिक्षण संचालक

भारतीय महाविद्यालय, मोर्शी


---

# विज्ञान शाखा

**वार्षिक अहवाल : २०१८-१९**

महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या वतीने विज्ञान अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले व त्या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बी.एस्सी.भाग-१ च्या विद्यार्थ्यांकरिता वेलकम प्रोगामचे आयोजन करण्यात आले होते. तसेच तज्ज्ञ विचारवंतांचे व्याख्यान, शैक्षणिक सहल, निरोप समारंभ आदि उपक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकरिता जीवशास्त्र, रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र आदि विषयांच्या अद्यावत व सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध आहे. तसेच विषयनिहाय विद्यार्थ्यांकरिता चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.


**प्रा. लांडगे मॅडम**

विज्ञान शाखा

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# मराठी
# व
# हिन्दी
# विभाग


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**कु. नम्रता नंदकिशोर खोडे,** बी.ए. भाग ३

अमरावती जवळची 'यावली' ही वंदनीय राष्ट्रसंतांची जन्मभुमी होय. श्री. खंडोजी अर्थात नामदेव गणेशपंत इंगळे हे त्यांचे वडील व आई मंजुळादेवी ही वरखेडच्या तुकारामबुवा वानखेडेची कन्या. स्वाभिमानी पिता शिवणकाम करीत तर ती भक्तीमती माता दळणकांडण करी. गुरुकृपेने या अशिक्षित दांपत्याचे चंद्रमौळी झोपडीत दिनांक ३० एप्रिल १९०९रोजी या एकुलत्या सुपूत्राचा जन्म प्रचंड वादळातच झाला. अकोटचे ब्रम्हनिष्ठ हरिबुवा आणि माधानचे अलौकीक संत श्री गुलाबराव महाराज यांनी स्वत: नामकरण विधी संपन्न केला.

माणिकदेव या जन्म नावाऐवजी गुरु आडकोजी महाराज यांनी दिलेले 'तुकड्या' नावच प्रचारात आले. पूर्वज दत्तभक्त नि विठ्ठलभक्त पण मातापित्याचे स्वभाव नावाप्रमाणे विषम नि गृहदशा अतीव खडतर या वातावरणात अनेक कष्ट सोशित माणिकदेव चिंतनशील पण हुड बनला. शाळेत घातले तरी 'शाळा कोण करी जावे नदिचीया तिरी' असा प्रकार पण परिक्षेत मात्र पास ! एकांती ध्यान, अन् लोकांमध्ये कीर्तन हा त्यांचा बालछंद ! पोहणं, अश्वरोहन, कुस्त्या आदि नव्या कला निर्भयतेने तो आत्मसात करी. चांदुरबाजारच्या विमलानंद भारतीकडून छंदगायन, यावलीच्या कोतळीकर महाराजाकडून योगासन व एकवारी आदि गोष्टी त्यांनी सहज अवगत केल्या.

बालपणीच मातेबरोबर गृहत्याग करण्याची पाळी आली आणि वरखेडक्षेत्री नाथपंथी विदेही संत श्री आडकोजी महाराजांच्या सहवासात त्यांच अंतरंग फुललं. गुरु आज्ञेन तो स्वकाव्य गावू लागला. १९२१ झाली शतायुषी आडकोजी महाराज समाधिस्थ झाले तेव्हा माणिकदेवाला विशेष प्रसाद लाभला. गुरुविरह असह्य होवूनही मातेला दिलेल्या वचनासाठी त्यानं प्राथमिक शिक्षण पूर्ण केलं. मग व्याकुळमनानं विनातिकीट धक्के खात पंढरपूर गाठले. तिथल्या पुंडलिकाच्या आदर्शात त्याला मातृपितृसेवेचा पाठ दिला आणि यावलीस येवून शिवनकाम करीत त्यानं मातेचा सांभाळ केला. ईश्वरदर्शनातून प्रबळ होवून १९२५ मध्ये त्यान विरक्त वृत्तीनं शिवणयंत्र विकून दानधर्म केला.



आदिवासी समाजात देवबाबा म्हणून त्यांनी कार्यधूनी पेटविली. नेरीच्या फकीरांना तंत्रमंत्रादी साधनाचा फोलपणा पटविला. भावळ्या लोकांनी त्यांना विष दिल, पण याचवेळी चिमुरला 'माणिक प्रासादिक बालसमाज' जन्मास आला. १९२९ साली महाराजांची पहिली हिंदी भजनावली प्रसिध्द झाली.

काशी, प्रयाग, ओंकारेश्वर, हरिद्वार, पशुपतीनाथ (नेपाळ)आदि दुरस्थ व अनेक निकटस्थ तीर्थक्षेत्र पाहून तसेच लष्करी बाबा, वशिष्ठ महाराज, दादाजी धुनिवाले आदि अनेक संताच्या भेटी घेवून महाराजांनी प्रारंभीच समाज निरिक्षण केलं.

कॅन्सरसारख्या भयानक रोगाकरिता नागपूर येथे मध्यवर्ती ठिकाणी हॉस्पिटल निर्माण करण्यास कार्यकर्त्यांना प्रवृत्त केले.

अशा या महामानवांनी अखेरची मंत्रीपरिषद ती सर्वधर्मिय प्रार्थना घेवून महाराजांनी दिनांक ११ ऑक्टोबर १९६८ रोजी दुपारी देह ठेविला.

❑ ❑ ❑

# माझा जीवन प्रवास

**कु. मनिषा बाळकृष्णराव राऊत,** बी.कॉम भाग २

''जिच्या उद्‌रात जन्म होतो ती माता
आणि जिच्या उदरात अस्त होतो माती''
यातील वेलांटीचा फरक
म्हणजेच माणसाचे जीवन ......
बघायला गेलं तर आयुष्य हे खुप सोपं असतं
जगायला गेलं तर दुःखातही सुख असतं
चालायला गेलं तर निखारेही फुलं होतात
तोंड देता आले तर, संकटही क्षुल्लक असतं
वाटायला गेलं तर अश्रुतही समाधान असतं
पचवायला गेलं तर अपयशही सोपं असत
हसायला गेलं तर रडणेही आपलं असतं
बघायला गेलं तर, आयुष्यही खुप सोपं असतं
येतांना एकटे असलो तरी, सर्वांचे होऊन जाण्यात मजा आहे.
आपलं नशिब कोणी दूसरं लिहीतं नसतं
येताना काही आणायचं नसतं, जाताना काही न्यायच नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं
या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी जन्मायचं असतं...!

प्रत्येकाला जीवनात लहान–मोठ्या अडचणीना सामारे जावे लागते. प्रत्येकाच्या जीवनात दुःख, आनंद, वेदना, काळजी येतच असतात. पण त्यांना सामोरे जावून जीवन जगायचे असते. असाचं माझा जीवन प्रवास चालू आहेत. कधी लहान तर कधी मोठी अडचण दुर करुन जीवन जगणे यातच खरा अर्थ आहे परंतु जीवन जगताना कोणता ना कोणता हेतू, उद्दिष्ट घेवुन चालणे म्हणजे जीवन होय. जीवनात आपल्याला आई–वडील, बहीण–भाऊ यांची साथ हवी असते. त्याच्या मदतीशिवाय आपण पुढे चालू शकणार नाही कारण शेवटी कुटुंबीयांसाठी आपणं जीवन जगत असतो.

शिक्षण शिकत असतांना शिक्षक–शिक्षिका, आदरनीय व्यक्ती यांची आपल्याला गरज असते. तर कधी मैत्रिणीची गरज भासते. आपल्या मैत्रिणी आपल्याला कोणत्याही वेळी कोणत्याही संकटात मदत करतात. त्या कोणत्याही बाबतीत मदतीचा हात देतात. जसा मित्र तशी मैत्री. माझी मैत्री सुध्दा अशीच आहे म्हणूनच म्हणतात की, जीवन जगतांना संगत खूप महत्त्वाची आहे. चांगल्या मैत्रिणी या त्या चांदण्या प्रमाणे असतात ज्या भले ही उजेडात दिसत नाही परंतु त्या कधीही सोबत राहतात, प्रत्येकाचे, तुमचे, आमचे जीवन असे चढउतारांनी भरलेले असते. त्यांच्याशी स्पर्धा करणे, अपयश मिळाले तर पुन्हा प्रयत्न करुन यशाच्या मार्गावर पोहचणे हेच आपले ध्येय आहे.

'जीवनाच्या वाटेवरती येतील अनेक अडथळे पण मराठी माणूस प्रयत्नाने दूर करेल हे अडथळे.'

****

माणसाने सुखाने आयुष्य जगावं, काल आपल्याबरोबर काय घडल याचा विचार करण्यापेक्षा उदया आपल्याला काय घडवायचं आहे याचा विचार करा कारण आपण फक्त गेलेले दिवस मोजण्यासाठी नाही तर आलेले दिवस आनंदाने घालवायला जन्माला आलोय.म्हणूनच आनंदाने जगावे यातच जीवनाचा खरा सार्थ आहे.

❑ ❑ ❑

# गाडगेबाबांच्या किर्तनातील तत्त्वज्ञान

**कु. प्रणल प्रमोदराव निभोंरकर,** बी.ए. भाग ३

एक थोर आधुनिक मराठी संत व समाज सुधारक, फाटक्या गोधडीचा वेश आणि हातातील गाडगे यावरून 'गाडगे महाराज' हे नामाभिधान. समाजसुधारणा व लोक शिक्षण या उद्दिष्टपूर्तीसाठी कीर्तन संस्थेचा प्रभावी वापर. जातीभेद, अंधश्रध्दा, दृष्ट रुढी , अनिष्ट चालीरीती आणि अज्ञान दूर करण्याकरीता समाज मन जागृत केले. व्यक्तीहित, समाजहित विरोधी भ्रामक कल्पना व भावना यावर कठोर तर्कशुध्द आणि औपरोधिक प्रहार करुन एकजिनसी आणि सामर्थ्यसंपन्न समाजनिर्मितीकरिता अथक प्रयत्न. पंढरपूर, आळंदी इत्यादी अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी यात्रेकरुंच्या सोयीसाठी धर्मशाळांची उभारणी केली. देवाच्या नावावर चालणारी अनेक ठिकाणची पशुहत्या बंद केली. देवा-धर्मासंबंधीच्या खुळ्या समजुतीचे उच्चाटन आणि खऱ्या मानवधर्माचा प्रचार केला. तुकाराम महाराज सत्पुरुष जगाले उपदेश करतात, चार वेद केले ब्रह्मदेवाने, पाचव्या वेदानी वानी केली तुकोबारायानं. ते महान पुरुष जगाले उपदेश करतात की, माणसाच्या जन्मात आल्यावर आपण काय करावं. पैसा कमावाव का बायकापोरं पोसूनच मरावं, का सग्यासोयऱ्यांचा, गणगोताचा मेळ करुन ह्याच्यातच आयुष्य घालवावं. तरी माणसाच्या जन्मात येवून जो मनुष्य देवाचं भजन करील तुकोबाराया म्हणतात, तो देव होईल. तुकोबाराय स्वत:चा पुरावा देत म्हणत की,

'देव पाहावयासी गे ऽ लो ऽ अन् तेथे देव होवोनी ढेलो' तुकाराम महाराज म्हणतात, मी शेतकरी, शेतकऱ्याचा मुलगा मले ईश्वराच्या भक्तीचं काय ज्ञान. संताचे पुरावे ऐकून भक्तीमार्गाले लागलो. देव कसा असेल? देव नाही दिसला, तुकाराम म्हणतात मीच देव झालो.



आणखीन एक पुरावा आहे कोणी. देव देव म्हणून मनात कल्पना आनत असतील. देव कसा असील? देव कधी भेटील? देव कधी पाहू? अशा ज्या मानसाच्या मनात कल्पना असतील तो माणूस भार्मिष्ट आहे. मात्र त्याच भजन केल्यानं मनुष्य देव होते. माणूस बायकोशी बोलते, पोरीशी बोलते, पोराशी बोलते, मित्राशी बोलते, भांडण करुन शिव्या देते, पण त्याले भजन करायची लाज वाटते ज्या माणसाले भजन करायची लाज वाटते तो माणूसच नाही.

''गोपाला गोपाला ! देवकीनंदन गोपाला'' देव कसा आहे जसं वारं ज्ञानेश्वरीत एक पुरावा आहे

*''वायु वसे सकाळ ठायी ।*
*परी त्याचे बिऱ्हाडचि नाही।।''*
*'देव देव करता शिनले माझे मन'*

देव देव म्हणून तुकोबा म्हणतात, मी खूप फिरलो, मेले शीन आला पण देव नाही दिसला मग दिसलं काय पानी आणि पाषाण जेथे... तेथे ।

*''जत्रा में फत्रा बिढाया तीरथ बनाया पानी।*
*दुनिया भाई दिवानी पैसे की धुलधानी।।''*

तिर्थाले जान देवाचा संबंध नाही. पैशाचा नाश, खाना खराब आहे. 'गोपाला गोपाला। देवकीनंदन गोपाला ।।'

तुकोबा म्हणतात,

*''दगडाचा देव बोलील तो कैसा ।*
*कवन काली वाचा फुटिल.. त्यासी।।''*

वर हात केल्यानं देवाची भक्ती नाही मंग वर हात का करावा तर मानसाच्या अंगात अभिमान आहे जो-तो माणूस कुठीही जाईल तो आपल्या दिमाखातच त्याले वाटते पण मले मरण ही येणार नाही, रोग ही होणार नाही.

*''ज्याचा अभिमान... गेला।*
*अन् तुका म्हणे देव.... झाला ।।''*

गरीब माणूस मोठ्या माणसाले प्रणाम करते भाऊसाहेब! कसा करते वाकून भाऊसाहेब! पण भाऊसाहेबाले नाही वाकता येत. ते भाऊसाहेब म्हणतात, की ए आज गडबड आहे, कल देखेंगे।

*ज्याचा अभिमान गेला। अन –तुका म्हणे देव... झाला ।।*

देव पहिला नाही, देव दिसला नाही अन् देव कोणाले दिसणार नाही. कोण म्हणे राती स्वप्नात परमात्मा दिसले. शंख, चक्र, गदा सर्व साहित्य सामाईन घेऊन। परमात्मा नाही दिसला।।

*जे जे मनी वसे ते ते... स्वप्नी दिसे ।।*

मग जे पाहिले नाही ते दिसतच नाही. मंग जो फोटो पाहातो तो फोटोतलाच देव दिसतो. देव नाही दिसत देव दिसायची वस्तूच नाही मंग तीर्थात देव नाही. आता आपण गणपती मांडला की नाही? होय, हे गणपतीची गणपती बसोन देवाची भक्ती नाही एक रुढी पडली काय पडली मोरया मोरया मोरया ....।

*''नही मेहजिंद में नही देवलमे हिरा खोया कचरे मे।''*

*''सूरत से किरत बडी बिनपंख उड जाय।*

*सूरती तो जाती रही किरत कबू ना जाय।।''*

तुकाराम महाराजानी उपरोक्त दाखले देत किर्तनातून लोकांमध्ये वैचारिक परिवर्तन घडवून आणले. हेच त्यांच्या किर्तनाचे साधे–सोपे तत्त्वज्ञान होय.

❑ ❑ ❑

# सुविचार

१) देवाकडे काही मागायचे असेल तर नेहमी आई–वडिलांचे स्वप्न पूर्ण व्हावे, हा आशिर्वाद मागा तुम्हाला कधी स्वत:साठी काही मागायची गरज पडणार नाही.

२) ज्या लोकांनी तुम्हाला निराश केले त्यासाठी त्यांना दोष देवु नका, स्वत:ला दोष द्या कारण तुम्ही त्यांच्याकडून जास्त अपेक्षा ठेवल्यात.

३) तुमच्याकडे इच्छाशक्ती असेल ना तर कुणाचा बाप तुम्हाला यशस्वी होण्यापासून रोखू शकत नाही.

४) पराभवाची लाज वाटू देवू नका, लाज वाटायला पाहीजे ती प्रयत्न न करण्याची.

५) एकटाच पडलोय पण हार नाही मानणार, एकटाच लढणार आणि शेवट पर्यंत लढणार.

६) सुंगध हा फक्त फुलांनाच नसतो तर तो माणसाच्या शब्दालाही असतो .

७) प्रभाव दमदार असण्यापेक्षा स्वभाव दिलदार असावा.

८) निराश केले तरी चालेल पण खोट्या आशा दाखवू नयेत.

९) आपण जे देतो ते आपल्याकडं परत येत. त्यामुळे चागंल द्या चागलंच मिळेल.

१०) माणूस किती जगतो यापेक्षा तो कसा जगतो यालाच महत्त्व आहे.

११) माणूस परिस्थितीचा गुलाम नसून त्याच्याच गुलामांचा विचार असतो.

१२) संकट तुमच्यातील शक्ती आणि जिद्द पाहण्यासाठीच येतात.

१३) तुम्हाला दुखावणारी प्रत्येक परिस्थिती तुम्हाला काहीतरी शिकवून जात असते

१४) दुसऱ्याला सुधारण्यापेक्षा स्वत:ला सुधारणे खूप सोपे असते.

१५) जर तुम्ही पाहीलेले स्वप्न पूर्ण नसतील होत तर तुमच्या कामाची पध्दत बदला, तुमचे तत्त्व नाही कारण झाड नेहमी आपली पान बदलतात मुळ नाही.

१५) हिम्मत नाही तर प्रतिष्ठा नाही आणि विरोधक नाही तर प्रगती नाही.

१७) शब्द कितीही काळजीपूर्वक वापरले तरी, ऐकणारा आपल्या सोयीप्रमाणे अर्थ लावत असतो.

१८) आपले वय व पैसा यांच्यावर कधीच घमेंड करु नये. कारण ज्या गोष्टी मोजल्या जातात त्या नक्कीच संपत असतात

१९) कुणासाठी कितीही केल तरी आपला उपयोग फक्त त्यांची गरज असेपर्यंतच असते.

**कु. दिपाली विनायकराव कवाडे**

बि.ए. तृतीय वर्ष

# पर्यावरणाचा ऱ्हास

**कु. वैष्णवी विजयराव केमेकर,** बी.कॉम. भाग२

*पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्याचा*
*घेतला वसा पाळणार मी...*
*सावित्रीची लेक मी*
*वृक्षतोड थांबवणार मी .....*

आपल्या आजुबाजूला असणाऱ्या सर्व गोष्टी जसे की झाडे, प्राणी, पशु, पक्षी, डोंगर, नद्या, वारा, भुमी ह्या सर्व म्हणजेच पर्यावरण होय. पण आपल्या आयुष्यात पर्यावरणाचे एवढे महत्व का आहे ? कारण माणसाने कितीही प्रगती केली अन् उच्च झाला तरी आपण सर्व सुद्धा या पर्यावरणाचाच एक भाग आहोत. तसेच पर्यावरणाची रक्षा सुध्दा करण्यास समर्थ आहोत आणि नष्ट करण्यास सुध्दा.. आपल्यातील बरेच जण पर्यावरणाची रक्षा करण्यापेक्षा कळत नकळत हाणीच करत असतात.



आपल्या आजूबाजूच्या आपल्या माहितीतील सर्व ग्रहांपैकी फक्त पृथ्वीवरच असे पर्यावरण आहे. कित्येक वर्ष अनेक शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत पण कोणीही आजतागायत असा ग्रह शोधु शकले नाही की ज्यावर माणूस वस्ती करु शकतो.

खोलवर विचार करुन बघा आपल्याला एवढे घर नाही आवडले किंवा तिथे काही समस्या असतील जसे की, पाणी पुरवठा होत नाही, वीज नाही तर आपण दुसरे घरे घेवू शकतो पण आपल्या पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने संपत्ती दुषित झाली तर आपण दुसऱ्या ग्रहावर राहायला जावु शकतो का? नाही ना? मनुष्याने आपल्या पृथ्वीची काळजी घेतली पाहीजे. इथल्या पर्यावरणाला जपले पाहिजे. नाही तर आपल्या पुढच्या पिढीसाठी आपण खूप मोठी संकटे निर्माण करुन ठेवू. पर्यावरणाचे संतूलन बिघडण्यास माणसाची हाव हे सर्वात मोठे कारण आहे. कमी हात जाणारी पाण्याची पातळी, पावसाची अनियमितता, वाढणारा दुष्काळ, वारंवार येणारी वादळे हे सर्व पर्यावरणाच्या असंतुलनाचे परिणाम आहेत.

पर्यावरणाला वाचविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहीजेत. कारण आपण पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहोत. पर्यावरण रक्षणाचा सर्वात सोपा उपाय म्हणजे वृक्षतोड थांबविणे व जास्तीत जास्त झाडे लावणे. झाडे लावल्यामुळे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल व पर्यावरणाच ऱ्हास कमी होईल.तसेच वाहनांमुळे होणारे प्रदुषण सुध्दा कमी करण्यावर भर दिला पाहीजे. या देशातील सर्व लोक पर्यावरणाबाबत जागरुक होतील तेव्हाच आपली पृथ्वी पुन्हा एकदा सुजलाम, सुफलाम होईल.

*आपली सुंदर पृथ्वी, तिचे रक्षण करु,*
*तिची समृद्धी वाढवू, तिला अधिक सुंदर करु....!*

# स्त्री जन्म

आजी म्हणायची
उपास–तापास कर, पुजा–पाठ कर
सासर चांगल मिळेल...
आजोबा म्हणायचे
शांत राहा, समजुतदार हो
सासरी निभाव लागेल...
आई म्हणायची
घरची चार काम शिक
सासरी सोपं जाईल...
काकु म्हणायची,
जोरात बोलू नको...
सासरी नावं ठेवतील...
काका म्हणायचे,
जिन्स नको, टिकली लाव, बांगड्या घाल...
सासरी चालत नसतं...
आत्या म्हणायची,
डान्स कराटे कशाला?
शिवनकाम, कलाकुसर शिक
सासरी उपयोग होईल...
मावशी म्हणायची,
सारखं अभ्यास करु नकोस
चार माणसात उठ बस
सासरी हेच करावं लागतं
पण .........
फक्त बाबा म्हणायचे,
जग बाळा मनसोक्त, मनमुराद
तुला हवं तस भरभरुन.....
तुला हवं ते घाल, हव तेवढं शिक,
ओरड, खेळ, नाच, फिर मोकळेपणाने
कारण........
तू तुझ्या हक्काच्या घरी आहेस
तू माझ्या माहेरी आहेस...

**कु. पायल मो. कडुकर**
बी.ए. भाग ३

# बापाच्या काळजातून

तू पळण्याआधी पोरी,
बापाच्या काळजात झाकून बघ
धडधडणारं काळीज तुला दिसणार नाही,
फक्त जखम आतुन फाटलेली कातडं,
कुणा टेलर कडे जावून शिवू सांग ना,
खुशाल पळ तू पण बाप म्हणून
मी तुला पळु देणार नाही...
का म्हणून तर...
तुझ्यासाठी नाही बघत माझा इमान
पण समाज मला वाळीत टाकेल
जेव्हा तू पळुन जाशील, पण...
या बापाची आठवण तुझ्या फाटक्या
काळजात कुठे लपून नेशील ?
पोरगी पळुन गेली याचे दुःख नाही,
होणार मला, पण माझ्या काळजाला
लाथ मारुन गेलीस याच दुखणं
कोणत्या मलमाने भरुन काढू सांग ना !
तुझं बरं वाईट होणार
साधी चिंताही बाप या नात्यानं
नाही करावी का मी ?
तुझं बर वाईट झाल्यावर कुणाच्या
अश्रुंच्या बांध फुटणारं? या बापाशिवाय....
बघ एकदा पोरी
या बापाच्या काळजातून पोरीचं नातं......

**कु. श्रद्धा संजय गायकवाड**
बी.ए. भाग ३

# माहेर

माझं माहेर गं बाई
आहे किती तरी छान
गोऱ्यापान भावजया
मला देतात गं मान ।।१।।

माझ्या माहेरी आहे
बंधूराजाचा गं वाडा
मी हट्टाने म्हणते
मला न्यायला गं धाडा ।।२।।

आला दिवाळीचा सण
माझ गुंतलं गं मन
आला माहेरी जाण्याचा
तो आनंदाचा सण ।।३।।

माहेरात गेल्यावर
गोतावळा गं जमला
सासुरवाशीण जीवाला थोडा
विसावा मिळते ।।४।।

आम्ही नंदा भावजया
बसून करंज्या भरतो
सुख दुःखाच्या ग गोष्टी
एकमेकीला सांगतो ।।५।।

माहेरातले दिवस
भुर्रकण उडून जातात
पतिराज ग माझे
मला घ्यायला येतात ।।६।।

वेळ पाठवणिची होते
माझे डोळे पाणावते
डोळे पदरानं पुसून
माय निरोप ग देते ।।७।।

**संजय विश्वासराव इंगळे**
एम.ए. भाग २ (इतिहास)

# मुलींचे शिक्षण हेच समाजाचे रक्षण

**कु. नेहा अंबादास मसतकर,** बी.ए. भाग ३

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जीवनाला उध्दारी!' हे त्यावेळी महात्मा जोतीबांना उमगले अन् त्यांच फलीत म्हणजे प्रत्यक क्षेत्रातील स्त्रियांची गगनभरारी होय. सावित्रीबाईच्या शिक्षणाने अख्खे स्त्री-जीवन प्रकाशमय होईल हे जोतिबाने जानले होते. ''मुलीचे शिक्षण हेच समाजाचे रक्षण '' असे भाकीत आज खरे होताना दिसत आहे. आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही आघाडीवर राहून कार्य करीत आहे.

जेथे स्त्रियांचा आदर केला जातो तेथे देवतांचा वास असतो. जेथे स्त्रियांचा सन्मान होत नाही तेथे सारी कर्म निष्फळ होतात. भारताची ऐवढी उज्वल परंपरा असून आज सर्वत्र स्त्री असुरक्षित आहे याची प्रचिती अनेक घटनांमधून, वर्तमानपत्रामधून आपण वाचतो. मनुस्मृतीच्या काळापासून स्त्रियांवर अनेक बंधने होती. दुबळी, अबला अशी ही तिची हेटाळणी केली जायची.

' 'तुका मने उगी रहावे। जे जे होईल ते ते पाहावे।' अशी वेळ आपल्या समाजात निर्माण झाली होती. स्त्रियांच्या अन्यायाला अत्याचाराला वाचा फोडणारी, सबल स्त्रियांची एक नवी पिढी समाजापुढे आली आणि आकाशातील तळपता तारा होणे कदाचित शक्य नसेल, पण अंगणातील दिवा होवुन भोवतालचा परिसर उजळणे मात्र मुळीच अशयक्य नाही. असा संदेश देणारे विनोबा भावे, महर्षी कर्वे, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा रायमोहनराय या दिपस्तंभानी आपल्या विचारातून व कृतीतून 'मुर्लीचे शिक्षण हेच समाजाचे रक्षण आहे' हे सत्यात उतरवून दाखविले.



समाजात स्त्रियांना स्वाभिमानाने जगण्याचा मुलमंत्र दिला. स्त्री राजवाड्यापासून ते झोपडी मध्ये कोंडली होती. आज समाजसुधारकामुळे सरपंच पदापासून ते राष्ट्रपती होताना प्रत्येक क्षेत्रात ज्ञानाने, परिश्रमाने जिद्दीने गरुडझेप घेत आहे. पाकीस्तानची कन्या मलाला युसुफजाई अवस्था १६ वर्षानी तिने आदर्श घालवून दिला. तलवारीच्या धारदार पातापेक्षाही लेखनाची ताकद, श्रेष्ठ व प्रभावी आहे. हे सत्यात उतरवून दाखविले. मुलींच्या शिक्षणासाठी तालिबानच्या विद्रोहाला सामोरे जात गोळी झेलली. मरणाच्या दारातून जी परत आपल्या ध्येयाप्रत पोहचण्याचे प्रयत्न करते. हे समाजाचे रक्षण नव्हे का ?

केवळ मलालाच नव्हे, तर बलात्कारास बळी पडलेली लखनौची 'उषा विश्वकर्मा' या परिस्थितीतून सावरत मुलींसाठी मार्शल आर्टचे शिक्षण देणारी रेड ब्रिगेड संघटना स्थापन करुन समाजाच रक्षण करते, हे मुलींचे, समाजाचे रक्षणच होय.

अशा प्रकारच्या अनेक अत्याचाराविरुध्द घुसमटेलेल्या संतापाला शब्द आणि कृती देणाऱ्या देशाची दिशा आणि दशा बदलवायला सारसावलेला या सामान्य मुलींनी एक सामान्यत्वच सिध्द केल. एक नवं पाऊल.... एक नवं वास्तव... एक नवी ओळख निर्माण केली आहे. या सर्वांचा आदर्श आपण निर्माण केला. या स्त्रियांनी आदर्श नेहमी डोळ्यासमोर ठेवून खरचं मुलींच शिक्षण हे समाजाचं रक्षण होय. असे अभिमानाने सांगावे वाटते.

''लक्ष न बेदखल होने पाये। कदम मिलकर चल।।
सफलता तेरे कदम चुमेगी। आज नहीं तो कल ''।।
मुलींचे शिक्षण हे समाजाचं रक्षण, देऊ या प्रत्येक
सुकन्येला संरक्षण ।

❑ ❑ ❑

## माझी ती मैत्रिण

माझी ती मैत्रीण अशीच असावी
खोटे बोलले की चटकन पकडून खुप सुनावणारी
माझं काही चुकलं तरी मला सावरुण वाट दाखवणारी
तिचाही मनातले नकळत मला सांगणारी
मन माझ्या मनातलं अलगद ओळखणारी
माझी ती मैत्रीण अशीच असावी...
ओरडल्यावर मला ती खुप तिखट वाटावी
अन लाडाने बोलल्यावर दुधावरच्या
साय सारखी वाटावी.
मला तिच्या गुतंलेल्या प्रॉब्लेम हक्काने सांगणारी
अन् माझ्या प्रॉब्लेम चटकन मिनटात सोडवणारी
माझी ती मैत्रीण अशीच असावी
कुठे हरवलो मी तर लगेच
इंद्रधनु प्रमाणे क्षितिजावर दिसावी
अन् दिसल्यावर विसरलास कारे मला
म्हणून जाब विचारणारी
कितीही तिखट आणि रागावणारी असली तरी
अन् कधीच मला न विसरणारी आणि
मला समजुन घेणारी
माझी ती मैत्रीण अशीच असावी

**रामेश्वर फगनु इवने**
एम.ए. भाग १ (इतिहास)

## जीवनाची नाती

जीवनात नाती तशी
अनेकच असतात
पण ती जपणारी लोक
फार कमीच असतात... ।

काही नाती असतात रक्ताची
तर काही हृदयाची ...।

काही नाती असतात जन्मो-जन्माची
तर काही ... काही क्षणापुरतीची ...।

काही नाती असतात
केसांसारखी न तुटणारी
पण वेळ आलीच तर वाकणारी ...।

काही नाती असतात
लांबुनच आपले म्हणणारी
जवळ गेल्यावर मात्र दूर करणारी ...।

काही नाती असतात
पैशाने विकत घेता येणारी
तर काही प्रेमाने आपलेसे करणारी...।

काही नाती असतात
न जोडता सुध्दा टिकणारी...।

**कु. जोत्स्ना रामभाऊ चव्हाण**
बी.ए. भाग ३

## मी कोण?

जन्म दिला आईने
आईची मी लाडली
नावे दिले वडिलांचे
वडिलाची मी मुलगी ।।धृ।।

राखी बांधली भावाला
भावाची मी बहीण
प्रेम दिले बहिणीला
बहिणीची मी ताई।।१।।

सेवा करते आजीची
आजीची मी नात

लग्न केले त्याच्याशी
त्याची मी पत्नी
सेवा केली सासु सासऱ्याची
त्याची मी सुन ।।२।।

जन्म दिला बाळाला
त्याची मी आई
त्यागातच गेले जिव
अस्तित्व माझे मला
दिसलेच नाही

मी माझी कोण
हे कधीच कळले नाही।।३।।

**कु. मिनाक्षी मो. पापडकर**
बी.ए. भाग २

# खरंच २०२० साली भारत महासत्ता बनेल का?

**चेतन विलासराव वानखडे,** बी.ए. भाग-३

इ.स.२०२० मध्ये भारत महासत्ता होणार आहे, असं आज बरेचसे तत्वज्ञ म्हणत आहेत. अमेरिकेसहित काही परदेशी अभ्यासक सुद्धा चीन अथवा भारत यांना उगवत्या जगाची सत्ताकेंद्र म्हणून संबोधित आहेत आणि कदाचित याचमुळे भारतीयांचे विमान हवेत तरंगते आहे. पण खरोखरंच असे आहे का? महासत्ता होण्यास भारतीय परिस्थिती अनुकूल आहे का ? आणि जरी भारत महासत्ता झालाच तर ती सत्ता कशी असेल ? माझ्या परिने या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा केलेला हा प्रयत्न.



महासत्ता होण्याच्या दिशेनं वाटचाल सुरु असलेल्या भारतातील आजची परिस्थिती कशी आहे? यावर थोडीसी नजर टाकूयात. जगभरामध्ये मंदी चालू असतानाही भारतावर मात्र त्याचा विशेष परिणाम दिसून आला नाही. भारतातील उद्योग क्षेत्राला काही प्रमाणात धक्के बसुनही आजच्या तारखेला भारतीय उदयोग भरघोस प्रगती करीत आहेत. काही भारतीय उद्योग तर परदेशी कंपनीना विकत घेत आहेत. शेअर मार्केट ही उंचावत आहे. भारताच्या विकास दरही चांगला राहीला असुन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत आहे. मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणुक होत असुन आता तर भारताची दारे जागतिक शिक्षणाकरिता खुली होत आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताकडे असलेले मोठ्या प्रमाणावरील मनुष्यबळ व प्रचंड बुध्दिक्षमता जगाला खुणावत आहे असे हे सर्व चांगल चित्र आजपर्यंत उद्योगपतींनी, राजकारणातील नेतेमंडळींनी, विद्‌वानांनी रंगविले, रंगवून सांगितले आणि हेच कारण घडले. ज्याच्यामुळे आम्हा भारतीयांचे विमानं हवेत घिरक्या घालत आहे. मात्र आपण सारे जण हेच विसरुन गेलो आहोत की सुरक्षित जागा नाही मिळाली तरच असे भिरभिरने चालू होते आणि जर हे असेच चालू राहीले तर काय होईल हे सांगण्याची गरज नाही आणि याला कारणीभूत ठरली आहे. पाच ते दहा टक्के भारतीयांना भारत समजण्याची केलेली चूक.

भारतीय उदयोग आज भरघोस प्रगती करीत असून जगामध्ये दबदबा निर्माण होणे हे भारतीय औद्योगिक क्षेत्रास भूषणावह आहे. जागतिक मंदीमध्ये स्थिर राहिलेला व आता उंचावणारा भारताचा विकास दर ही भारतीय उद्योगांच्या प्रगतीची पावतीच आहे. पण या विकासदरामध्ये शेतीसहीत इतर क्षेत्रांच्या कितपत वाटा आहे आणि फक्त उद्योगांच्या प्रगतीवर महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणे कितपत योग्य आहे याचा आपण कधीतरी विचार करणार आहोत की नाही ? काही उद्योग व त्यांचे मालक म्हणजे भारत नाही शिवाय औद्योगिक क्षेत्राचा विचार केल्यास असे दिसून येईल की, भारतीय उद्योगांना लागणारा बहुतांश कच्चा माल हा परदेशातुन आयात केला जातो. सुटे

भाग आयात करुन त्यांची जोडणी करण्याचे काम इथे चालते. विकासात महत्त्वाचे स्थान असलेले इंधन देखील मोठ्या प्रमाणावर बाहेरुनच मागितले जाते. माहिती आणि तंत्रज्ञानचे यश नक्कीच गौरवास्पद आहे. मात्र मानवाचे बौध्दिक कौशल्य हे त्यामागे एक कारण असावे.

भारतात माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगास इ.स.१९३४ मध्ये सुरुवात झाली आणि अवघ्या १६ वर्षात भारताने नजर लागावी अशी घोडदौड केली. आज जवळपास सर्वत्र भारतीय माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगाचे वर्चस्व आहे. भारताच्या सतत वाढणारा विकास दरामध्ये आय.टी. चा वाटा खुप मोठा आहे. मात्र बहुतांश कंपन्या या परदेशी कपन्यांसाठी काय करताना दिसून येतात. भारतातील गरिबी दूर होण्यास १०० टक्के साक्षरतेसाठी, सर्वांगिण विकासासाठी मात्र आय.टी. चा खुप मोठा फायदा झाला आहे असे दिसून येत नाही. खरेतर आऊटसोर्सिंग द्वारे परदेशी कंपन्यांना परदेशालाच आय.टी.चा चांगला फायदा झाला आहे. शिवाय कितीतरी भारतीय आय.टी. तज्ज्ञ भारतामध्ये शिक्षण घेवुन परदेशात नोकरी करतात. त्यांच्या शिक्षणावर भारत सरकार काही प्रमाणावर खर्च करत. मात्र परदेशात नोकरी करुन, तिथे आयकर भरुन आणि आपल्या बुध्दी कौशल्याचा तिकडे उपयोग करुन हे भारतीय भारताचेच मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. एकंदर काय तर भारतीय आय.टी. उद्योगाने कितीही प्रगती केली, विकासदर वाढविण्यास कितीही हातभार लावला तरीसुध्दा संपूर्ण भारताला व्हिजन २०२० कडे घेवून जाण्यास सध्यातरी आय.टी. उद्योग सक्षम नाही असेच चित्र दिसते.

आय.टी. क्षेत्र वगळता रिअल इस्टेट, अवजड उद्योग, दूरसंचार आदि क्षेत्रांमध्ये भारतीय उद्योग प्रगती पथावर आहेत. मात्र हे सर्व उद्योग खाजगी असून केवळ नफा कमाविणे हेच त्यांचे उद्दीष्ट आहे. मात्र औद्योगिक क्षेत्रात भारताचे यशस्वी प्रतिनिधीत्व करणेसाठी जवळपास सर्वच उद्योगांना भारतीय प्रशासन भरघोष सवलती देते. त्यामुळे विकासदर जरी वाढत असला तरी सामान्य भारतीयांच्या जीवन प्रणालीमध्ये फार मोठा बदल होतांना दिसून येत नाही.

भांडवलशाहीकडे वेगाने वाटचाल सुरु असलेल्या भारत देशामध्ये आजमितीस ७० ते ८० टक्के गरीबी आहे. कितीतरी जनतेला दोन वेळेचे जेवण ही लाभत नाही. आदिवासी विभागांमध्ये तर आजही कितीतरी बालके कुपोषणाने मरण पावत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकरी बांधवांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

कनिष्ठ, मध्यम वर्गाचे, उच्च मध्यम वर्गाकडे होणारे परिवर्तन, काही नवश्रीमंत आणि मोठ मोठे उद्योजक म्हणजे काही भारत नव्हे. आणि तसेही वर उल्लेख केलेल्या वर्गातील बरेच जण स्वत:ला इंडियन म्हणवून घेण्यातच धन्यता मानतात. इंडिया हा एखाद्या छोट्याशा परदेशी देशाप्रमाणे ज्याचे गरीब भारताशी केवळ आयात निर्याती चेच नाते आहे. भारताची पूर्ण जाणीव नसलेले हे इंडियन भारताबद्दल निष्फळ चर्चा करुन भारताची ध्येय धोरणे ठरवितात. भारतामध्ये विविध योजना राबविणारे हे इंडियन आहेत आणि म्हणूनच जरी ह्या योजना भारतासाठी आहेत असे दर्शविण्यात येत असले तरी याचा प्रत्यक्ष फायदा इंडियन्स हाच घेतो आहे म्हणजेच गरीब भारताला अधिकच गरिब बनवत काही धन दांडगे अजून श्रीमंत होत आहेत. अशाने सन २०२० मध्ये महासत्ता झालाच तर तो भारत नव्हे इंडिया असेल.

इ.स. २०२० मध्ये महासत्ता होणार असलेल्या इंडिया कडे एक नजर टाकल्यास एक गोष्ट सहज लक्षात येईल ती म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधीत्व करु शकेल असे काहीच इंडियाकडे नाही. इंडिया भारतीय नव्हे तर 'कॉस्मोपॉलिटन' संस्कृती जगते.

संपुर्ण जगावर राज्य केलेल्या ब्रिटनच्या संस्कृतीचा वारसा मात्र एकट्या भारतानेच जपला आणि वाढविला. भारतीय नसतांनाही इंग्रजी नंबर एकची भाषा ठरली. आजचे तारखेला संवादासाठी सर्व भारतीयांनी गरज इंग्रजीच आहे आणि म्हणूनच इंग्रजी भारताला इंडिया पासून वेगळे करण्यास मोठ्या प्रमाणावर कारणीभुत आहे. जगातील कित्येक इतर राष्ट्रांनी देखील ब्रिटनची गुलामगिरी सहन केली आहे. मात्र स्वातंत्र्य झाले नंतर जवळपास या सर्वच राष्ट्रांनी खुपच चांगली प्रगती केली आणि ती ही स्व:भाषेतून. जपान सारखे राष्ट्र एवढा मोठा आघात सोसून ही आज कितीतरी पुढे गेले आहे.

वरील सर्व चेर्चेतून असाच निष्कर्ष निघतो की इ.स. २०२० मध्ये भारत महासत्ता होणे शक्य नाही. परंतु त्या दिशेने वाटचाल मात्र झालेली आहे हे निश्चित.

❑ ❑ ❑

# जागतिकीकरण

**राहुल जानराव कुरवाळे,** बी.ए. भाग-३

जागतिकीकरण म्हणजे नक्की काय? आणि त्याचे उद्दीष्ट्य काय? हे जाणून घ्यायचे असेल तर ते मानवाचा, या राष्ट्राचा पूर्वइतिहास जाणून घेणे गरजेचे आहे. माणूस अजूनही गुहेतच राहत होता. मुलभूत गरजांपैकी अन्न ही गरज माणसे शिकार करुन भागवत होता. वस्त्र म्हणून फारतर जनावरांची कातडी वापरत होता आणि निवारा म्हणून गुहा होत्याच अश्या अत्यंत कमी गरजा असलेल्या काळात प्रत्येक माणूस आपआपली शिकार करुन राहू शकत होता. त्यासाठी इतरांवर अवलंबून राहायची गरज नव्हती. नंतरच्या काळात मानवी संस्कृतीचा विकास झाला आणि माणूस छोट्या समूहाने पाण्याच्या स्त्रोताजवळ राहू लागला. माणसाच्या गरजाही आता वाढल्या. अन्न म्हणून केवळ शिकारीवर अवलंबून न राहता धान्य पिकवले जावु लागले. शेतीसाठी नांगर, वाहतुकीसाठी बैलगाड्या आणि रथ गरजेचे झाले. हौस म्हणून सोन्या-चांदीचे दागिने देखील गरजेचे झाले. समाजाचे व संस्कृतीचे शत्रूंपासून संरक्षण व्हावे याकरिता सैन्याचीही समजाला गरज भासू लागली. यात इतरही अनेक बीबींचा मोठ्या प्रमाणात विकास झाल्याचे आपणास दिसते. उदा. वस्तू विनिमय पध्दत, शेती, देवाणघेवाण अश्या प्रकारच्या अनेक विभागात अमूलाग्र बदल कालांतराने घडून आल्याचे आपण पाहतो.



आज भारतासारख्या देशातील लोकांना संगणक प्रोग्रामिंगमध्ये गती असेल पण इलेक्ट्रॉनिक वस्तु त्या देशात किफायतशीपणे उत्पादीत केल्या जाऊ शकत नसतील. तर आम्ही तुम्हाला सॉफ्टवेअर देतो. त्यातून मिळालेल्या पैश्यातून आम्ही इतरांकडून हार्डवेअर विकत घेतो. अश्या स्वरुपाचा व्यवहार करण्यात येतो. यातूनच दोन्ही देशांमधील लोकांना हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर असे दोन्ही चांगल्या प्रतीचे वापरावयास मिळते. यात दोन्ही देशाचा फायदाच आहे. अर्थात एका देशात कोट्यावधी लोक राहतात. त्यामुळे वैयक्तिक पातळीवर जसे व्यवसायाचे पूर्णपणे स्पेशिलायझेशन झाले तसे देशपातळीवर होवु शकत नाही पण त्यातूनही अर्थकेंद्रीत (कॅपीटल इन्टेनसिव) आणि मनुष्यबळ जिथे स्वस्तात उपलब्ध आहे असे देश दैनंदिन वापरात असलेल्या अनेक वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात करतात. अश्या वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग मनुष्यबळ केंद्रीत असतात. मुख्य मुद्दा म्हणजे अश्या प्रकारच्या व्यापारातून दोन्ही देशांचा फायदा होवु शकतो. त्यावर लक्ष केंद्रीत करुन आपली निर्यात कशी वाढेल हे बघीतले पाहीजे यात सगळ्यांचाच फायदा आहे. जसे गावपातळीवरील व्यवहारात प्रत्येक माणूस इतर कोणाही व्यक्ती कडून आपल्याला गरजेची असलेली वस्तू/ सेवांची कोणत्याही आडकाठीशिवाय देवाणघेवाण करु शकत असे. त्याच पध्दतीने एका देशात निर्माण होत असलेल्या वस्तू/सेवा आणि मनुष्यबळ यासी

देवाणघेवाण कोणत्याही आडकाठीशिवाय जगभरात कुठेही होऊ शकणे यालाच खरे जागतिकीकरण म्हणता येईल.

आता जागतिकीकरण या अर्थाने झालेली नाही हे तर उघडच आहे आता त्यामागची कारणे खालीलप्रमाणे नमुद करु शकतो.

जागतिकीकरणाने आज आपल्याला घेरुन टाकले आहे. पंधराव्या – सोळाव्या शतकातील युरोपातील आधुनिक भांडवली उत्पादन संबंधीचा उगम, वसाहतवाद, साम्राज्यवाद, विसाव्या शतकातील तंत्रवैज्ञानिक विकासातून झालेला अमेरिकन जीवनशैलीचा प्रसार असा हा प्रवास घडत आपण जागतिकीकरणाच्या लाटेवर कळत नकळत स्वार झालो आहोत. जगभर श्रमिकांचे एक राष्ट्र, एक राज्य निर्माण होईल हे मार्क्स चे स्वप्न भंग पावले असून आता जगभर भाडवलदारांचे 'एक राष्ट्र' उभारण्याच्या दृष्टीने धडपड आहे.

जागतिकीकरण हे अपरिहार्य असल्याचे प्रतिपादन करणारे आहेच आणि सिल्टलपासून मुंबईपर्यंत या प्रक्रियेचा निकराने विरोधही केला जातो. एक लक्षात घेतले पाहिजे की, जातीमुळे सामाजिक स्तरीकरण अधिक मजबूत होते भारतात भांडवली पध्दतीने ही कठोरता कमी झाली. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेत फायद्याचे वाटप ज्या समाजव्यवस्थेत होणार, ती मूलत: विषम समाजव्यवस्था आहे. त्यामुळे जातीमधील श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब घटक अधिक गरीब होताना दिसतो. जागतिकीकरणाचे असे विविधांगी स्वरुपाचे काय परिणाम होणार आहेत त्याचा वेध श्री. गजानन खातू यांनी आपल्या 'जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय' या पुस्तकात घेतला आहे.

जागतिक पातळीवरचा व्यापार आणि देवाणघेवाण ही काही नविन गोष्ट नाही. या आयात–निर्यात व्यापाराला जागतिकीकरण ही संज्ञा नव्हती परंतु डंकेल प्रस्तावानंतर जागतिक व्यापार – व्यवहारांचा चेहरा आमुलाग्र बदलू लागला आणि सर्व देशांच्या अर्थव्यवस्था खुल्या होवु लागल्या असे नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेतील पुर्नरचना होवु लागली असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

आज सर्वच क्षेत्रांमध्ये जागतिकीकरणाचे वारे वाहत आहेत. शिक्षण, ज्ञान, विचार याचा उपयोग मानजातीच्या कल्याणासाठी व्हावा हे उघडच आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्राबाबत आपण कोणती धोरणे निश्चित करतो . हे महत्त्वाचे आहे. शिक्षणविषयक धोरणे अशा पध्दतीने आखण्यात यावी की, आपला देश जगाला सुजाणपणाचे नेतृत्व देणारा ठरावा. हे क्षेत्र इतके व्यापक आहे की, परिस्थितीनुसार सुधारणा बदल करुन थांबता येत नाही येथे सुधारणा, व्याप्ती यांना विराम नाही. सतत नवनवे बदल, सुधारणा होत राहणार. व्याप्ती वाढत जाणार, नवी मते मांडली जाणार ही प्रक्रिया अखंडपणे सुरुच राहणार आहे. स्पर्धा हे जागतिकीकरणाचे गृहितत्व आहे व त्यामुळे नवजागतिक सांस्कृतिक क्षेत्रासमोर ही असंख्य निर्माण झालेले आहे.

बदलत्या काळानुरुप जागतिकीकरण बदलत चालले आहे. वाढती लोकसंख्या, राहणीमानाचा दर्जा, शिक्षण, रोजगार आणि आरोग्य याप्रकारचे अनेक घटक याला कारणीभूत ठरतात.

❑ ❑ ❑

## साफल्य

संकटांना कधी कंटाळायच नसतं,
ह्याला समोर जायच असतं।
कुणी नावे ठेवली तरी थांबायच नसतं,
आपल काम चांगलच करायच असत।
अपमानात कधी खचायच नसत ,
जिद्दीने बळ वाढवाच असतं ।
चैतन्य सदा फुलवायच असतं।
पाय मोकळे म्हणून परतायच नसतं,
पुढे आणि पुढच जायच असतं।
लोकांच्या निंदेला कधीच घाबराचं नसतं,
आपल सामर्थ्य दाखवायच असतं।
जीवनात खुप करण्याजोग असतं
पण आपले तिकडे लक्षच नसतं।
रागाने कुणाला बोलायच नसत,
प्रेमाने मन जिंकायच असतं।
प्रेमात लहान थोर पाहायच असतं,.
एकमेकांना आहार देऊन मार्गदर्शन करायंच असतं।

**अमरदीप प्रल्हादराव अमझरे**
बी.ए. भाग २

# स्त्री–पुरुष समानता

**कु. प्रतिक्षा चंद्रशेखर गतफणे,** बी.कॉम २

*तुझ्यामुळे अस्तित्व माझे*
*अथांग मजवर ऋण तुझे*
*कधी न विसरले कधी न विसरणार*
*प्रत्येक आठविणीतले दिवस तुझे हे आई*
*आशिर्वाद तुझे असु दे !*

समुद्र ओलोडणे आमच्या धर्माच्या ठेकेदारांनी पाप ठरविले आणि तिथुन अत्याचाराची बिजे या देशात रोवली गेली. समुद्र बंदीसारख्या घातक रुंदीमुळे आम्ही आपले वर्चस्व गमावले. आपल्या देशात एखादी स्त्री कोणत्याही क्षेत्रात कर्तृत्व निर्माण करणारी झाली तरी तिचा इतिहास लिहितांना ती कोणाची तरी कन्या, पत्नी, माता, बहीण किंवा शिष्या असते. तिचे स्वंतत्र असे कृत्य रेखाटले जात नाही. कारण आपल्या देशातील इतिहास हा विषमतावादी पुरुष सत्ताक, स्त्री दास्य अशा मानसिकतेतून लिहिला गेला.

आजही कुंटुंब, धर्म, जात या सर्वच ठिकाणी स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तिला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. स्त्री जन्माला आली तर तिचे स्वागत नकारात्मक पध्दतीने केले जाते. लहानपणी तिच्या हाती भातकुलीचा खेळ देवून तिला शिकविले जाते की, यात तु स्वयंपाक बनवायचा सगळ्यांना वाढायचे आणि सर्व आवरुण ठेवायचे म्हणजेच ‘रांधा,वाढा उष्टी काढा’ ही गोष्ट लहानपणापासून बिंबवली जाते, ठसविली जाते. याला जबाबदार कोण ! तर पुरुषच.



लग्न करणे प्रत्येक स्त्री करिता अत्यावश्यक, अनिवार्य आणि सक्तीचे मानले जाते. स्त्रीचे शिक्षण, करीयर या बाबींना दुय्यम दर्जा असतो. लग्नानंतर मुले जन्माला घालणे त्यात एक मुलगा असलाच पाहिजे ही तिच्या अस्तित्वाची लढाई असते. केवळ कन्या जन्माला घालणे हा स्त्री करिता अक्षम्य गुन्हा असतो. लग्नानंतर स्त्रीला आपली जुनी ओळख पूर्णपणे पुसून टाकावी लागते. तिला नवऱ्याचे नाव, अडनाव धारण करावेच लागते. पुरुषांची मात्र एकच ओळख असते . ती म्हणजे श्रेष्ठ दर्जाची व्यक्ती श्रीमान श्रीयुक्त अमुक तमुक. स्त्रीने कायम राब राब राबायचे अन एक दिवस झिझून मरुन जायचे. घरातील स्त्रियांवर पुरुषांचीच सत्ता असते. मग ती पत्नी असो, मुलगी असो वा सुन असो. त्यांनी कोणते कपडे घालावे, काय शिकावे,  किती शिकावे, नोकरी करावी अथवा नाही हे सर्व पुरुषच ठरविणार तिच्या कमाईवर देखील तिचा अधिकार नाही. काही स्त्रिया भोंदुबाबाच्या नांदी लागतात. त्यांचे लैगिंक शोषण होते हे चित्र बदलायला हवे.

स्त्री–पुरुष समानता असणारा, समतोल दृष्टीकोन ठेवणारा, नैतिकतेने वागणारा मानवतावादी समाज निर्माण करणे ही काळाची गरज आहे. स्त्रीला बाईमाणूस नव्हे, माणूस म्हणून दर्जा देणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते, आम्ही स्वातंत्र्यात असुनही समस्येने ग्रासलेले आहोत.

मोकळ्या वातावरणात असूनही हातपाय बांधल्यासारखे जगतो आहोत. समोर वाईट दिसत असतानाही प्रतिकार करीत नाही तोंड असूनही बोलत नाही, यालाच स्वातंत्र म्हणायचे काय ? सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी आजपासून सुमारे दिडशे वर्षापूर्वी स्त्री शिक्षणाचा विडा उचलला आणि आपल्या घरच्यांचा, समाजाचा तीव्र विरोध स्वीकारुन समाज प्रवाहाच्या विरोधात जावून

आपले शिक्षण कार्य अविरत सुरुच ठेवले हे आपण इतिहासात शिकलोच आहे. जेव्हा आपण या समाजसुधारकांचा अभ्यास करतो आणि त्यांचा त्यावेळचा दुरदृष्टीपणा आणि सध्याची सामाजिक स्थिती यांची जेव्हा तुलना करतो तेव्हा मनाला खुप वाईट वाटते. या समाजसुधारकांनी इतरांच्या मुलींना शिकवण्यासाठी शेण, माती सहन केली परंतु आज आपल्याला स्वतःच्या मुलीला जन्म द्यायला लाज वाटते. दिवसेंदिवस मुलींचे दर हजारी प्रमाण कमी होत आहे. महाराष्ट्रासारख्या विकसित राज्यांमध्ये सुद्धा हजारो मुलांप्रमाणे केवळ ८३३ मुली आहेत. इतर राज्यांमध्ये तर परिस्थिती यापेक्षा ही बिकट आहे.

दिवसेंदिवस मुलींवर होणारे अत्याचार पाहून मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर दिसतो. दिल्ली, मुंबई इत्यादी ठिकाणी घडलेल्या मुलींवरील अत्याचाराची प्रकरणे ऐकूण अंगावर काटे उभे राहतात. अशा कारणामुळे मुलांना बाहेरगावी शिकायला जाण्यास सुध्दा भिती वाटते. मग सावित्रीबाईचा उद्देश खरच यशस्वी होतोय का ? या परिस्थितीला जबाबदार कोण ? तर मला वाटते सामाजिक मानसिकता बदलण्याची खरी गरज आहे. कदाचित अशातुन काही साध्य होईल आणि जर समाज, सरकार जागृक झाले नाही तर विसरु नका. स्त्री हिच दुर्गा सुद्धा आहे आणि ती दृष्टांचा संहार करण्यासाठी आपले अस्सल रुप धारण करेल कारण –

''इसे न समझे अबला कोई ।
यह भारत की नारी है ।
अब यह नाजूक फुल नही।
यह भारत की चिंगारी है ।''

❑ ❑ ❑

# जीवन आणि शिक्षण

खरं शिक्षण अस असतं
जे चाकोरीच्या बाहेर,
पुस्तकांच्या पलीकडे
मला जगायला शिकवतं

खरं शिक्षण अस असतं
जे मार्क्सवर अवलंबून नसतं,
आयुष्याच्या विशाल कक्षा
फुलवून अनुभवायला शिकवतं

खरं शिक्षण अस असतं
जे नाही तोलत एका पट्टीने
परमेश्वरानी घडवलेली वेगवेगळी फुले
गुच्छा शोभिवंत त्यातील विविधतेनं नटलेले

खरं शिक्षण असं असतं,
हे हळूच कळीला उमलवत
स्पर्धेच्या जगापासून
सुज्ञांना मैल भर दुर ठेवतं

खरं शिक्षण असं असतं
जे जोडतं आपल्याला आपल्या नाळेशी
संस्कृतीची उच्छेद न करता
अलगद सुधारणेच भान देत

खरं शिक्षण असं असतं
की जे जीवन जगायला शिकविते,
दीन दुबळ्यांच्या दुःखावरती
एक दिवसाची प्रेरणा देते

खरं शिक्षण असं असतं
जे घन्या अंधारात
पणतीसारखं उजेड देतं
जगण्यासाठी बळ देतं

खरं शिक्षण अस असतं
जे जगण्याची उम्मीद देतं
पुन्हा पुन्हा पडून सुध्दा
ते उभं राहायला शिकवतं

खरं शिक्षण असं असतं
की, आपला विचार समृद्ध करून
आपल्या स्वतःचा विचार करुन
व्यक्तीला व सृष्टीला निर्माण करत.

**कु. प्रगती अरविंदराव राऊत**
बी.ए. भाग १

# पर्यावरण समतोल आजची भीषण समस्या

**कु. समिक्षा दिवाकर वानखडे,** बी.ए. भाग-३

पर्यावरण शास्त्रात सजीवांशी निगडित प्रत्येक घटकांचा साकल्याने विचार केला जातो. या शास्त्रात प्रामुख्याने विविधांगी, बहुआयामी दृष्टीकोणाद्वारे आपल्या सभोवतालच्या निसर्गाची साधक ओळख घडवून मानवाच्या निसर्गावरील अतिक्रमणाचाही साकल्याने विचार करण्यात येतो. पर्यावरणशास्त्र हे एक उपयोजित शास्त्र असल्यामुळे या शास्त्राद्वारे पृथ्वीवरील मर्यादित नैसर्गिक साधन संपत्ती टिकावी या दृष्टिकोनातून अधिक योग्य प्रकारे कशी वापरावी, या प्रश्नाचे योग्य समाधान शोधण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

आपण आपल्या सभोवतालच्या परिसराचा, नैसर्गिक जडणघडणीच्या दृष्टिकोणातून मुलभूतपणे विचार केला तर आपल्याला असे आढळून येईल की आपल्या सभोवतालचा परिसर फार प्राचीन काळी मुळात जंगले, नद्या, डोंगर, वाळवंट वा अशा नैसर्गिक भूभागांपैकी एक वा यासारख्या घटकांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेला प्रदेश आहे. आपण सर्वजण अशा मुळच्या संपन्न पण मानवाच्या हस्तक्षेपामुळे आज खेडी, शहरे किंवा महानगरात परिवर्तित झालेल्या भूप्रदेशात राहतो. आपल्यासारख्या शहरात राहणाऱ्या सर्वांना अन्नधान्याची गरज भागवण्यासाठी सभोवतालच्या खेड्यापाड्यावरच अवलंबून राहावे लागते. जंगले, गवताळ माळराने, नद्या, समुद्र यासारख्या नैसर्गिक संसाधनांवर आपण शेतीसाठी लागणारे पाणी, इंधनासाठी लागणारे जळाऊ लाकुड, गुरांसाठी वैराण आणि समुद्रातून मिळणारी मासळी या सारख्या दैनंदिन जीवनातील गरजांसाठी विसंबून असते. पृथ्वीवरील निसर्ग संपदेचे योग्य जतन केले गेले नाही तर पृथ्वीतलावरील मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात येवु शकेल.

प्लास्टिक, प्लास्टिकपिशव्या, प्लास्टीक बॉल पेने, खाणकाम, वृक्षतोड, ध्वनी प्रदुषण, जलप्रदुषण, भूमीप्रदूषण, वायुप्रदूषण इत्यादी पर्यावरणीय समस्या आहेत.

खाणकाम हा पर्यावरणाची हानी करणारा प्रमुख घटक मानला जातो. पृथ्वीच्या पृष्ठभागावरुन खनिज पदार्थाचा उपसा केल्यामुळे अनेक समस्या निर्माण होवु शकतात. खाणकामामुळे उपलब्ध जमिनीची हानी होते. त्याचप्रमाणे उद्योगाद्वारे निर्माण होणाऱ्या प्रदुषणामुळेही जमिनीची हानी होते. औद्योगिक उपयोगासाठी जमिनीचा वापर तसेच जमिनीचे व जलसाठ्यांचे प्रदुषण तसेच औद्योगिक स्तरावर टाकाऊ पदार्थाची निर्मिती यासारख्या अनेक समस्या खनिज पदार्थाचा उपसा केल्यामुळे निर्माण होवु शकतात. याविषयी जागतिक स्तरावर जाणिव निर्माण होत आहे. शासकीय स्तरावर खाणकामाविषयी समस्या दुर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयत्नातून अनेक आंतरराष्ट्रीय करार निर्माण झाले आहेत.



खाणकामामुळे पर्यावरणाची हानी होवु नये यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक कामे निर्माण करण्यात आले आहेत.

**जंगलतोड :–** ज्या संस्कृतीत वनांकडे विशेष लक्ष देवून वनांचा विवेकी वापर केला गेला त्या संस्कृतीची भरभराट होत जाते. याउलट ज्या संस्कृतीत वनांचा ऱ्हास होत गेला त्या संस्कृतीही कालांतराने नष्ट होतात. खनिज पदार्थाच्या उपलब्धतेसाठी जंगलतोडीची समस्या जगभर तसेच भारतालाही भेडसावत आहे. वीज निर्मीतीमुळे वनक्षेत्र पाण्याखाली गेल्यामुळे या वनात राहणारे आदिवासी विस्थापित झाले. भारतातील जंगलतोडीचे प्रमुख कारण आहे वनांची लाकडासाठी व जळणासाठी होणारी जंगलतोड. आजही आदिवासी लोक वनांतून लाकुडफाटा गोळा करुन त्याचा इंधन म्हणून वापर करतात. लाकडाची व इंधनाची गरज भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या वृक्षांची लागवड केली जात नाही ही समस्या लक्षात घेवून भारतीय वनखात्याद्वारे इ.स.१८८८ साली राष्ट्रीय वन धोरणाची आखणी केली गेली.

उर्ध्वपतन व साद्रीभवन क्रियांद्वारे जलचक्र, जलसंसाधन प्रणाली टिकवून ठेवते या प्रक्रियाद्वारे.

**जागतिक अन्न समस्या :–**जगातील अनेक विकासनशिल देशात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे पण त्या प्रमाणात अन्नधान्याची निर्मिती त्या देशात होत नाही. जगातील १०५ विकसनशील देशांपैकी ६४ देशात अन्नधान्य उत्पादनाची मात्रा त्या देशात वाढत असलेल्या लोकसंख्येच्या दरापेक्षा खूपच कमी आहे. या देशात आधुनिक शेतीचे तंत्र नसल्यामुळे या विकसनशिल देशात अधिक अन्नधान्याची निर्मीती होवु शकत नाही.

देशातील शेतीयोग्य जमिनीचा अधिक प्रमाणावर वापर केला जात आहे. या प्रमाणात जर वापर होत राहिला तर या जमिनी नापिक बनू शकतात. देशातील जंगले, गवताळ प्रदेश व दलदलीचे प्रदेश शेतीखाली आणल्यामुळे या परिसंस्थाचा नाश होत आहे. त्यामुळे अनेक पर्यावरण विषयक समस्या निर्माण होत आहे. अधिक प्रमाणात मासळी पकडल्यामुळे समुद्रातील तसेच देशांतर्गत जलस्त्रोतांतील मासळी नष्ट होत आहे. आदिवासी लोकांच्या अनेक जमाती कुपोषणाची शिकार होत आहे. कारण त्यांना अन्नधान्य उपलब्ध होवु न शकल्याने स्त्रिया व विशेषत: बालकांत कुपोषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

या गतीने जर पर्यावरण विषयक समस्या निर्माण होत गेल्या तर भविष्यात जरी लोकसंख्या वृध्दिचा दर कमी झाला तरी लोकांच्या गरजा कशा भागविल्या जातील ही एक गंभीर समस्या निर्माण होवू शकते. नद्या, तळी अशी जलसंसाधने निर्माण होतात. दलदलीचे प्रदेश हे जलपरिसंस्था व भूपरिसंस्था या दरम्यानचे प्रदेश असतात. या प्रदेशात दमट वातावरणाशी जुळवून घेवु शकणारे प्राणी – वनस्पती वास्तव्य करतात. जलपरिसंस्थांचा वापर लोकांद्वारे आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी केला जातो. पिण्यासाठी लागणारे पाणी, कपडे धुण्यासाठी लागणारे जलसाठे, गुरांना पिण्यासाठी लागणारे पाणी व जमिनीचे सिंचन करण्यासारठी अशा अनेक बाबींसाठी पाण्याचा वापर केला जातो.

जलसाठ्यांचे योग्य नियोजन कसे करावे हे आधुनिक जगापुढील या शतकातील सर्वात मोठे आव्हान आहे. भारतात पाण्याच्या उपलब्धतेवरुन निर्माण होणारे तंटे राज्य सरकारात वाढत आहेत. आज जगातील अनेक भागात जनतेच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारे पाणी उपलब्ध होणे दुरापास्त होत आहे. एकीकडे पाण्याचे दुर्मिळता आहे तर दुसरीकडे पाण्याचा गैरवापर केला जात आहे. अनेक लोक आवश्यक पाण्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाण्याचा वापर करतात. शेतीसाठी अधिक प्रमाणात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर केल्यामुळे हे पदार्थ वाहत्या पाण्यात तसेच भूगर्भिय जलसाठ्यात जावून जलसाठे प्रदूषित करतात. औद्योगिक प्रक्रियांद्वारे निर्मित प्रदुषके जलसाठ्यात सोडली जातात.

**जलविद्युत :–**जलविदयुत उर्जेची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेती व वने पाण्याखाली जातात या जमिनीवर स्थानिक रहिवाशांचे जीवन अवलंबून असल्यामुळे तलाव निर्माण होणे, धरणांच्या निर्मितीमुळे विस्थापित झाले त्यांचे पुनर्वसन करणे ही एक गंभीर समस्या आहे. या समस्येचे निराकरण सहजासहजी होवू शकत नाही. बहुतेक धरण प्रकल्पाद्वारे विस्थापीत लोकांच्या पुर्नवसनाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**अणुशक्ती :–** अनुकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे ही पर्यावरणाविषयक गंभीर समस्या आहे नविन अणुउर्जा प्रकल्पाची उभारणी करतांना आर्थिक तसेच पर्यावरणविषयक परिणाम विचारात घेतले जात नाही. अणुउर्जामुळे अनेक लोकांमध्ये आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. कॅन्सर सारख्ये रोग निर्माण करणाऱ्या किरणोत्सारी पदार्थामुळे पुढील कित्येक दशके अणुदूषीतनेचे घातक परिणाम भोगावे लागतात.

विषारी पदार्थामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरण व आरोग्य विषयक समस्या उद्भवतात बहुतांशी घातक विषारी टाकाऊ पदार्थ विल्हेवाट लावण्यासाठी जमिनीवर किंवा जमिनीत टाकले जात असल्यामुळे भूगर्भजल प्रदुषणाची गंभीर समस्या निर्माण होते.

❑ ❑ ❑

# २१ व्या शतकातील युवकांचे योगदान

**प्रितम जनार्दनराव पडोळे,** एम.कॉम. भाग १

२१ व्या शतकात युवकांचे योगदान म्हणजे जळत्या निखाऱ्यावरील भडकलेली आग आहे. इतिहासात डोकावत असताना आम्हाला जाणवते की, देशातच नव्हे, तर जगात क्रांती घडवण्याचे काम जर कोणी केले असेल तर ते युवकांनी मग ते छत्रपती शिवाजी महाराज असो, त्यांचे पूत्र संभाजी महाराज, शहीद भगतसिंग असो की, जर्मनीचा हिटलर तसेच तमाम युवकांचे प्रेरणास्थान डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम असोत यांचा संदर्भ यासाठी द्यावा लागत आहे की, वर्तमान काळात जगत असतांना भुतकाळात घडलेल्या घटनांचा अभ्यास करुन भविष्याचा वेध घ्यावा लागतो आणि हा वेध घेण्याचे काम नेहमी युवकांनी केले आहे.




आज युवकांची भूमिका केवळ बघ्याची नाही तर निर्णय घेण्याची सुध्दा झाली आहे. या भारतासारख्या सेक्युलर आणि लोकशाही देशात आज राजकारणाच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणात सजग झालेला आहे. अलिकडील उदाहरण म्हणजेच अण्णा हजारेंच्या आंदोलनात अधिक सक्रिय झाला. आंदोलनाला पाठिंबा मिळावा म्हणून रस्त्यावर जावून, लोकात जावून आंदोलन वाढविले आणि येवढेच नाही तर देशभरातून आणि जगातून पाठींबा मिळविण्यासाठी अण्णाच्या आंदोलनाला सोशल मिडियाच्या माध्यमातून पाठींबा जर मिळविला असेल तर तो या २१ व्या शतकातील युवकांनी.

आजचा युवक हा निर्णयक्षम बनलेला आहे. स्वत:ची भूमिका घ्यायला लागलेला आहे. मागच्या काही वर्षामध्ये जातीयतेमध्ये पुढे असलेला तरुण आज जातीय सलोखा कसा निर्माण केला जाईल या मध्ये व्यस्त असतांना दिसत आहे. कधीकाळी राजकारणाला कदापीही वळून न पाहणारा तरुण आज २१ व्या शतकामध्ये महत्त्वाची भूमिका निभावताना दिसत आहे. आयटीआय क्षेत्रात काम करणारा तरुण राहुल गांधी, नरेंद्र मोदी, शरद पवार यांचा फोटो, मोबाईल , संगणक याच्या स्क्रीनवर ठेवतो आणि त्या उद्देशाने काम करतो. स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी किरण बेदी, विश्वास नागरे पाटील अशा व्यक्तीची फोटो ठेवत आहेत. एवढेच नाही तर युवकांनी चळवळी मध्ये सुध्दा काम केलेले आपल्याला आढळून येते. म्हणून युवकांबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेमध्ये म्हणतात की,

*आजचे सात सात बालक।*
*उद्याचे तरुण कार्यकर्ते होतील ।।*
*गावाचा देशाचा पांग फेडतील।*
*उत्तम उत्तम गुणांनी ।।*

❑ ❑ ❑

# आयुष्यासाठी पुस्तक

चुक ही आयुष्याच पान आहे,
पण, नाती म्हणजे आयुष्याच पुस्तक आहे
गरज पडली तर चुकीच पान फाडुन टाका।
पण, एका पानासाठी अख्ख पुस्तक गमावू नका ।।१।।

पुस्तक.... पुस्तक म्हणून आपण
आपल्या डोक्याला ताण देतो.
पुस्तकातील ज्ञान घेतल्याविणा।
आपण आपल आयुष्य सोडून जातो ।।२।।

पुस्तक हे मनुष्याला घडवितो,
आणि माणूस समाजाला घडवितो
शेवटी माणुस आणि समाज या
दुहेरी भूमिकेला पुस्तकच घडवितो ।।३।।

पुस्तकाशिवाय माणसाला पर्याय नाही
पुस्तकशिवाय आयुष्यात मजा नाही
कारण
पेपरमध्ये पुस्तकाशिवाय नविन काही येत नाही
शेवटी अभ्यासक्रम कोणताही असो,
पण पुस्तकाशिवाय माणसाला पर्याय नाही
चुकीच्या पासवर्डमुळे एक छोटासा मोबाईल
सुध्दा खुलत नाही, हे जेवढ खरं आहे तेवढच
खरं आहे की पुस्तकाशिवाय माणसाला जगणं
कळत नाही.

मित्र साथ सोडतात पण पुस्तक कधिच
साथ सोडत नाही, आपण नोकरी
लागल्यावर पुस्तकांची साथ सोडतो,
पण गरज भासल्यावर आपण पुस्तकाकडेच
वळतो, कारण पुस्तक हे आपल्या आयुष्यातलं
सर्वात मोठ बळ आहे.

**कु. श्रुती रामदासराव महल्ले**
बी.ए. भाग ३

# आई

आई कोठे आहेस ग तू
मला भेटत का नाहीस
लोक म्हणतात आहेस तु देवापासी
मग मला दिसत का नाहीस....

आई कोठे आहेस ग तू
ये गं आई माझ्याजवळ
मला तुझी खुप आठवण येते
तुझी आठवण आल्यावर
माझ्या डोळ्यातून पाणी येते

ऐक आई ऐक
विनंती तुझ्या मुलीची
आठवण येत नाही का ग
तुला तुझ्या कोमल फुलांची

आई कोठे आहेस ग तू
आई तू होतीस मायेची माऊली
आई तू होतीस छायेची सावली
मी त्रास दिला म्हणून
आई नाही ना रागावली

आई तुझ्याशिवाय माझं
पालन कोणी करत नाही
तुझ्याशिवाय आई माझ्या
मुक्या तोंडी घास भरत नाही
आई कोणास म्हणू मी आई
तुझ्याशिवाय मला कोणीच नाही

आई कोठे आहेस ग तू
मला भेटण्यासाठी तुझ्या देवाला
कर विनंती तुझ्या मुलीसाठी
नको घेवुन जाऊस तुझ्याबरोबर
भेटायला तर ये मला

तु जर येणार नसशील
तर आवाज तरी दे मला
आई कोठे आहेस ग तू
मला भेटत का नाहीस

**ज्योती प. मरकाम**
बी.ए. भाग ३

# समाज सुधारकांना समजून घेताना

**कु. भारती पांडुरंजी अडमासे,** बी.ए. भाग ३

*''नावे ठेवणे सोपे, पण नाव कमविणे कठीण गोष्ट आहे''*

समाज सुधारकांना समजुन घेताना त्यांनी समाजाकरिता जी धडपड केली, त्याचा पूर्ण वृत्तांत जाणून घेणे गरजेचे आहे. बुध्दीमत्ता ही माणसाला लाभलेली सर्वोत्तम देगणी होय. जो ह्या बुध्दीचा चांगल्या प्रकारे उपयोग करतो त्याच्यामध्ये ह्या समाजाला बदलण्याची ताकद जिज्ञासू भावना असते. मानवाच्या ज्ञानाच्या प्रगतीवर देशाची गती अवलंबून असते. याचा अर्थ असा की, ज्या व्यक्तीजवळ ज्ञान आहे तो आपल्या देशाची प्रगती साध्य करुन दाखवितो कारण ज्ञान हे शिक्षणाने वर्जित केल्या जात असते. शिक्षण हे फक्त शाळा कॉलेज मधुनच नाही तर समाजातील व्यक्तींसोबत वापरल्यानंतर ते आपोआपच ध्यानात येते. हे ज्ञान घेतल्याने समाजाचा, देशाचा विकल्प होणार नाही त्याकरिता आपल्याला हे ज्ञान वर्जित करुन त्याला आकार द्यावा लागेल ह्या ज्ञानाला आकार देणे म्हणजे समाजात बदल घडवून आणणे होय. हे सामाजिक बदल एकदमच घडुन येत नाही यांना खुप काही सहन करावे लागते. ज्ञानाला आचरणात आणण्याकरिता समाजाची निंदा सहन करावी लागते.



''टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही'' समाजसुधारकांनी समाजात जर बदल घडवून आणाचा असेल तर समाजातील लोकांचे दोषारोपण सहन करावेच लागते. जेव्हापर्यंत माणुस हा जमीनीवर पडत नाही तेव्हापर्यंत मनुष्याला स्वतःचे व त्या धरतीचे महत्त्व वाटत नाही अशा या समाज सुधारकांना समजून घेताना लक्षात येते की, समाज सुधारक निर्माण करण्याची गरज नाही ते स्वतःहून घडत असतात.

*''गुरुब्रम्हा गुरुविद्या गुरुदेवो महेश्वर :।*
*गुरु:साक्षात परब्रम्ह तस्मे: श्री गुरुवे नम:।।*

आपल्या भारत देशामध्ये ,खुप समाज सुधारक होवुन गेले आहेत. त्यामध्ये आपण राजे महाराज्यांचाही उल्लेख करु शकतो. आधिच्या काळात सर्व सत्ताही राजाच्या हाथी एकवटलेली होती. समाजात राजा आपल्या प्रजेबद्दल जशा भावना बाळगत होता. तशा प्रकारचे समाजात वर्तन होत होते. परंतु आज आधुनिक युगामध्ये पूर्णत: बदल झालेला दिसून येतो. परंतु आज सर्व सत्ता ही समाजातील लोकांच्या , नागरीकांच्या हाती आहे असे आपणास म्हणता येते. नागरिकच आता व्यक्ती समुदायाचा स्वत:चा सर्वागीण विकास कसा होईल ही पूर्णत: माहिती मानवाला आहे. हा येवढा मोठा बदल कसा काय घडला? असे प्रश्न चिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. कारण हा पूर्ण बदल म्हणजे समाजसुधारकांची देण होय. ह्या सर्व सुधारणा जे मानव ह्या धरतीवर होवून गेले त्यांनी असिम पीढा सहन करुन हे बदल घडूवन आणलेत.

''खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'' असे सांगणारे साने गुरुजी हे सुध्दा समाज सुधारक आहे. ते म्हणतात, आपला मानव धर्म एकच तो म्हणजे सर्व व्यक्तीना समान व प्रेमाने पाहणे. कुणाचाही द्वेष , राग नकरता सगळ्यावर प्रेम करणे . मोहनदास करमचंद

गांधी हे स्वातंत्र्याकरिता झटले. लोकांना ह्या समाजाला अंधाराच्या कोठडीतून बाहेर काढण्याकरिता जे त्यांनी अथक प्रयत्न केले ते हे समाजसुधारक आणि स्वातंत्र्याची ज्वाला संपूर्ण भारत भूमीवर पोहोचविणारे भगतसिंग, चंद्रशेखर आजाद, सुखदेव व राजगुरु, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा कित्येक व्यक्तींनी ह्या देशाला अंधारातून उजेडामध्ये सुर्याचा नवा प्रकाश, स्वतंत्र्य जिवनाचा आभास करुन देण्यासाठी आपल्या जिवाचा त्याग केला. 'ज्ञान नाही विद्या नाही ते घेणेची गोडी नाही, बुध्दी असुनी चालत नाही. तयास मानव म्हणावे का?' असा महत्त्वपूर्ण प्रश्न आपल्या काव्यातून निर्माण करुन आज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या दिनांना मार्ग दाखविणाऱ्या खरी खुरी विद्येची दैवत असणाऱ्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले व त्यांचे पती महात्मा जोतीबा फुले ह्यांनी स्त्रियांना शिक्षण उपलब्ध करुन दिले व समाजातील लोकांचे दगड, चिखल, वाईट वार्ता ऐकून सुध्दा आपला मार्ग न सोडणाऱ्या समाजसुधारिका सावित्रीबाई फुले यांना समजून घेताना नमन करण्याचे विचार मनात येतात. परंतु ते व्यक्ती आता नाही आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश समाजातील अस्मीता जागविणारा पहिला महामानव, भारतीय घटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदे पंडित, अलौकीक बुध्दीमता लाभलेले महान व्यक्तीमत्व आहे. महामानवांकडून खूप काही शिकायला मिळते. त्यांनी जे काही केलेत ते समाजाकरिता भावी पिढीकरिता या सर्व समाजसुधारकांना सत सत नमन ।

आपल्या काव्य, कथा, आत्मचरित्र, लेख, सुविचारांमधून मानवाच्या ह्या समाजाच्या मनात चांगले विचार निर्माण करणारे कवी, संत हे पण समाजसुधारक म्हणून पाहावयास मिळतात. त्यांना समाजास नवा विचार व दिशा दिली.

*''निर्मिके निर्मिला मानव, पवित्र, कमी, जास्त सूत्र बद्धीमध्ये ।*
*पिढीजात बुध्दी नाही सर्वामधी, शोध करा अधी पुर्नपणी।।*
*धर्म राज्य भेद मानव नसावे, सत्याने वागावे ईशासाठी।*
*ख्रिस्त, महंमद, मांग, ब्राम्हणायशी, धरावे पोटाशी बंधुपरी।।*
*निर्मिकाचा धर्म सत्य आहे, एक भांडणे अनेक कशासाठी''*

ह्या समाजात वावरणारा माणूस पवित्र, निष्पाप असतो, परंतु त्यांचे मन, बुध्दी यामध्येच चांगले आणि वाईट विचाराचा समावेश होत असतो. सर्व मनुष्यावर अवलंबून असते की तो कोणते विचार स्वतःमध्ये ओढून घेणार, त्यांचे आचरण करणार, त्याकरिता त्याला स्वत:चे चिंतन करणे गरजेचे असते. मानवाने दुसऱ्या मानवाबद्दल कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सत्याने व प्रेमाने त्या ईश्वराकरवी आपल्या माता पित्या करिता चांगल्याने राहावे. कोणत्याही व्यक्तीस भेदभाव नकरणे असे समाजसुधारक शिकवून गेलेत त्यामुळे कोणत्याही प्रकारचे भांडणे करण्यास अर्थ नाही असे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते.

लोकहितवादी, समाजसुधारक यांना समजून घेतांना शिक्षण, प्रचार, अनिष्ट प्रथा, परंपरा यांना नष्ट करण्याचे कार्य, स्त्रियांना पुरुषाप्रमाणे अधिकार प्राप्त करुन देण्याकरिता कार्य केले. वृत्तपत्रांच्या सहाय्याने समाजसुधारणा करण्याचे कार्य त्यांनी केले. अनेक धर्माचा, भाषेचा अभ्यास करुन समाजसुधारकांनी सर्व लोकांच्या मनात समाजसुधारणाची भावना, त्यांची ज्वाला पेटविण्याकरीता कार्य केले. अनेक वर्षापासून स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, दासीप्रथा, देवदासी, वेश्यावृत्ती अशा अनेक अन्यायाला बहिष्कृत करण्याचे कार्य समाजसुधारकांनी केलेत. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे वागण्याचे व बरोबरीने राहणे सर्व अधिकार पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करण्याचे, महत्त्वाची सुधारणा समाजसुधारकांनी घडवून आणली आहे. त्यांचे केलेले हे कार्य आज आपणास दिसून येते. समाजात बदल घडवून आणलेत साम्राज्यवाद, वसाहतवाद, भौतिकवाद, जागतिकवाद, आधुनिक जगात आज आपणास अभ्यासातून शिकायला मिळते. भूतकाळ कसा होता हे आपल्यास वर्तमानात माहित होते आणि भविष्य कसं राहील यांचा विचार ही वर्तमानात विचार केला जातो. समाजसुधारकांनी जे बदल घडविण्याचे स्वप्न पाहिले होते ते आजच्या आधुनिक काळात पूर्ण झालेत हे सर्व पाहून त्यांची आत्मा शांत झाली असेल असे त्यांचा विचार करुन लक्षात येते. या समाज सुधारकांना समजुन घेतांना त्यांचे विचार, आचरण लेख, कविता इ. सर्वांचा अभ्यास केल्याने हेच ध्यानात येते की, त्यांनी जे आपणाकरिता केले त्यांचे सोने करणे आपली जबाबदारी आहे.

*''देऊनी गेले स्वप्न तयाचे, घ्यावे ह्या समाजजीवाने,*
*अंधाऱ्या स्वप्नांना नेवू प्रकाशाच्या दिशेने*
*ज्याने समाजपरिवर्तन होई, मानवाचे व देशाचे कल्याण*
*सौराष्ट्र चमकणारा होईल प्रकाशमय सुर्यासारखा ।।''*

❑ ❑ ❑


# करिअर घडविताना

**कु. दिपाली वि. कवाडे,** बी.ए. भाग ३

आपण ज्यावेळी स्वत:च्या विकासाचा मार्ग निर्माण करतो. स्वत:च्या अपेक्षांचा मार्ग निर्माण करतो. आकांक्षाचा मार्ग निर्माण करतो, महत्त्वाकांक्षाचा मार्ग निर्माण करतो, त्यावेळी एक गोष्ट सगळ्यात महत्त्वाची असते. पहिल्यांदा आपल्याला काय व्हायचं आहे हे आपल्याला मुलत: ठरवता आलं पाहिजे.

यशस्वी ते होतात जे अर्जुनासारखे फक्त ''पंक्षाच्या डोळ्यावरच नजर ठेवतात'' त्यांना दुसर काहीही दिसत नाही ती सगळ्यांत मोठी एकाग्रता ज्याला साधता आली, ज्याला ध्येयाच केंद्रीभूत होता आले तो नक्कीच यशस्वी ठरेल म्हणून एकदा ठरवून ह्या आपल्या क्षमता काय आहे आपण काय करु शकतो स्वत:चीच स्वत: ओळख करुन घ्या.

ज्या दिवशी माणूस स्वत:ला स्वत: ओळखेल त्या दिवशी त्याला कळले की आपल्याला काय करायचे आहे. ज्यावेळी ज्या क्षेत्रामध्ये जोपर्यंत आपलं पाऊल पडत नाही त्यावेळी तिथलं आपल्याला काहीच जमत नाही आणि आपल्याला ते जमत असलं तरी ते आपल्याला जमवायंचच नसतं. कुठल्याही क्षेत्रात जायचे असेल तर पहीले हे ठरवा की, ते आपल्याला आवडते का आपण पूर्ण तन, मन, धनाने त्यात उतरणार आहोत का? आणि ध्येयापर्यंत पोहाचल्याशिवाय आपण माघार घेणार नाही? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं जर होय मिळाली तर प्रवासाला सुरुवात करा. अन्यथा उपयोग नाही. 'संयमाची दाराशीच यश वाट बघत असतो आणि एक गोष्ट लक्षात ठेवा न्युनगंड तो पहिले बाजुला काढा की, मला इंग्रजी येत नाही, मला हे जमतंच नाही इंग्रजी सचिन तेडुलकरांना पण येत नव्हती पण बारावीच्या पुस्तकामध्ये सचिन तेंडुलकरचा इंग्रजी मध्ये धडा आहे ''गर्दीतले होवून जावू नका आपल्या मागे गर्दी कशी तयार होईल'' असं काही तरी करा त्याला करीयर म्हणतात. ''करियर घडविताना संकट आपल्याला अडवायला कधीच येत नाही. संकट येते ते आपली उंची वाढवायला'' ते घडवतात तर मराठीच्या प्रश्न प्रत्रिकेतल्या वाक्याचा काळ उत्तर पत्रिकेमध्ये बदलता येतो पण वास्तविक जिवनातला काळ हा न पुढे आणता येतो न माग नेता येतो ही सगळ्यात मोठी गोष्ट आहे. आवडीचे करियर करा असे सगळेच जण सांगतात पण असे करियर प्रत्येकाला मिळत नाही केवळ पाच ते दहा टक्के जनानांच मिळत असते. इतरांना जे मिळेल त्यातच आनंद मानावा लागतो. त्यापुढे जाऊन मी सांगतो जे करियर म्हणून स्वीकारा त्यातच आवड निर्माण करा. निश्चित यशस्वी व्हाल. उद्योगी व्यक्तीमत्व असेल तर सायन्स ऐवजी कॉमर्स निवड योग्य ठरेल. बी.कॉम नंतर सीए म्हणजे कंपनी सेक्रेटरीचे क्षेत्र उत्तुंग ठरेल. जेव्हा स्वत:ला झोकून देत साधना कराल, तपश्चर्या करीत करियर बनवाल. तर करियर होईल, करियर बिल्टअप तर त्यापुढे होते प्रवेशानंतरची इव्हॉल्मेंट महत्त्वाची. आजकालचे पालक थेट विचारतात गॅरेटेंड, स्कोप कशात आहे ते सांगा. काम करताना चेहऱ्यावर स्माईल येत असेल तर त्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना निश्चित स्कोप आहे असे समजावे. ''करियर मध्ये आपली इमेज अशी बनवा



की, बाकीच्यांनी स्टेटस टाकण्यासाठी आपला फोटो वापराला पाहीजे. करियर घडवत असतांना रोज स्वत: पाच वाक्य स्वत:साठी म्हणा. १) मी सर्वोत्कृष्ट आहे, २) मी हे करु शकतो, ३) देव नेहमी माझ्या सोबत आहे, ४) मी एक विजेता आहे व ५) आज माझा दिवस आहे.

करियर घडविताना येणाऱ्या संकटावर अशा प्रकारे तुटून पडा की, जिंकलो तरी इतिहास आणि हरलो तरी इतिहासच घडला पाहीजे. आयुष्यामध्ये वाईट काळ चालू असेल तर आयुष्याचे पुस्तक बंद करु नका. फक्त पान बदला आणि नव्याने घड्यापासून सुरुवात करा. करियर घडवितांना या सर्व गोष्टी आचरणात आणायला पाहीजे. त्याचवेळी आपल्याला आपले करियर घडविताना अडचणी जाणवणार नाही. नेहीमी छोट्या–छोट्या चुका सुधारल्या पाहिजे, कारण माणसाला डोंगराने नाही तर एका लहान दगडानेच ठेच लागते. करियर घडविताना ''ज्या क्षेत्रात आपण जो पर्यंत रिस्क घेत नाही तो पर्यंत तुम्ही फरफेक्ट होवु शकत नाही. करियर घडविताना स्वत:ला अस सांगा की, ''मला जे बनायच आहे ते एका दिवसात होणार नाही पण एक दिवस ते नक्कीच होणार.'' हाच यशस्वितेचा श्वाश्वत मार्ग होय.

❑ ❑ ❑

## चांदणी

झळीने उन्हाच्या जरी बेजार केले
दिसभर या नभाने देहास गार केले

डोक्यात जिवघेना माझा ही डाव होता
तू हासता जरासी काळास पार केले

वाहून नेत होतो, मी पालखी सुखाची
धुंदीत आपल्यांनी कौतुक फार केले

थोडा कुठे मी अडलो, थोडा कुठे पहुडलो
बेशर्म माणसांनी पाठीत वार केले

दुनियेत श्वापदांच्या, तू हाक दे मनाला
बुरख्यात लांडग्यांनी जरी दंश फार केले

किर्र रात्रीची ग टपोर चांदणी तू
ह्दयात ठेवण्या मी कोरुन दार केले

**कु. गौरी चंद्रशेखर जाणे**
बी.ए. भाग ३

## हसणे

हसणे म्हणजे काय असते
जगण्याचं मोल चुकवायचे असते
हसण्याला कुणाचे बंधन नसते
शरिराच्या कणाकणात
संजीवनी देत असते.

क्षणात हसणे तर क्षणात रडणे
प्रत्येकाच्या कर्माचे भोग असते
हसण्याची कला अवगत असते

जगावे कसे हे
हसून सांगायचे असते
निराशा जगण्याच ओझं असते
तर हसणे जीवनाच्या आशेचा किरण असते

**कु. नुतन गजाननराव इंगोले**
बी.ए. भाग ३

## नशीब

जी माणसं नकोशी वाटतात
ती माणसं भेटत नाहीत
जर माणसं नकोशी वाटतात
त्यांच्या सहवास संपत नाही
ज्यांच्याकडे जावसं वाटतं
त्यांच्याकडे जायला जमत नाही
ज्यांच्याकडे जाऊ नये असं वाटतं
त्यांच्याकडे जावचं लागतं
जेव्हा जीवन नकोसं वाटतं
तेव्हा काळ संपत नाही
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो
तेव्हा काळ संपलेला असतो
नशीब हे असंच असतं
त्याच्याशी जपुनच वागावं लागतं
तिथं कुणाचंच चालत नाही
जिथे नेईल तिथं जावच लागतं

**कु. आशा हि. गिरारे**
बी.ए. भाग ३

# संत गाडगे बाबांचे सामाजिक कार्य

**कु. माधुरी प्रकाशराव पाचारे,** बी.ए. भाग ३


महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वरांपासून सुरु झालेली ही परंपरा आजही अखंडीत आहे. संत गाडगे बाबा हे या मालिकेतील एक महत्त्वाचे मौलिक संत. अगदी सामान्य घरात जन्मलेल्या, शिक्षणाचे विशेष संस्कार नसलेल्या या महात्म्याने एवढे अमूल्य विचार लोकांपुढे मांडले की, आपला विश्वासच बसत नाही.

दि.२३ फेब्रुवारी १८७६रोजी अमरावती जिल्हातील शेणगाव या गावी एका परिटाच्या घरी गाडगे बाबांचा जन्म झाला होता. त्यांचे मुळ नाव होते डेबूजी, त्यांच्या वडिलाचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई . वडिलांना दारुचे व्यसन असल्यामुळे त्यांच्या घरात कायमचे दारिद्र्य होते. त्यात वडिलांचा अकाली मृत्यू झाल्यामुळे हे माय लेकरु अनाथ झाले व छोटा डेबूजी आपल्या आईसह मामाकडे राहायला गेला. डेबू मामाकडे शेतात खूप कष्ट करत असे. पण या मामाच्या शेतावर सावकाराने जप्ती आणली. निरक्षरतेमुळे सावकाराने मामाला फसवले होते. हे डेबूने जाणले. त्यामुळे स्वत: शिकलेला नसतानाही त्याला शिक्षणाचे महत्त्व उमगले. आपले उर्वरित आयुष्य हे त्यांनी सामाजिक प्रबोधनासाठी वेचले. या प्रबोधनासाठी ते भजन, किर्तन, प्रवचन हा मार्ग वापरत.

इ.स.१९१२ रोजी त्यांचा विवाह झाला होता परंतु ते संसारात कधी रमलेच नाही ते नेहमी अंगावर फाटकी गोधडी घेत त्यांच्या हातात गाडगे असे म्हणून लोक त्यांना 'गाडगे महाराज' किंवा गोधडे महाराज' म्हणत. ते कधीही एका जागी जास्त काळ राहत नसत. कष्ट केल्याशिवाय कोणाकडून भिक्षाही स्वीकारत नसत.

त्यांच्याजवळ नेहमी झाडु असे आणि स्वत: झाडण्याचे काम करताना ते सर्वांना स्वच्छता राखण्याचा उपदेश करत. अगदी सामान्य लोकांच्या जीवनातील उदाहरणे देत. कितर्नाच्या माध्यमातून लोकांना उपदेश करीत असत.

स्वच्छता, प्रामाणिकपणा व भूतदया यावर त्यांचा विशेष भर असे. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते गरिबांना वाटुन टाकत. त्यांना मिळालेल्या धनातुन त्यांनी यात्रेकरुसाठी धर्मशाळा बांधली. लक्ष्मीनारायणाचे मंदिर बांधले, नदीवर घाट देखील बांधले. अनेक ठिकाणी त्यांनी गोसंरक्षण संस्था उभारल्या. स्वत:साठी त्यांनी कोणाकडून कधीही काहीही घेतले नाही वा कधी कोणालाही शिष्य केले नाही. लोक जागृतीचे व लोकसेवेचे काम करत असताना प्रवासातच अमरावतीजवळ इ.स.१९५६ त्यांचे देहावसान झाले. असा हा महान सेवाभावी संत होता.



❑ ❑ ❑

# मानवता हिच माणसा तुझी ओळख

**कु. पूनम वि. पाटील,** बी.ए. भाग २

मला अस वाटते का हे जग स्वार्थी आहे . मी या जगाला स्वार्थी का मानते कारण....

रक्ताचे पाणी करुन आपल्यासाठी झिजणारे ते सैनिक देशासाठी तन,मन,धन पूर्णतः अर्पण करतात आणि आपण काय करतो? आपले तन, मन, धन एका देवळातल्या देवाच्या सेवेसाठी अर्पण करतो. माणसाच्या प्रेताला हात लावला त माणूस बाटतो आणि जिवनात प्राण्याला मारुन खातो. देवळात जावुन लाखो रुपया एक दगडाच्या हवाली करतो आणि देवळाबाहेर बसलेल्या भिकाऱ्याला थोउ अन्न दान करायला आपली इज्जत कमी होते.



मित्रांनो विचार कराची गोष्ट आहे की, जशी आपले आई–वडील आपली रक्षा करतात तसेच सैनिक आपल्या देशासाठी रक्षा करतात. दिवस असो की रात्र असो का दिवाळी, दसरा, होळी का बरं आपण आनंदाने साजरी करु शकतो. कारण बॉर्डरवर खांबा प्रमाणे सर्तक आपले डोळे टिपतात. मरणाच्या दारात उभे राहुन आणि हसत हसत संदेश देतात तुम्ही झोपा आम्ही जागे आहे. आपल्याला आपला देश तेव्हाच आठवतो जेव्हा १५ ऑगस्ट राहते तेव्हा झेंड्याला सलामी दिली. बस झालं आपले देशावरती प्रेम तेवढच मर्यादित राहते. एका सैनिकाची आई होऊन पहा ज्याची बहीण होवून पहा, मग समजेल तुम्हाला स्वातंत्र्य काय चीज आहे. स्वत:च्या परिवाराची, स्वत:च्या जीवाची परवा न करता आपल्या एका आनंदाच्या क्षणासाठी मरणाच्या दारावर गोळ्या झेलत राहतात. एखादा सैनिक मरतो त्याला दफन करण्यासाठी तिरंगा देतो ही गर्वाची गोष्ट आहे. एक सैनिक दुसऱ्याचा जिव वाचवता वाचवता मरतो आणि किती शरमेची गोष्ट आहे की, आपण छोट्या छोट्या शिल्लक गोष्टीसाठी एकमेकांचा जिव घेतो. जेव्हा माणुस मरतो तेव्हा लाश समोर आणि माणसे मागे राहतात आणि लग्नाच्या बाबतीत नवरदेव मागे आणि माणसे समोर राहतात.

लोक दु:खात मागे आणि सुखात समोर राहतात किती स्वार्थी आहे जग. म्हणूनच म्हणते, ‘मानवा मानवता हिच तुझी खरी ओळख.’

❑ ❑ ❑

# मातृभाषा आणि शिक्षण

**कु. तन्वी ज्ञानेश्वरराव राऊत,** बी.ए. भाग १

जगामध्ये एकुण सर्व शिक्षण तंक्षामध्ये मानसशास्त्रामध्ये आणि भाषाशास्त्रामध्ये अजिबात दुमत नाही. मातृभाषा ही सर्वात श्रेष्ठ भाषा आहे मातृभाषेतून शिकल्यानंतरच बौद्धिक विकास चांगला होतो. याबाबत जगातील तज्ज्ञांचे एकमत आहे. त्याचे कारण असे की, बौद्धिक विकासात भाषेची भूमिका खूप महत्त्वाची असते. म्हणून जितके जास्त प्रश्न विचाराल तितके त्याला अधिक ज्ञान प्राप्त होते, तितका जास्त विकास होतो. आताची मुले प्रश्न विचारत नाही, त्याला प्रश्न विचारायला प्रवृत्त करणारे शिक्षण असले पाहीजे. दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात एक त्याची भाषा क्षमता आणि त्यामुळेच नैसर्गिक मातृभाषेवर त्याचे लवकर प्रभुत्व पडते म्हणून ते घरामध्ये तिसऱ्या, चौथ्या वर्षापासून प्रश्न विचारायला लागतात आणि पुढ ते आठ नऊ वर्षापर्यंत शिक्षकांना अनेक प्रश्न विचारतात आणि त्याला त्यातुन ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे मातृभाषेतून प्रश्न विचारणे आणि त्याची उत्तरे मातृभाषेतून मिळणे हे त्याच्या ज्ञानात भर पाडणाऱ्या गोष्टी आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे कुतूहल, जिज्ञासू वृत्ती महत्त्वाची असते आणि ते जन्मापासून ते आठ नऊ वर्षापर्यंत मुलांमध्ये कुतूहल जास्त प्रमाणात असते यामुळे ते




जास्त प्रश्न विचारतात. मातृभाषेशिवाय अन्य माध्यमातून शिक्षण घेताना अनेक अडचणी निर्माण होतात. चौथ्या, पाचव्या वर्षी आता ती इंग्रजी भाषेची क्षमता किती? मातृभाषेतून प्रश्न विचारले असते पण तो इंग्रजी शाळेत आहे अशा वेळी त्याला प्रश्न विचारणे बंद होते आणि इंग्रजी भाषेतून प्रश्न विचारण्यासाठी त्याला पाच वर्षाची किमान वाट बघावी लागते कारण इंग्रजी भाषेची क्षमता त्याच्याकडे यायला पाहिजे आणि मग त्या वेळी पाच वर्षे अधिक पाच वर्षे इंग्रजी भाषा शिकणे म्हणजे दहाव्या वर्षी ते जा इंग्रजी भाषेमध्ये प्रश्न विचारु शकेल एवढी क्षमता येते. जिज्ञासा संपत आली असते हे माणसाच्या नियमानुसार मग यापुढे कपडे छान घालेल, कविता छान म्हणेल, दिसायला स्मार्ट दिसतील पण बौद्धिक क्षमता त्याची निश्चितपणे विकसित होत नाही. त्यामुळे आपली मुलं पालकाने इतर कोणत्याही माध्यमाच्या शाळेत घालण्यापेक्षा मातृभाषेच्या माध्यमाच्या शाळेतून शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करावे नव्हे, मातृभाषेमधूनच त्याला शिक्षण मिळावे.

❑ ❑ ❑

# पर्यावरण व्यवस्थापन

**कु. अंजली बाबाराव समरीत,** बी.ए. भाग ३

**पर्यावरण व्यवस्थापनाची गरज –** वाढत्या मानवी उपभोगानुसार नैसर्गिक संसाधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ज्यामुळे पर्यावरणही झपाट्याने बदलत आहे. अगदी कृषी अर्थव्यवस्थेतही मोठ्या प्रमाणातही शेती गुरांची अतिरेकी चराई व अतिरेकी मासेमारी पर्यावरणावर परिणाम करीत आहेत. यात पुढील परिणामांचा समावेश होतो.

**खनिज निर्मिती अथवा बांधकामांमुळे होणारा परिसंस्थाचा नाश –** परिसंस्थांच्या उत्पादनक्षमतेत घट. जसे की, शेतीच्या मातीतील पोषणमूल्यांचा ऱ्हास. प्रदुषणांमुळे होणारे विषसंचनयन ज्यामुळे परिसंस्थाच्या विविध चक्रांमध्ये अडथळा येणे.

जागतिक पातळीवर, हरितगृह वायूंच्या वाढत्या प्रमाणामुळे वातावरण बदल व सागरांचे आम्लीकरण दिसून येत आहे. या पर्यावरणीय बदलांचे घातक परिणाम मनुष्य व इतर प्राणिमात्रांवरही होतात. म्हणजेच लोकांचे राहणीमान त्यांचा विकास व पर्यावरणाचा दर्जा यांचा परस्परसंबध आहे, असे आपण स्पष्टपणे म्हणू शकतो. पर्यावरणीय व्यवस्थापण याचा अर्थ शब्दश: घेऊ नये हे व्यवस्थापण म्हणजे मानवाचा पर्यावरणाशी परस्परसंबंध व त्याच्या कृत्यांचे पर्यावरणावर होणार परिणाम यांचे व्यवस्थापन होय. पर्यावरण व्यवस्थापनाचा मूळ उद्देश म्हणजे मानवी कृत्यांचे परिणाम होणारे विघातक कमी करणे आहे.



भारतीय पर्यावणाच्या व्यवस्थापणास उच्चतम संस्था म्हणजे पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार हे खाते आहे. या खात्यांच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्यामध्ये भू-वापर (व्यवस्थापन), जलव्यवस्थापन, टाकाऊ वस्तूंचे व्यवस्थापन, वने व जैव विविधतेचे संरक्षण, पुनर्निकरणीय व प्रदूषणमुक्त उर्जा स्त्रोतांचा विकास अशा विविध बाबींचा समावेश होतो.

उदयोग जगातील पर्यावरण व्यवस्थापन हा वैशिष्टपूर्ण व खास कौशल्ये आवश्यक असा विषय आहे. कारखान्यातल विविध घटकांच्या पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाचा यात समावेश होतो. कारखान्याचे पर्यावरणावर होणारे सुक्ष्म व भावी घातक परिणाम कसे कमी करण्यात यावेत हे यात अभ्यासले जाते.

**पर्यावरण व्यवस्थापनाचे घटक :-**

**नीतीमूल्ये :-** निसर्गाशी एकात्मता, पर्यावरणाविषयी प्रेम व आदर, इतर मानवांचे सुखी जीवन व त्यांच्या हक्कांची जाणीव तसेच इतर प्राण्यांचेही मूलभूत अधिकार ही नैतिक मूल्ये मानवी कृत्यांवर व्यवस्थापणात महत्त्वाची भूमिका बजावतात.

आर्थिक क्रिया हा मानवी समाजाचा अनेक क्रियांपैकी फक्त एक भाग आहे आणि त्याचे महत्त्व समाजापेक्षा जास्त नाही. त्याचप्रमाणे मानवी

समाजही संपूर्ण पृथ्वीचा व पर्यावरणाचा एक छोटा भाग आहे.

मानवी अस्तित्व, विकास व भरभराट टिकविण्याच्या धडपडीत इतर समाज तसेच प्राणी व पर्यावरण धोक्यात येवू नये हा पर्यावरण व मानवी व्यवस्थापनाचा नैतिक पाया आहे.

पर्यावरण व्यवस्थापणास आवश्यक न्यायिक, आर्थिक व तांत्रिक नियम ठरविताना वरील तत्व पाळले गेले पाहीजे. भविष्यातील समस्यांचा परिणामांचा अंदाज प्रामाणिकपणे व अचूकपणे घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे हे परिणाम कमी करण्यासाठी धोरणे तयार करताना प्रामाणिकपणा दर्शविणे आवश्यक आहे.

**सामाजिक घटक :–** पर्यावरण रक्षणात मानवी समाजाला महत्वाची भूमिका बजावावी लागते, यात पुढील बाबींचा समावेश होतो.

**दक्ष व माहितीपूर्ण असणे :–** आपल्या सभोवताली व जवळच्या प्रदेशांत काय घडामोडी होत आहेत. याची माहिती नागरिकांनी बाळगली पाहिजे. याचा मोठा फायदा त्यांना स्थानिक पर्यावरणीय अवस्थापणात होवू शकतो. आपल्या सभोवतालचे विपरीत बदल वा परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी सतत दक्ष असले पाहीजे.

**सुधारणांना पाठींबा :–** घटनेने पीडित झालेल्या सर्व व्यक्ती, गट व संस्थाशी परिपूर्ण चर्चा करणे आवश्यक आहे यात स्थानिक प्रशासन, पीडित नागरिक आणि घटनेशी कारणीभूत असलेल्या व्यक्ती किंवा संस्थांचा कारणीभूत असलेल्या व्यक्ती किंवा संस्थांचा समावेश होतो. या चर्चामध्ये आपापसातील तंट्यांचे निवारण करणे आणि अद्यावत ज्ञान व तंत्रज्ञानासाठी बाह्य मदत घेणे यांचाही समावेश होतो. समस्या सोडविण्याच्या प्रयत्न करणे किंवा तिचा प्रभाव कमी करणे हे उद्दीष्ट त्यामागे असेल पाहिजे. भविष्यातील वर्तणुकीसाठी आवश्यक असलेली व दुष्पपरिणामांना तोंड देण्यासाठी आवश्यक असलेली धोरणे नागरिकांनी आखावीत ही चर्चा म्हणजे सर्वसमावेशक व्यवस्थापन प्रक्रियेचा कळीचा मुद्दा आहे.

**निष्कर्ष :–** मानवी आर्थिक प्रकल्पांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे . पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि सर्व मानवजातीविषयी आदर हा पर्यावरणाचा व्यवस्थापणाचा पाया आहे.

प्रदुषण नियंत्रण व निर्बंधक नियम हे या व्यवस्थापणाचे महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरण व्यवस्थापन अमलात आणण्यासाठी सुजान व जागृक नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे.

पर्यावरण व्यवस्थापणात सहभागी असणाऱ्यांच्या क्षमता व कौशल्ये विकसित करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

❑ ❑ ❑

# आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही

लावला तो आपल्याला जिव्हाळा
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकांस दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धाव धाव थांबलो आहे
दिशा मात्र कळत नाही
ह्दयाचे पाऊल कधी
ह्दयाकडे वळत नाही

इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहे कशासाठी
कुणालाच कसला वेळ नाही

क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबवलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोड तरी जगून घ्या
सुंदर अश्या जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या

**विजय गंगाधरराव साऊत**
बी. ए. भाग ३

# कविता

आयुष्य निघुन जाते
खिसे आपुले भरताना
वेळ जाते निघून दिवस रात्र धावताना
हरवुन गेले सारे सुख विकत घेताना
क्षणभर हसणे सुध्दा महाग झाले लोकांना
विसरलीत नातीगोती सारे जवळ असताना
आयुष्य आहे सुरेख
वेळ कुणापासी नाही
मित्रासंग बसून कोन्हीच बोलत नाही
आज सुख सोडून दुःखामागे लागला आहे
जगण्यामागचे सुख आतापर्यंत
कोणालाच कळले नाही.

**उमेश कुरवाळे**
बी.ए. भाग३

# विज्ञान युगात भरकटलेली तरुण पिढी

**कु. प्रतिक्षा चरणदास परतेती,** बी.ए. भाग ३

आजच्या युगात मोबाईल म्हटले की एक फॅशन झाली आहे. आधी बाजारात नवीन फॅशनचे कपडे आले की, ते आपल्याकडेही असायला हवे असे बऱ्याचदा तरुण पिढीला वाटते. आजच्या स्थितीत प्रत्येक ठिकाणी वर्तमानपत्र असो वा टी.व्ही. वरील न्यूज असो, प्रत्येक ठिकाणी एक हेड न्यूज असते की, एका मुलीवर अत्याचार झाला अथवा काही ठिकाणी मुलीवर ॲसीड फेकण्यात येतो. कदाचित या गोष्टीलाही कारणीभूत कुठेतरी मोबाईल आहे.

मुलांमध्ये मोबाईलमुळे होणारे दुरुपयोग :–

१) अनावश्यक गोष्टींकडे कल वाढतो.
२) काही मुले अभ्यासमय जगाकडे वळतात.
३) अभ्यासाकडे झालेले दुर्लक्ष.
४) एकलकोंडेपणा वाढला. या कारणांमुळे मुले आपला वेळ अशाप्रकारे वाया घालवतात अभ्यासाला फार अल्प काळ देतात.

चुक लक्षात आली म्हणून थांबायचे नसते, पुन्हा जीवनाच्या वाटेवरून चालायचे असते.

तुमच्या खिशात असणारा तुमचा मोबाईल, स्मार्टफोन आज संवेलनशील जगाचे संपर्क माध्यम झालेले आहे. मोबाईलचा संसर्ग बालमित्रापासून वाकलेल्या वार्धक्य मित्रापर्यंत झाला आहे. पण केवळ हॅलो... हॅलो म्हणून मोबाईलच्या बटनात किंवा टचमध्ये गुंतून राहिल्याने असंख्य प्रश्नांच्या धाग्यात गुंतून गेलेल्या मानवी आयुष्याचा गुंता सुटणार आहे का?

मोबाईलचे मिस कॉल अटेन्ड करताना आयुष्यातल्या कितीतरी मौल्यवान क्षणांचे कॉल तुम्ही मिस तर करीत नाही ना? याची पुरेशी तरी कल्पना असते का? हा आपणास प्रश्न अनुत्तरीत राहते.

*अमिरी के ख्वाब देखने लगा,*
*गाडी की आस रखने लगा*
*बाप ने भी कभी फेजर नही रखा*
*बेटा मोबाईल रखने लगा*

उदाहरण – आजच्या युगात लहान असो की मोठा मोबाईल घेवून रस्त्यात दिसते ते कॉलेजमध्ये असो किंवा शाळेत मार्केटमध्ये हातात दिसते विशेषता याचा प्रभाव तरुणामध्ये जास्त दिसुन येते. मोबाईलचा दुष्परिणाम आमच्या समोर आहे. आज काल आम्ही पाहतो की मोबाईल एक फायदेमंद आहे पण मनुष्याने त्याला हानिकारक बनवले आहे.

परिक्षाच्या हॉलमध्ये आपण पाहतो की, लेक्चर मध्ये मोबाईलची रिंग वाजली पूर्ण डिस्ट्रब होते. मोबाईल आजची फॅशन्स आहे.



''जसे तुम्ही रोज वॉटस्ॲप, फेसबुक आणि ट्विटरवर मन लावुन चॅट करता तसं इतर सर्व गोष्टी विसरुन तुमच्या आयुष्याकडे लक्ष्य द्या

बाजुलाच असलेल्या

आई–वडिलांशी वाद घालुन मोबाईलवर संवाद साधताना तुमच्या आयुष्यात कुठेतरी विसंवाद निर्माण होतो का? याची जाणीव तुम्हाला तरी असते का? मोबाईलच्या स्क्रिनवर नको त्योवळी येणारे आणि नको असणारे मॅसेजेस डिलीट करण्यात वेळ घालवत असताना नकळत आयुष्यात स्क्रिनवर पुन्हा संपूर्ण जीवनच बदलून टाकू शकणारे मॅसेजेस कधीतरी आई–वडिलाच्या डोळ्यात वाचून पाहण्याचा, ते समजून घेण्याचा प्रयत्न केला का? मोबाईलवरचा वेळ खेळण्यात वेळ घालवताना, आयुष्याचा तर खेळ होणार नाही ना, या विषयी कधी विचार करुन मनात डोकवण्याचा प्रयत्न केला का? मोबाईलमध्ये असणाऱ्या आवडीच्या फक्शनचा जेवढा काटेकोरपणे विचार करता तेवढा विचार कधी भविष्यात तुमच्या आयुष्याचे सार होवून राहण्याचा दिमाखदार फंक्शनचा कधी तुम्ही विचार केला आहे का?

मोबाईल मध्ये कोणते मेमरी कार्ड असावे कोणता रिचार्ज मारावा, कोणती रिंगटोन असावी, कोणती कॉलरट्यून्स असावी, कोणती फॅसिलीटी उपलब्ध करुन घ्यावी या आणि अशाच कितीतरी आनाठायी प्रश्नाचा विचार करुन चहाचा टपरिवर किंवा कॉलेजच्या कॅन्टींगमध्ये बसून वेळ वाया घालवण्यापेक्षा एकांतात, जगंलात तर निश्चितच वेळेचे व जीवनाचे सार्थक होईल असे वाटते. आई वडिलांच्या निव्वळ सानिध्यात, आई–वडिलांना कोणत्या फॅसिलीटी उपलब्ध करुन घ्यावी म्हणजेच जीवनाला विलक्षण अर्थ प्राप्त होईल याचा विचार युवा पिढी तरुण पिढीच्या मनात डोकावला पाहीजे.

या आयुष्याच्या मोबाईलमध्ये कोणते असे रिंगटोन असावे म्हणजे तुमच्या जीवनाच्या सतारीचे संगीत ऐकून मन प्रसन्न होईल. न चुकता रोज मोबाईल चार्ज करणे तुम्ही विसरत नाही तसे तुमच्या जीवनाचा मोबाईल न चुकता तुम्ही आई–वडिलाच्या स्वप्नी आशावादी नजरेने कधी चार्ज करण्याचा प्रयत्न करुन पहिला पाहिजे. निश्चितच जीवनाला नवी उभारी मिळेल.

खिशातच मोबाईल हरविला तर आई–वडिल रागावतील. याविषयी तुम्ही जितकी दक्षता घेता, तितक्या दक्षतेने तुम्ही आई–वडिलांचे कधी स्मरण करता का ?

मित्रहो खरे म्हणजे साऱ्या जगात तुम्ही स्वत:ला हॅला... हॅलो करीत बसण्यापेक्षा साऱ्या जगात तुमच्या कार्य कर्तृत्वाच्या कसोटीवर तुम्हाला हॅलो... हॅलो करावी एवढी माफक अपेक्षा तुमच्या आईवडिलांनी का बागळु नये ? मोबाईल माणसासाठी की, माणुस मोबाईलसाठी? असा प्रश्न स्वत:ला एकदा विचारुन तर बघा !

*''मृत्यू म्हणजे खरंच काय ?*
*जीवनाला दिलेला ते एक अहेरच आहे,*
*जो पर्यंत जगण्यासाठी जवळ असते*
*तोपर्यंत मरण्यात मौज असते''*

यापेक्षा काही तरी सुचवावे या तरुणपिढी एकदा वाया गेलेला वेळ पुन्हा येत नाही. त्यामुळे वेळ वाया न घालवता तो क्षण पुन्हा कधीच येत नाही. आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे. या विज्ञानाने तरुणाला अनेक अविष्कार दिलेले आहेत. याचा उपयोग योग्य केला तर त्यांचा नक्कीच विकास होईल व देशाचाही विकास होईल. या विज्ञानाचे मानवाच्या विकासात अत्यंत मोलाचे स्थान आहे परंतु आजचा तरुण विज्ञानाचा उपयोग चांगल्या गोष्टी बरोबरच वाईट गोष्टीसाठी करित आहे. उदा. –अणुबॉंबचा शोध विज्ञानानेच लावला याचा उपयोग जागतिक शांतता टिकवून ठेवण्यासाठी केला जातो. परंतु अमेरिका या देशाने जपानावर, हिरोशिमा व नागासाकी बॉम्ब टाकुन बेचिराख केले अशी अनेक उदाहरणे येतील. जसे मोबाईल, इंटरनेट इत्यादी.

आजचा युवक तासन्‌तास फेसबुक, व्हॉटअॅप या वरुन वेळ घालवत असतो त्यामुळे तो आपल्यासाठी कुंटुंबासाठी वेळ देवु शकत नाही. आजच्या युवक हा योग्य विकासाच्या प्रवाहापासुन दूर चालला आहे. याला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत उदा. आजची शिक्षण पध्दती, त्यांच्यावर होणारे संस्कार, मार्गदर्शन इत्यादी.

एकविसाव्या शतकातील युवकापुढे अनेक आव्हाने तर आहेतच परंतु या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी युवकांना सामर्थ मिळावे हिच सदिच्छा !

भारत देश जगामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने जरी दुसऱ्या क्रमांकाचा देश असला तरी या देशामध्ये तरुणांची ही संख्या सर्वात जास्त आहे. हीच युवाशक्ती भारताला उच्च शिखरावर नेईल. एकविसाव्या शतकात काही युवकांच्या बाबतीत वेगळेच चित्र दिसत आहे. आजचा तरुण हा आपल्यापासुन कुटुंबापासून समाजापासून एकंदरीत कुठेतरी दुर जाताना दिसत आहे.

या विज्ञान युगात तरुणपिढी कुठेतरी भटकल्यासारखी झाली आहे या विज्ञान युगात नवीन नवीन यंत्र निर्माण झाले . मोबाईल टॅब, कॅम्पुटर इत्यादींचा चांगल्या पद्धतीने वापर करावा, कोणी दुरुपयोग करतात या युगात काही तरुण पिढी व्यसनाधिन झाली.

जसा न्युटन आहे विज्ञानाचा जनक, तसाच आईनस्टाईन आहे पालक विज्ञानामुळे माणसाची होत आहे प्रगती, दुरुपयोग त्याची खुंटत आहे गती त्याच्यामुळे होत आहे सगळी हलचल. Don't be think for smoething mirade.

❑ ❑ ❑

# शिक्षणाची आवश्यकता

**कु. श्रध्दा गजानन राऊत,** बी.ए. भाग ३

शिक्षण म्हणजे ज्ञान आणि या ज्ञानाचे भारतातील पिढीने आत्मसात करून देश प्रगतीपथावर न्यावे. आजच्या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण दिल्या गेले पाहीजे. कारण विद्यार्थी म्हणजे तरुण आणि तरुणांच्याच खांद्यावर आणि विचारावर हा भारत देश आहे असे म्हटल्या जाते.

आज आपल्या राज्यात असे पाहायला मिळते की, जिल्हा परिषद ते विद्यालयातील इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सहज पास करण्यात येते. असो माझ्या मताने हे चुकतेय, आपल्या राज्यात जे काही होते न ते कारण की आज आपल्याला असे पाहायला मिळतोय की, ९वा वर्ग पास झालेला मुलगा हा पहील्या वर्गातील मुलासारखा दिसत आहे. ह्याच कारणामुळे कारण त्या विद्यार्थ्यावर शिक्षणाचे बंधन नसते. म्हणजे अभ्यास करो की, नाही करो करा त्यांना पास. ही पध्दत बंद झाली तर फारच चांगले मुले आधीपासून अभ्यास तरी करतील.



शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे असे म्हटले आहे. माणूस हा फक्त नोकरीपुरताच शिक्षण घेत नसतो तर त्याच्या वागणुकीत परिवर्तन होणे, चांगल्या प्रकाराने विचार आचरणात आणणे, शिक्षणाची गरज आजच्या तरुण पिढीला आहे. शिकल्याने कोणतेही व्यक्ती बेरोजगार राहत नाही. कोणत्या तरी प्रकारचे तो जॉब करत असतो. कोणत्याही व्यक्तीने शिक्षण घेतल्याने तो त्यांचा व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणतो. शिक्षणाने आपल्याला खर-खोटं जाणता येतं. शिक्षणाने आपल्याला बरं-वाईटगोष्टी समजतात. शिक्षण घेतल्याने आपल्याला काही पुस्तके वाचायला लागतो आणि पुस्तक वाचल्याने आपले 'ज्ञान' वाढते. ज्ञानाची संपत्ती असेल तर ते माणसाला चांगल्या प्रकारचे जीवन जगता येते ते सांगते. ज्ञानाने आपले विचार वाढते. चांगले विचार करु शकतो. शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला कळते की, कोणत्या गोष्टी बऱ्या आहे आणि कोणत्या नाही. आपण चांगल्या गोष्टीकडे वळतो.

आजच्या तरुणाला शिक्षणाची फार आवश्यकता आहे जर कोणाकडे शिकायला पैसे नसेल तर काम करुन शिकू शकतो. पण आपण शिकायलाच पाहीजे. कारण शिकल्याने खरे खोट्याची जाणिव आपल्याला होते. ज्ञान म्हणजे शिक्षणाच्याच माध्यमातून आपल्याला मिळते. आज आपल्याला असे कळत आहे की, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदच्या शाळा बंद झालेल्या आपल्याला दिसून येते. माझ्या मते, याच्या सर्व दोष मी तुम्हा-आम्हाला देते. कोणत्याही आई-बाबांना वाटते की, आपले मुले इंग्रजीमध्ये शिकले पाहीजे. पण ते फक्त त्यांचाच विचार करते कारण त्यांच्याकडे भरपूर पैसे असते. पण ग्रामीण भागातील गरीब लोकं हे त्यांच्या मुलाला शिकवितात आणि ते कसे काय पैसे लावून शहरात त्यांच्या मुलाला शिकवेल याच कारणामुळे काही गरीब लोकं आपल्या

मुलांना शिकवू नाही शकले. आपण प्रयत्न केले पाहीजे की, सर्वांनाच म्हणजे समाजातील सर्व विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे शिक्षण मिळाले पाहीजे. मग आपण प्रयत्न केले पाहीजे आपली पुढची येणारी पिढी हे शिकलेली असली पाहीजे तर आपण काहीतरी त्यांच्यासाठी असे करायला हवे की, त्या जिल्हा परिषदच्या शाळा बंद झाले नाही पाहीजे आणि सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहीजे.

शिक्षण हे आपल्याला ज्ञान देत असते आणि हे ज्ञान शिक्षकाच्या माध्यातून प्राप्त होते. कारण ते चांगले काम करते ते म्हणजे ज्ञान देण्याचे आई-बाबाच्या नंतर तेच आपले देव असते असे म्हणता येते. आपले आई बाबा पण आपल्याला लहाण्याचे मोठे करुन आपल्या स्वत:ला झिजवून, मुलांसाठी कष्ट करुन शिकवितात त्यांचे पण खुप उपकार आहे आपल्यावर.

शिक्षण घेणे म्हणजे ज्ञान घेणे ज्या माणसाला चांगल्याप्रकारचे ज्ञान ग्रहण कले असेल तो माणूस माणसासी माणुसकीने वागेल असे म्हणता येते. 'माणसाने माणसासी माणुसकीने वागणे' हाच आपला माणवता धर्म आहे. दुनिया गोल आहे आणि पुर्ण दुनियामध्ये माणसाचे दोनच जात आहे. स्त्री-पुरुष ह्या दोन जाती आहे. आजही आपल्या देशात जातीच्या किंवा धर्माच्या बाबतीत भेदभाव केल्या जात आहे. असे दिसून येते. भेदभाव न करता आपल्या राष्ट्रामध्ये समता निर्माण झाली पाहिजे असे आपण प्रयत्न केले पाहिजे आणि सारखेपण तेव्हाच निर्माण होणार जेव्हा आपण शिक्षण घेवू त्यासाठी सर्वांनी शिकायला हवे असे वाटते कारण शिकलेल्या माणुस कधीच वाईट कृत्य करत नाही. त्याला खऱ्या खोट्याची जाणीव असते आणि ज्या माणसाला खऱ्या खोट्याची जाणिव असते तो माणुसकीनेच वागतो.

आपल्या भारत देशामध्ये अंधश्रध्दा हे जास्तच प्रमाणात दिसून येत आहे. कारण अंधश्रध्दा हे त्या अज्ञानी लोकांच्या डोक्यातच विचार येते. कारण ते लोक अज्ञानी असते. अशा लोकांच्या मुलांना तरी शिक्षण मिळाले पाहिजे ते तरी त्यांच्यासारखे अज्ञानी नसून ज्ञानी असले पाहीजे. जर शिकले तर त्यांना बरं-वाईट, खऱ्या-खोट्याची तरी जाणिव राहील. म्हणून 'भारतीय संविधानाने' आपल्याला शिक्षणाचा अधिकार दिला आहे. त्यात कोणत्याही भेदभाव न करता सर्वांना समान अधिकार , शैक्षणिक अधिकारची तरतुद भारतीय संविधानात केली आहे. आपल्या भारत देशात जेव्हा तरुण शिकेल तेव्हाच आपला राष्ट्र महान राष्ट्र म्हणून ओळखला जाईल.

मला अस वाटत की, आपल्या भारतातील प्रत्येक व्यक्तीला अन्न,वस्त्र, निवारा ह्या मुलभूत गरजा प्रत्येक माणसाला मिळाले पाहीजे अस माझे स्वप्न आहे. आज आपण बघत आहोत की, एकीकडे श्रीमंत लोकांकडे खुप पैसा असून मोठ मोठे बंगले, गाडी, बँक बॅलेन्स असते आणि त्याचा एका दिवसाचा खर्च हा लाख रुपयाच्या वरती जातो आणि दुसरीकडे गरीब लोक त्याच्या दोन टाईमचेही जेवण त्यांना मिळणे अवघड बनलेले आहे ते मजूरी करुन कसे बसे पोट भरुण शिक्षण देत असते आणि दुसरीकडे लोक खुप सारा पैसा असेच उडवुन टाकतोय. पैसा न उडवता गरिब मुला-मुलींचे जर शिक्षण केले तर फारच चांगले होईल.

❑ ❑ ❑

## मैत्री

प्रेमाच नातं असणारं, पण रक्ताहून श्रेष्ठ असणारं
सुखात सहभागी होणारं, दु:खात जवळच असणारं
सगळं समजून घेणारं, आगळं-वेगळं नातं असणारं
कधी खुप रडवणार, कधी खुप हसवणारं
मनातलं जाणणार, मनापासून माननारं
फुलसारखं नाजुक कोमल असणारं
सर्वांना आपलसं वाटणारं
आशेवर निर्भर असणारं, निराशेला स्थान नसणारं
विश्वास असणारं, योग्य दिशा दाखविणारं
एकामेकांच्या सहवासाच, आपुलकीच असणारं
कधीही न विसरता येणार आठवणीनी आनंद देणारं
सर्वांना सामावुन घेणारं असे मैत्रीचे नातं असणारं
फक्त मैत्रीनेच पूर्ण होणारं

**अभिनव शरदराव मलासपुरे**
बी.ए. भाग २

# स्त्री भ्रूणहत्या

**कु. पुजा मोहनराव लाडविकर,** बी.ए. भाग ३

स्त्री भ्रणहत्या हे शब्द ऐकल्यावरच अंगावर काटा येतो. आपल्या भारतात व आपल्या समाजात कुणी खुन केल्यावर त्याला फाशीची शिक्षा होते किंवा त्याला कैद केले जाते. पण बाळ जन्माला येण्याआधीच जर का कोणी त्याची हत्या करत असेल तर त्याला काय शिक्षा दिली पाहीजे. काही लोक आपल्या बाळाला कसे मारु शकतात. मुलगा असो वा मुलगी हे आपलेच बाळ आहे हे लोक कसे विसरतात. स्त्री भ्रूणहत्या होत असताना, आपल्याच बाळाची हत्या होत असताना त्या आईला काय वाटत असेल.

अशा अनेक गोष्टी आपल्या देशात आजही घडत असताना आपण आपल्या देशाला सुधारित देश कसे म्हणायचे? ज्या जीवाला देवाने जन्म द्यायचे ठरवले आहे तो जीव आपण कसा घ्यायचा आणि असे करणाऱ्या फक्त काही रुपयाचा फाईन सोडतात आपल्या या जगात मातेपासूनच आपण जन्म घेतो पण आपण हे का विसरतो की आपल्याला जन्म देणारी एक माताच आहे, ती एक मुलगी आहे. मुलीला समाजात उत्तम स्थान केव्हा मिळणार, मुलीला केव्हा मुलाच्या समान मानल्या जाईल किंवा तिला मुलांप्रमाणे स्थान केव्हा प्राप्त होणार ?



मुलगा हा वंशाचा दिवा असतो आणि मुलगी परक्याची धन या विचार प्रक्रियेत चालणाऱ्या समाजापुढे स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण वाढीस लागले असे म्हणण्यास हरकत नाही. एकीकडे मुलगाच हवा या हट्टापूढे मुलगी नकोशी वाटत आहे आणि या नकोशिला जन्म घेण्यापूर्वीच गर्भातच ठार करण्याच्या खूपच गती मिळाली. याचा परिणाम असा झाला की, वैद्यकीय क्षेत्रातील लोक या बाबीतून लाखो करोडो रुपये जमवु लागले आणि बंगल्यावर बंगले बांधले पण दुष्कर्म शेवटी दुष्कर्मच असते.

स्त्री भ्रूणहत्या का केली जाते? या प्रश्नाची उकल शोधून काढणे आणि त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे भारत. देशात फार पूर्वीपासुन ज्या रुढी परंपरा आणि चालिरिती आहेत त्यानुसार लोक आजही आपल्या प्रथेनुसार चालतात. शिक्षणाने सर्वांचा विकास होतो. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुंलीच्या शिक्षणावर विशेष लक्ष द्यावे. मुली स्वत:च्या पायावर उभे राहीपर्यंत त्याचा लग्नाचा विचार न करता तिला शिकू द्यावे, तिला सुध्दा रोजगार मिळवून काम करण्याची संधी द्यावी आणि तिच्या हातात चार पैसे खेळतील याकडे पालक वर्गांनी लक्ष द्यावे.


मुलगी ही डोक्यावरील ओझे नसून ती आपल्या घराची, समाजाची, गावाची, देशाची ज्योत आहे. जिच्यामुळे अनेक ज्योत पेटली जातात आणि सर्वत्र लख्ख प्रकाश पडतो. समाजात स्त्रियांना सन्मान देत राहिल्यास आणि पदोपदी त्यांना हिम्मत देत राहील्यास त्याचे महत्त्व वाढत राहील. याची सुरुवात मात्र आपल्यापासून आपल्या घरापासुनच करणे आवश्यक आहे असे वाटते. संसाराचा समतोल राखण्यासाठी मुलगा आणि मुलगी दोन्ही पण महत्त्वाचे आहे. मुलगा झाला म्हणून हुरळून जावू नये आणि मुलगी झाली म्हणून काळजी करत बसू नये. अजुन एक सत्य याठिकाणी नमूद करावेसे वाटते. आई–बाबाची काळजी मुलगी ज्या आस्थेने घेते ती काळजी मुले घेत नाही लोकांची मुलगा–मुलगी बाबतची मानसिकताच बदलणे अत्यंत आवश्यक आहे. मुलगा असो वा मुलगी ते अपत्य असते असे जोपर्यंत समजल्या जाणार नाही तोपर्यत स्त्री भ्रूणहत्या कितीही कठोर कायदे तयार केले तरी थांबणार नाहीत. म्हणून मुलगा–मुलगी समानचा नारा समाजात प्रसार करूया आणि स्त्री भ्रूणहत्या थांबवू या.

❑ ❑ ❑

# भ्रष्टाचार

**अंकुश सुनिलराव बेहरे,** बी.ए. भाग ३

भारत दिवसेंदिवस विकसित राष्ट्र बनण्याकडे वाटचाल करीत आहे परंतु आपल्यासमोर आजही अनेक अतिशय गंभीर समस्या आहेत. वाढती लोकसंख्या , बेरोजगारी या सोबतच भ्रष्टाचार ही आपल्या देशासमोरील भिषण समस्या आहे. अगदी सरकारी शिपायापासून तर मोठमोठ्या राजकीय नेत्यापर्यंत अनेक लोक भ्रष्टाचाराला खतपानी घालत आहेत. आज भारतात कोणतेही छोटेमोठे काम करायचे झाले तर आपल्याला त्यांना चिरीमिरी द्यावेच लागते. कोणालाच त्यात काही वाईट वाटत नाही पण कळत-नकळत आपणही भ्रष्टाचाराला बढावा देत असतो.




भ्रष्टाचाराची सुरवात झाली कशी व कोठून याबद्दल कोणीही फारशी माहिती सांगू शकत नाही पण हे खरे आहे की माणसाकडे जसा जसा पैसा येवू लागला तसा तसा माणूस चैनीच्या व दिखाव्याच्या गोष्टीकडे आकर्षित होवू लागला. पुर्वी जेव्हा माणसाकडे फारसा पैसा नव्हता तेव्हा त्यांच्या साठी दैनंदिन गरजेच्या वस्तु महत्त्वाच्या होत्या. त्याची अपेक्षा फक्त दोन वेळेचे पुरेसे जेवण आणि जिवनावश्यक वस्तु मिळविणे एवढेच होते त्यामुळे पुर्वीचे बहुतेक लोक मेहनती व निर्मळ स्वभावाचे होते. जशी जशी सुधारणा होत गेली तशा अनेक चैनीच्या वस्तू उपलब्ध होवू लागल्या. माणसाना लोभ वाटू लागला. जास्त मेहनत न करता अधिकाअधिक समृध्द जीवन जगण्याची हाव वाढू लागली. ही हावच मुळ आहे भ्रष्टाचाराचे.

आपल्या पदाचा, अधिकाराचा गैरफायदा घेवुन कमीत कमी मेहनत करुन जास्तीत जास्त नफा मिळविणे हा भ्रष्टाचारामागचा उद्देश असतो. पण लाच देणारा सुध्दा तेवढाच गुन्हेगार असतो जेवढा लाच मागणारा असतो. माणूस लाच देतो म्हणून समोरचा माणूस लाच घेतो. किती सहजपणे आपण नकळतच गुन्हा करीत असतो. किती वेळा बघतो आपण नाक्यावर पोलीसांनी पकडले की सर्वजन पोलीसाच्या हातावर पन्नास, शंभर रुपये ठेवून पुढे निघून जातात. सरकारी नोकरीच्या ठिकाणी तर लाखांची लाच दिली जाते. इतकेच नव्हे, तर देवळाच्या रांगेमध्ये सुध्दा आपण ५००, १००० रुपये देवून लवकर दर्शन घेतो? देवाच्या दर्शनासाठी इतर भक्त उन्हात असताना आपण मात्र पैशाच्या जोरावर पुढे जावून दर्शन घेतो का? पटत असेल का हे देवाला ? आपल्या मनाला तरी पटते काय?

कितीवेळा लोक पैसे देवुन नोकरी/ उच्चपद मिळवतात. निवडणूकीमध्ये मतदारांना पैसे देवून मते खरेदी केली जाते. नंतर जेव्हा अशा लोकांना अधिकार प्राप्त होतात. तेव्हा हे लोक अनेक पटीने वाटलेले पैसे वसूल करतात. आपली प्रत्येक काम करताना आपल्याला त्यांना पैसे द्यावे लागतात, का? हे आपल्याला आधी कळत नाही की? जे लोक चांगली कामे करुन निवडून येण्याऐवजी मतदाराला पैसे चारुन निवडून येतात. ते लोक निस्वार्थपणे समाजाची सेवा करणार नाही हे सत्य आहे. तेव्हा आपण डोळ्यावर बक्षीसांची पट्टी बांधून कोणालाही निवडून देतो आणि मग भारतातील सिस्टिमला नावं बोट ठेवतो. आपण आपली चूक कबूल करीत नाही.

काही दीवसांपूर्वी मी एक चित्रपट पाहिला. त्यात एक भ्रष्ट अधिकारी असतो जो पैसे घेवून मेडीकल कॉलेजमध्ये मुलांचे ॲडमिशन करुन देत असतो. त्यामुळे चांगली बुध्दीमत्ता असलेली मुले समोर येवू शकत नाही याउलट कमकुवत बुध्दीमत्ता असलेली मुले पैशाच्या जोरावर मेडिकल्ससाठी प्रवेश मिळवतात. पुढे हिच मुले पैसे देवून पेपर विकत घेतात व पास होतात. काही काळानंतर त्याच अधिकारांच्या मुलाला भयंकर रोग होतो आणि त्याचे ऑपरेशन करायचे असते तो मुलाला हॉस्पिटलमध्ये घेवून जातो तर तिथे त्याला पैसे देवुन झालेला डॉक्टर आढळतो हा काय आपल्या मुलाचे ऑपरेशन करणार म्हणून तो दुसरीकडे जातो पण तिथे सुध्दा हिच परिस्थिती असते. तो ज्या हॉस्पीटल मध्ये जातो तिथे सगळे पैसाच्या जोरावर बनलेले डॉक्टर त्याला आढळते. त्याला आपली चूक समजते पण आता वेळ निघून गेलेली असते.

आपण सर्वांना समजायला पाहिजे भ्रष्टाचार करुन प्रगती करण्यापेक्षा मेहनत करुन प्रगती करणे. थोडा त्रास झालेला चालेल पण पैसे देवून आपण आपले काम करुन घेतले पाहिजे. कदापि आपल्या सर्वांना हे पटत असतील पण पटलं तरी आपण कळत न कळत भ्रष्टाचार करीत जातो आणि जेव्हा आपल्यापेक्षा जास्त पैसे देवून आपल्या पुढे जातात तेव्हा आपण त्यांच्या नावाने शंका करीत बसतो. कधी कधी तर असे होते की, आपण पैसे देवून काम करुन घेतो आणि आपल्या या कृतीमुळे एखाद्या चांगल्या अधिकाऱ्याला सुध्दा सोप्या मार्गाने पैसे मिळवण्याची चटक लागते. मग तो माणूस एखाद्या गरिबाच्या सहजासहजि काम करीत नाही कारण त्यात त्याला नफा नसतो.

किती त्रास होत असेल गरिबांना या भ्रष्टाचाराचा आपण विचारच करीत नाही. माझे काम पटकन झाले पाहीजे तर थोडे पैसे घ्या पण काम करा ही अनेकांची वृत्ती असते.

का नाही आपण आपल्याला सुधारत हे सगळे तो पर्यत थांबणार नाही जोपर्यंत ह्या देशातील प्रत्येक नागरिक आपली सामाजिक जबाबदारी सांभाळणार नाही. थोडे बहुत कष्ट करावे लागले तरी चालतील पण चुकीचे वर्तन करणार नाही आणि भ्रष्टाचाराला मदत करणार नाही अशी प्रवृत्ती भारतामधील राहणाऱ्या प्रत्येक नागरीकावर वा माणसात येत नाही. तो पर्यंत संपूर्ण भारत भ्रष्टाचार मुक्त होणार नाही आपल्या भारताची प्रगती व्हावी असे वाटत असेल तर आजपासूनच सर्वांनी प्रतिज्ञा करावी की, मला कितीही त्रास झाला, कामाला कितीही कालावधी लागला तरी सुध्दा मी भ्रष्टाचार करणार नाही आणि इतरांनाही करु देणार नाही तरच भ्रष्टाचाराला मुठमाती मिळेल.

❑ ❑ ❑

## कधी असही जगावं लागतं

कधी असही जगावं लागत
खोट्या हास्याच्या पडद्यावर खंरे
दु:ख लपवावं लागत
कर्तव्याच्या नावाखाली स्वत:ला राबवावं लागत
इतरांना आनंदी ठेवण्यासाठी डोळ्यातल
पाणी लपवावं लागत
खुप इच्छा असून देखील नाही म्हणावं लागतं
खुप प्रेम असून सुध्दा नाही अस दाखवावं लागतं
असं इतरांना हसवता हसवता खूप रडावं लागतं
कधी कधी असही जगावं लागतं

**कु. नेहा प्रकाशराव पवार**
बी.ए. भाग ३

## सुखाचे सोबती


तुम्ही आनंदात असाल तर लोक तुमच्या जवळ येतील
तुम्ही दु:खात असाल तर लोक पाठ फिरवतील आणि जातील
तुमच्या सर्व सुखात त्यांना भागीदार व्हायचं असतं
पण तुमचं दु:ख त्यांना नको असतं
तुम्ही आनंदात असाल तर तुम्हाला खूप मित्र मिळतील
तुम्ही दु:खी रहाल तर सगळ्यांनाच तुम्ही गमवाल
तुमचं मधुर मद्य कोणी नाकाराणार नाही,
परंतु आयुष्याचे कडू घोट तुम्हाला एकट्यानेच प्यावे लागतील.
हे सत्य जाणून घेतले तरच
सुखाचे सोबती व्हाल.

**कु. स्नेहा बुरंगे**
बी.कॉम भाग २

# संतांचे महत् कार्य



**योगेश रामदासराव बोरवार,** बी.ए. भाग ३

आपला भारत देश महान असून त्याला महान परंपरा आहे. या देशातच वेद, उपनिषदे, आरण्यके लिहिणारे ऋषी जन्माला आलेत तसेच रामायन व महाभारत लिहिणारे वाल्मिकी व व्यास जन्माला आलेत. भारताला कर्तव्याचा मंत्र देणारा महान कृष्ण या भारतातच जन्माला आला व त्याने अर्जुनास केलेला उपदेश आजही 'भागवत्गिता' या नावाने अमर झाला आहे. भारताने केवळ अध्यात्मच शिकविले , हे म्हणणे सत्यास धरुन नाही. भारतात वर्णिला नाही असा एकही विषय आज सापडणार नाही. भारताने गणिताची







उपलब्धी करुन दिली. ज्योतिष दिले, विविध विद्या दिली, भूगर्भशास्त्र दिले, साहित्य दिले व समाजशास्त्रही दिले. परंतु हे सर्व लिखाण आध्यात्मिक व धार्मिक म्हणूनच ते सामान्यांच्या आवाक्या पलीकडचे अशी धारणा झाली आणि ते सारे उपेक्षित राहिले. आता हे कार्य खरे आहे की, या सर्व ग्रंथाचे लेखक, ऋषी मुनी तथा संन्यस्त होते म्हणून त्याचे वाड्मय या सदरात पडले.

भारताचे जुने वाङ्मय हे संस्कृत भाषेत होते. कालातराने संस्कृत भाषा लोप पावू लागली व ती सामान्यांना कळेनाशी झाली शिवाय ब्राम्हण सोडून इतर वर्गीयांस व स्त्रियांस संस्कृत ग्रंथ वाचण्यास बंधन घालण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की, हे ज्ञानभांडार इतरास दुर्लभ झाले व सामान्य जनता या ज्ञानापासून वंचित राहिली. त्यांच्या मनात ब्राम्हणवर्णाविषयी आकस निर्माण झाला. जनसामान्यांच्या शब्दात जो कोणी काही सांगेल, त्याकडे लक्ष देण्याची प्रवृत्ती वाढली. त्याचा परिणाम असा झाली की, हिंदू धर्माचा अर्थ ज्यांनी ज्यांनी आपापल्या मनाप्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला व त्यातूनच भिन्न संप्रदायांचा जन्म झाला. सामान्यजनांची स्थिती थांबवल्यासारखी झाली.

महाराष्ट्राच्या जीवनात खरे लोकजागृतीचे कार्य केले ते वारकरी पंथाने. उत्कृष्ट भक्ती बरोबर त्यांनी स्फूर्तिदायक साहित्य व तत्वज्ञान महाराष्ट्रास दिले. त्यांच्या त्यांच्या अंत:करणात धर्माभिमान जागृत केला श्री शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात या पंथाने पार्श्वभूमी तयार केली असे म्हणण्यास हरकत नाही. वारकरी पंथाने खरे मजबूत केले ते श्री ज्ञानेश्वरांनी ते नाथपंथीय असले तरी त्यांनी ती पंथ, निष्ठा न ठेवता वारकऱ्यांची सर्वसमावेशक दृष्टी समोर ठेवली.

ज्ञानेश्वरांनी ज्या भागवत धर्माचा पाया रचला त्या भागवत धर्माची पताका गावोगावी पोचविण्याचे कार्य संत नामदेवांनी केले. बहुजन समाजापर्यंत सगुण भक्ती नामदेवानी पोहचविली. त्यांचे अभंग

हे रसाळ व अंत:करणाचा खोल गाभ्यातून निघालेले आहेत. नामदेवांनी भारतभर भ्रमण करुन हा भक्तिरस सगळ्यांना चाखायला लावला. शिक्षण, आरोग्य, उत्तम आचरण, शांतमय बौद्धिक जीवन व्यक्तीच्या उज्वल भविष्यासाठी किती आवश्यक आहे हे समाजाला समजले की, समाज आपोआपच सुधारेल. लोकशिक्षणाची सुरुवात खरे तर बालवयापासूनच होणे आवश्यक आहे. एखादी गोष्ट सतत कानावर पडत राहिली की, आपोआपच आपण त्यांचे अनुकरण करू लागतो. व्यसनग्रस्त माणसाला व्यसनमुक्त करण्यासाठी खुप प्रयत्न करावे लागतात. कारण कोणतेही व्यसन सहजासहजी सुटत नसते. व्यसनग्रस्त व्यक्तीनेच व्यसनामुक्त होण्याच्या पक्का निर्धार केला तरच तो व्यसनमुक्त होवू शकतो.

सर्व धर्माच्या धर्मसंस्थापकांनी मानव समाजाला याप्रमाणे शिकवण दिली आहे. ती म्हणजे खोटे बोलू नका, सत्य आचरण करा, चारित्र्य संपन्न बना. आपले काम प्रामाणिकपणे करा, ईश्वराचे नामकरण करा, परधर्माचा आदर करा, प्रत्येकाला आपल्या धर्माची उपासना करु द्या. त्यांच्या उपासनेच्या आड येवू नका. परस्त्रीला मातेसमान माना.

संतांनी लोकजागरणासारठी ईश्वर हेच माध्यम का निवडले? असा एक प्रश्न निर्माण होतो. याचे एक कारण असे की, वेदकाळापासून ईश्वर ही कल्पना आस्तित्वात आहे. जे कठिण घडते ते ईश्वरी इच्छेने घडते असा समज आहे. ईश्वरी इच्छे विरुध्द एखादी गोष्ट करण्याचा अट्टाहास आपण केल्यास ते पाप ठरते आणि त्याबद्दल ईश्वर आपणास शिक्षा करतो अशी समाजची पक्की धारणा आहे. त्याचा पुरेपूर उपयोग संतांनी करुन घेतला. केलेल्या नामस्मरणात किती आनंद आहे, शांती आहे, समाधान आहे हे ईश्वरभक्ती करणाऱ्यांनी प्रत्यक्ष अनुभवले. आपले अनुभव त्यांनी इतरांना सांगितले. अशारितीने भक्ती मार्गाचा प्रसार झाला.

महाराष्ट्रातील विदर्भाच्या मातीत निपजलेले संत गुलाबराव महाराज, गाडगे बाबा, गजानन महाराज हे उल्लेखनीय संत होवून गेले. संत गुलाबराव महाराज (इ.स. १८८१ ते १९१५) हे विदर्भातील एक प्रख्यात तत्वचिंतक पत्रकार होवून गेले ते नऊ महिण्याचे असताना त्यांना कायमचे अंधत्व प्राप्त झाले पण आश्चर्याची गोष्ट अशी की, जवळपास अंध असणाऱ्या गुलाबराव महाराजांनी विज्ञान, विचारप्रवाह व तसेच विभिन्न वैदिक,अवैदीक मते यांचे ज्ञान प्राप्त करुन घेतले.

*''दृत्याचिनी अभिलाखे। असाधु नौकायं नेक ।*
*म्हणोनि तयाचिनी मुखै। श्रवण न करावें गा ।।''*

❑ ❑ ❑

# श्रीमंत

कलीयुगाचे पर्व आहे
प्रत्येकालाच इथे गर्व आहे
मी आहे तरच सर्व आहे
नाही तर सर्व व्यर्थ आहे
अरे वेड्या !
कुणा वाचून कुणाच राहात नसतं
आदर कर सर्वांचा, हाच खरा मानव धर्म आहे
प्रेमाने जोडलेली चार माणसं व
त्यासाठी लागणारी दोन गोड शब्द
हे वैभव ज्याच्याजवळ आहे,
तोच या जगात खरा ''श्रीमंत '' आहे.

**कु. दिशा दिपकराव गाडे**
बी.ए. भाग २

# आठवण

आठवणीच्या वादळात
एक क्षण माझा असु दे...
फुलांच्या या गुच्छात
एक फुल माझे असु दे...
काढशील जेव्हा
आठवण आपल्यांशी
त्या आपल्यावर एक नाव
माझे पण असु दे....

**कु. दिशा दिपकराव गाडे**
बी.ए. भाग २

# आजची शिक्षण पद्धती

**निखिल राजेंद्रराव माने,** बी.ए. भाग ३

खरतर शालेय शिक्षण आणि त्यावर बोलावे हा माझा प्रांत नव्हे पण काल रचनाशिल्प या मायबोली करणीशी फोनवर दोन तास झालेल्या गप्पानंतर आजकालच्या शालेय शिक्षणावर प्रकाश टाकणारा एक धागा उधडावा असे राहुन राहुन वाटत होत.

थोडक्यात आजची शिक्षणपद्धती प्रचंड चुरशीची आणि स्पर्धात्मक झाली आहे. एकसुरी अभ्यासपुढे मुलाला इंजिनिअर किंवा मेडिकलला प्रवेश घ्यायचा. त्याच्या खालची कोणतीही पदवी खालच्या दर्जाची मानली जावी. बहुतेक एम.बी.ए.एस., पोस्ट ग्रॅज्युएशन करता यावं म्हणून मुलांना आतापासून त्या भयंकर 'रटाळ रेस' मध्ये अक्षरशः ढकललं जाते. कारण आजच्या मार्कावर त्यांच भविष्य अवलंबुन आहे. पुढच्या सगळया अॅडमिशन्स अवलंबुन आहेत.



पण या अशा 'बर्डनसम' शिक्षण पद्धतीत मुलांचे निरागस भाविविश्व कुठेतरी लोप पावत चाललंय, परीक्षा मार्क आणि वाढत्या प्रेशरमुळे सरकारनेही नुकतेच परीक्षा न घेण्याच तंत्र अवलंबले आहे. ''तुम्हाला काय वाटत ?'' आजची शिक्षणपद्धती कशी आहे ? यातून विद्यार्थी तर जन्माला येत आहेत पण ती माणसं कधी बनणार? व्यवहारज्ञान म्हणून जे प्रचलित आहे ते पुस्तकी ज्ञानातून मिळते का ? माझ्या वैयक्तिक मतानुसार तरी ते फक्त अनुभवातून मिळू शकते.

सध्या पुण्यात हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या संस्था आहेत ज्या ओपन स्कुलिंग करता किंवा नो स्कुलिंग करतात. इयत्ता दहावी पर्यंत जे ज्ञान आपण पुस्तकातून घेतो किंवा आपल्याला शिकवल जाते तेच वेगवेगळ्या पद्धतीने मूलापर्यंत खुद्द त्यांचे पालकच पोहचवितात. त्यालाच आपण व्हालंटरी टिचींग असे म्हणतो.

तुमचं मत काय ? हे ओपन स्कुलिंग थोड्याफार प्रमाणात पूर्वीच्या गुरुकुल पद्धतीप्रमाणे आहे. फक्त थोडे सुधारित त्याला पुढे कितपत प्रतिसाद मिळेल? आपल्या पिढीतील किती लोक असं समजतात की, आत्ताच्या लहान मूलांना अभ्यास हा बाहेर करावा लागतो. आयुष्याच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी? की तुमच्या मते हे योग्यच आहे ? कराविच लागेल ? किती पालक ओपन स्कुलिंग किंवा नो स्कुलिंगला 'फॉर' असतील ? मुलांना वाढवायला खरचं खूप पैसे लागतात का ? की आई वडीलांचा अमूल्य वेळ लागतो जे संस्कार मूल्य किंवा सामाजिक शहानपणा आपल्याला उशिरा येतो तो या ओपण स्कुलिंगच्या माध्यमातून मुलांमध्ये वेळीच येईल असे मला वाटते. तुम्हाला काय वाटते?

भारतात कधी नव्हे ते सध्या घडतेय व बुद्धिजीवी लोकं आयुष्यात तिशीनंतर बऱ्यापैकी आर्थिक दृष्टया स्थिर होवू लागलेत. त्यामुळे अशा लोकांच्या बाबतीत जे घडतं ते म्हणजे त्यांना त्यांच्या आवडीच्या अनेक गोष्टी लवकरच करता येतात. असे अनेक चांगले

लोक की, ज्यांना शिकण्याची आवड असेल त्यांना शाळेतून 'गेस्ट टिचर' करुन त्यांचे तास घ्यावेत. त्यासाठी शाळांनी जास्तीत जास्त लोकाभिमूख व्हावे. या बदलाचा परिणाम मुलीवर तसेच शिक्षकांवरही पडेल व त्यांना प्रोफेशन व इतर हजारो बाबिंचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल.

स्वशिक्षणाची सवय लहानपणीच लागली तर त्यांचे अनके फायदे मूलांना तसेच पालकांना होतील. मूलांची शैक्षणिक पात्रता पाहण्यापेक्षा त्यांच्या भावविश्वाशी समरस होणारे शिक्षण देण्याची गरज असून त्यासाठी देशभरातील शिक्षक तज्ज्ञांनी पुढाकर घेण्याची गरज आहे.

एकंदरित काय तर माणूस घडावा, मुनष्य घडावा त्यात मानवता यावी हाच शिक्षणाचा मूळ हेतू सहिष्णुता, ऐकमेकातील आदर, दुसऱ्याला समजून घेण्याची वृत्ती, शिक्षणात असावी. शिक्षण स्वावलंबणावर आधारित असावे पण त्यातून माणूस घडावा. हाच खरे तर शिक्षणाचा पाया. शिक्षक आणि शिक्षण एकमेकांना पुरक आहेत एवढेच म्हणावेसे वाटेल शिक्षणातून व्यक्ती घडावी.

*''गुरुने दिला ज्ञानरुपी वसा, आम्ही चालक हा पूढे वारस ''।*

❑ ❑ ❑

## मैत्री

मैत्री करावी अशी,
झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखी
निर्मळ अवखळ व पारदर्शी
मैत्री करावी अशी,
अतुट चंद्र ताऱ्यासारखी
ओंजळीत घेवुन मावेल आकाशी
मैत्री करावी अशी,
मांगल्यमयी पण अंधारात प्रकाश देवुन
ह्दयात तेवत राहील अशी, मैत्री करावी अशी
मैत्री करावी अशी,
धागा आणि पतंगासारखी
एकमेकांपासुन दुर राहून सुध्दा
एकमेकांत गुंतलेली, जुळलेली
सुंदर अशा निसर्गासारखी
चितरुण व अनमोल अशी
मरणाला सुध्दा जी वाटे हवी हवीशी

**हरीश जगदिशराव तळोकार**
बी.ए. भाग २

## प्रयत्न

प्रयत्न करण्यास कोठे कमी पडले
हे न मी माझ्या जीवनात समजले
प्रत्येक वेळी नेहमीच खचले
पण तरीही नव्याने उभे झाले

नवीन दिशा नवे ते प्रसंग
जीवनात माझ्या असे येत गेले
तरीही मी प्रयत्न करतच गेले
समुद्रात लाटा असंख्य निघाल्या

भरती-ओहोटीमध्ये त्या बुडाल्या
प्रयत्न न करता त्या खिन्न झाल्या
सर्वदा मनात त्या रुजू झाल्या
मनामध्ये नेहमी ठेवून एक धैर्य

काय जणू संपुष्टात आले
प्रत्येक वेळी नेहमीच खचले
पण तरीही नव्याने उभे झाले
फुलांच्या सुहासासारखे ते क्षण

नेहमी कधी न मी अनुभवले
पण नेहमी लक्षात राहिले
की, ते माझे प्रयत्न नेहमी कमी पडले...
नेहमी कमी पडले..

**कु. दिपाली सुनिलराव कोहळे**
बी.ए. भाग २

## चारोळी

''निंदेला घाबरुण आपलं,
ध्येय सोडु नका,
कारण ध्येय, साध्य होताच
निंदा करणाऱ्यांचे मत बदलतं''

**अमरदीप प्रल्हादराव अमझरे**
बी.ए. भाग २

# आजचा भारत

**कु. प्रिती रुपरावजी बुऱ्हाटे,** बी.ए. भाग ३

शिवाजी महाराजांना वयाच्या पंधराव्या वर्षी स्वराज्याच्या गादीवर बसवुन रांझ्याच्या पाल्याने एक मुलीवर अत्याचार केल्याबद्दल त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा देणारी राष्ट्रमाता जिजाऊ मॉ साहेब ते समस्त स्त्रियांच्या हातातील गुलामगिरीच्या बेड्या तोडण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला त्या सावित्रीबाई फुले ही महान स्त्री जन्माला आली म्हणूनच तर जगाच्या पाठीवर भारत भारत देश श्रेष्ठ आहे.

शेतकऱ्यांच्या मिरचीच्या देठाला सुध्दा हात लावू नका असे आपल्याच सैनिकांना सांगणारे व ज्यांच्या राज्यात एकही शेतकऱ्याने आत्महत्या केली नाही असे बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखे समतावादी महापुरुष होवून गेले ती भूमी म्हणजे भारतभूमी होय ''मी प्रथमत: ही भरतीय व अंतिमतः' भारतीय. ज्यांनी भारताला संविधान दिले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या भूमीला लाभले ती भूमी म्हणजे भारतभूमी.

''जिन्दगी अपने दम पर जी जाती है दुसरों के कन्धों पर तो जनाजे उठाये जाते है'' असे सांगणारे आणि वयाच्या तेविसाव्या वर्षी मातृभुमीसाठी फासावर चढणारे शहीद भगतसिंग असे थोर देशभक्त ज्या भुमिला लाभले ती भूमी म्हणजे भारत भुमी.

अमेरिकेतील व्यासपिठावर जावून संपूर्ण जगाला संबोधनाऱ्या विवेकानंदापासून ते प्रत्येक भारतीयांच्या मनात विकसीत भारताचे स्वप्न रुजविणाऱ्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम पर्यंत अध्यात्म, विकासाची आणि क्रांतीची सांगड ज्या भुमीत घातली गेली ती भुमी म्हणजे भारत भुमी

वयाच्या सोळाव्या वर्षी 'बुधभूषणम' हा ग्रंथ संस्कृतमध्ये लिहीणारे व वयाच्या ३२ व्या वर्षी १२० लढाई करुन एकही लढाई न हारणारे एक साहित्यकार ते स्वराज्याचा घाट ज्याने अबाधित ठेवला असे संभाजी महाराज ज्या भूमित घडले ती भूमी म्हणजे भारत भूमी होय.

हिन्दु, मुस्लिम, सीख, इसाई पर गर्व करने की बजाय इन्सान होने पर गर्व करती हुँ। धर्म, पाखंड जपने के बजाय मै मानवता को जपता हूँ असे निर्भिडपणे छाती ठोकुन सांगणारे व अंधश्रध्देवर कडाडून प्रखर हल्ला चढवणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर या भूमिवर होवून गेले.

भाषिक आणि प्रादेशिक वाटावर चाललेला संघर्ष पाहिल्यानंतर हिंदु मुस्लिमांच्या पेटलेल्या दंगली पाहिल्यानंतर प्रश्न पडतो 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' असे म्हणणारे साने गुरुजी ज्या भुमीत जन्माला आले ते भूमी म्हणजे भारतभूमी.

ज्या देशात कल्याणच्या सुभेदारची सुन आईच्या मानाने आदरपूर्वक ज्या राजाने पाठवली त्या राज्याच्या देशात अलीकडेच अत्याचाराचे वाढते प्रमाण पाहून कु ठेतरी अवघडल्यासारखे होत व ह्याला कुठेतरी आपणही जबाबदार आहे का? अशी शंका उत्पन्न होते. ज्या देशात राजा हरिशचंद्राची गोष्ट अजुनही प्राथमिक शाळेत गुरुजी मुलांना आवर्जुन मोठ्या उत्साहाने सांगतात तेव्हा देशातील वाढता भ्रष्टाचार पाहुन वाटतं यालाही आपणच जबाबदार आहोत का ?

ज्या देशात वयाच्या २३ व्या वर्षी देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव फासावर चढले त्या देशातील तरुण तालीबान एसिस लष्कर ये तोयबा या सारख्या कट्टर दहशतवादी संघटनेच्या संपर्कात आहेत असे जाहीर होताच खुप दु:ख होते.

भगवा आणि हिरव्या या रंगाच्या नावावर एकत्र येणारी माणसं तिरंगाच्या नावाखाली एकत्र येत नाही आणि हीच आपली खुप मोठी शोकांतिका आहे. खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीसाठी जन सामान्याच्या कल्याणासाठी आणि या मातृभूमीच्या उत्पत्तीसाठी जन तरुणांनी एकत्र येण्याची गरज आहे.

कारण राष्ट्रहिताची प्रामाणिक तळमळ करणारे मुठभर लोकही देशाचा इतिहास बदलू शकतात. देशाचे आणि समाजाचे नुकसान हे दृष्ट लोकांच्या कृतीमुळे नव्हे तर चांगल्या लोकांच्या निष्क्रीयतेमुळे होत असते. तर चला स्वस्थ समाज निर्मितीसाठी प्रयत्न करुया कारण स्वस्थ समाजाच्या निर्मितीसाठी जबाबदारी आपलीच आहे. त्यातही तरुणांची भूमिका मोलाची आहे.

❑ ❑ ❑


# संत गाडगे बाबा : एक आकलन

**कु. अंजली लक्ष्मणराव रायजादे,** बी.कॉम भाग २

संत गाडगे बाबा यांना लोक डेबूजी या नावाने ओळखत होते. फाटक्या गोधळीचा वेश आणि हातातील गाडगे यामुळे त्यांना 'गाडगे महाराज' या नावाने लोक संबोधू लागले व तेच पुढे चिरपरिचित झाले. 'जन सेवा हीच ईश्वर सेवा' हे त्यांच्या प्रबोधनाचे प्रमुख सूत्र होते. यात्रेकरुंच्या सेवेसाठी त्यांनी पंढरपूर, आळंदी, नाशिक इत्यादी तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळांची उभारणी केली. देवाच्या नावावर चालणारी पशुहत्या, दारु सारखी भयंकर व्यसने, निरक्षरता इत्यादींना त्यांनी लोकजागृती करुन आळा घालण्यासाठी अथक प्रयत्न केले. जाती फक्त दोनच आणि त्या म्हणजे पुरुष व स्त्री अशी शिकवण देवुन आपल्या औपरोधिक वाणीने जातीयतेवर हल्ला चढविला. एकदंरीत मानवधर्माचा मूलमंत्र देणारा विदर्भातील हा महामानव समग्र मानवजातीच्या कल्याणासाठी आयुष्यभर अविश्रांत परिश्रम करीत अखंड परिश्रम करीत राहीला. त्यांची समाधी विदर्भातील अमरावती येथे आहे. गाडगे बाबावर 'देवकीनंदन गोपाला' या नावाचा चित्रपट निघाला व तो बराच गाजलाही.

गाडगे बाबा हे महाराष्ट्रातील एक थोर आधुनिक संत होते. ते अत्यंत तळमळीचे समाजसुधारक होते आणि समाज शिक्षकही होते. त्यांनी आपल्या किर्तनाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे , लोकजागृतीचे व समाजसुधारणेचे महान कार्य केले. त्यांच्या काळात समाजजीवनात जातिभेद, अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी-परंपरा, दारु सारखी दुव्यसने, निरक्षरता इत्यादींचे प्रस्थ फार बोकळले होते.

देव देवळात नसून तो दीन दु:खितांच्या देहात आहे असे सांगून त्यांची सेवा करण्यातच देव संतुष्ट होते. असा संदेश त्यांनी लोकांना दिला. देव कोणाला दिसत नाही, रामेश्वर, बद्रीनारायण इत्यादी तीर्थक्षेत्रांतील देव म्हणजे देवांचा बाजार आहे असे सांगत. खरा देव एकच तो म्हणजे ज्याच्या हुकूमानं ब्रह्मांड चालले आहे तो त्याला पाहावयाचे असेल तर ते भजन करायला सांगतात. परंतु मनुष्याची वृत्ती किती विचित्र ! माणूस बायकोशी बोलतो, मित्राशी बोलतो, भांडण करतो परंतु त्याला देवाचे भजन करण्याची मात्र लाज वाटते तो माणूसच नव्हे. देवळातल्या दलालांनी देवाला देवळात नेऊन बसविले तीर्थात नेवून स्थानापन्न केले.



मनुष्याने अहंकार करु नये. अहंकार म्हणजे अंधपतनाचा आरंभ होय. तुकोबाच्या अभंगाचा आधार देवून गाडगे बाबा म्हणतात, ज्याचा अभिमान गेला अन् तुका म्हणजे देव झाला. अहंकारी माणसाच्या वाऱ्यालाही देव उभा राहत नाही म्हणून पैशाचा, सत्तेचा, शक्तीचा अभिमान धरु नका. केवळ गणपती मांडल्याने किंवा सत्यनारायण केल्याने देव दिसत नाही. माणूस हा दृष्ट आहे. स्वत:च्या स्वार्थासाठी देवाला लालूच दाखवितो. कोंबड्या बकऱ्याचा नवस बोलतो आणि स्वत:च त्यावर ताव मारतो. ही अत्यंत घृणास्पद गोष्ट आहे असे सांगून बाबा असल्या प्रकारच्या नवसायादी गोष्टीवर व अंधश्रध्दांवर तुटून पडतात आणि ते म्हणतात की, सर्वात मोठे धन म्हणजे कीर्ती आहे आणि खावुन पिवुन मरण्यापेक्षा 'मरावे परी किर्ती रुपे उरावे'' या प्रमाणे माणसाने सदाचाराने व सेवेने कीर्ती संपादन केली पाहिजे असे ते सांगतात.

❑ ❑ ❑

# जीवन आणि शिक्षण

**कु. रिता सुधाकरराव जपुलकर,** बी.कॉम भाग २

जीवन म्हणजे नेमकं काय? याचा उलगडा केल्यास जीवनातले सारे कठीण प्रसंग आणि आनंदाचे क्षण, कठोर परिश्रम, मेहनत, सुख-दु:ख इ. गोष्ट जिथे येतात त्याला 'जीवन' असे म्हणतात. जीवन जगणे हे सोपे नाही, कारण जीवन जगतांना खुप खडतर मार्गाने आपल्याला जावे लागते. त्यामध्ये प्रवास करताना सहज काही प्राप्त होत नाही. जीवनामध्ये सुख सहज प्राप्त न होता त्यामध्ये सुखाचा आनंद घेण्यासाठी रस्त्यामध्ये कितीही काटे आले तरी ते पार करावी लागतात.

जीवनामध्ये पैसा कमविण्यासाठी खुप मेहनत करावी लागते, कष्ट सहन करावे, लागतात. त्याशिवाय सुख सहज साध्य होत नाही आणि म्हणून जीवनात कठीण प्रसंग, दु:ख आल्याशिवाय सुखमय आणि आनंदी जीवनाचा, आनंद ही लुटता येत नाही.

शिक्षण हे जीवनाप्रमाणेच आहे त्यामध्ये फारसे काही अंतर नाही. जसे जीवनामध्ये सुख साध्य करण्यासाठी जीवनाच्या वाटेला दु:ख व कष्ट येते. त्याप्रमाणे शिक्षणात यश साध्य व्हावे यासाठी खुप मेहनत करावी लागते. दिवस रात्र अभ्यास करुन त्या त्या विषयाबद्दलच वेळापत्रक तयार करावे लागते आणि त्याप्रमाणे अभ्यास करावा लागतो. आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यासात राहीला पाहीजे. शिक्षणामध्ये प्रत्येक वाटेवर आपल्याला एक नविन गोष्ट शिकावयाला मिळते. तरीच जेवढे आपण समोर जातो तेवढीच स्पर्धा वाढत जाते आणि आपल्यामध्ये तेवढेच ज्ञान व कौशल्य असले पाहीजे आपण या विज्ञान युगात टिकून राहू शकतो.

म्हणून 'जीवन आणि शिक्षण' या दोन विषयांमध्ये साम्य दिसून येथे त्यातील साम्यपण हे मेहनत, परिश्रम विषयातून आपल्या सर्वांना दिसते. दोन्ही विषयांमध्ये परिश्रम करावे लागते, मेहनत केल्याशिवाय यशाचा पर्वत आपल्याला गाठता येणार नाही. म्हणूनच

'Success is most Importan part in our life'

❑ ❑ ❑

# सुविचार

१) धाडशी माणूस भीत नाही, भिणारा माणूस धाडस करीत नाही,जगात धाडस केल्याशिवाय कोणालाच यश मिळत नाही. कारण ज्यांच्यात हिमंत, त्यालाच किंमत.

२) वयाला हरवायचे आहे, तर आपले छंद जिवंत ठेवले पाहिजेत.

३) लोक मेलेल्या माणसाला खांदा देणे, पुण्य समजतात पण नियतीसमोर हतबल झालेल्या जिवंत माणसाला आधार देताना, दहा वेळा विचार करतात.

४) जे आपल्या घामाच्या शाईने स्वप्ने लिहितात त्यांच्या नशिबाची पाने कधीच नसतात.

५) गरिबीचा सर्वात मोठा अलंकार म्हणजे सहनशिलता होय.

६) नुसतं जगण्यापेक्षा 'जाणिवेनं' जगणं महत्त्वाचे आहे.

**कु. शिल्पा मनोहरराव उईके**

एम.ए. भाग २ (इतिहास)

# तरुणांची उदासिनता

**अमर विनोदराव चौधरी,** बी.ए. भाग ३

नैराश्य कोणालाही येवू शकते. श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, लहान मुले ते वृध्द. नैराश्य जीवनाच्या सर्व घटकांवर प्रभाव करते. छोट्या छोट्या दैनंदिन गोष्टीपासून त करिअरवर परीणाम होते. त्याच्या नात्यांवर कुटुंबावरही तसेच दररोजच्या कामावर सुध्दा परिणाम होतो आणि सर्वात मोठा परिणाम म्हणजे आत्महत्या.

सध्याच्या परिस्थितीत तरुण पिढीतील मुलांमध्ये नैराश्यामुळे आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. एवढे सगळे परीणाम असतांना मात्र त्याकडे सर्वजण दुर्लक्ष करतात. नैराश्य हा असा आजार ज्यावर प्रतिबंधक उपाय व उपचार उपलब्ध आहेत. नैराश्य काय आहे हे समजून घेणे, त्यावर प्रतिबंधात्मक उपाय व उपचाराबाबत माहिती करुन घेणे खूप महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे नैराश्याशी निगडीत कलंकित भावना दूर करणे. ज्यामुळे जास्तीत-जास्त लोक नैराश्यासाठी मदत घेतील.

**नैराश्य/उदासिनता म्हणजे काय ?**

नैराश्य हा एक मानसिक आजार आहे. ज्यामध्ये व्यक्तीस नेहमी उदास व निराश वाटते. दैनंदिन कामे तसेच आनंददायी गोष्टीतील इंट्रेस पेक्षा जास्त दिवस त्रास झाल्यास त्याला आजार संबोधले जाते.

**लक्षणे कुठली-**

१) सतत उदास/ निराश वाटते किंवा सतत चीड चीड होणे २) थकवा येणे शक्ती नसल्यासारखे वाटते ३) भुक कमी लागते, जेवणाची इच्छा न होणे किंवा वजन कमी होणे. काही लोकांमध्ये मात्र विरुध्द लक्षणे दिसु शकतात ४) कामावरती लक्ष न लागणे, इच्छा कमी होणे, निर्णय क्षमता कमी होणे ५) जवळपास १० % लोकांना नैराश्य हा आजार आहे. नैराश्यामुळे डायबेटीस(मधुमेह), हृदयाचे आजार वाढते. गरोदरपणात किंवा प्रसुतीनंतर नैराश्य असल्यास त्याच्या मुलांवर व त्याच्या वाढीवर परीणाम होवू शकतो.

**काय कराल :-** १) जवळपासच्या मित्राशी बोला २) आराम करा ३) नियोजन करा. इ.स.२०२० मध्ये नैराश्य हा सर्वात मोठा आजार असेल असे माझा स्वत:चे अंदाज आहे त्यामुळे गरज आहे. ती आताच जागे होण्याची व नैराश्यास समर्थपणे तोंड देण्याची तरच तरुण पिढीमध्ये चैतन्य निर्माण होईल. 'सुदृढ तरुण पिढीच देशाचे भवितव्य घडविणार आहे.'

❑ ❑ ❑



# कलागुणांना वाव

**कु. कविता हरिचंद्र उईके,** बी.ए. भाग १

देशाला तारुण नेणारा तो तरुण अशी तरुणाईची व्याख्या केली जाते. आनंद, उल्हास, जोश, धैर्य, चिकाटी, स्वप्न आणि हवे ते ध्येय गाठण्यासाठी केली जाणारी धडपड युवकामध्ये दिसून येते. अशा युवकांमधील कलागुणांना वाव मिळावा म्हणून शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातर्फे विविध कार्यक्रम तसेच महोत्सवांचे आयोजन केले जाते. असे महोत्सव युवकांमधील व्यक्तिमत्व विकासासोबतच त्यांना खुप काही शिकवून जातात आणि या आठवणी सतत कायमही राहतात.



अमरावती येथील संत गाडगे बाबा विद्यापीठाचा युवा महोत्सव यंदा अकोला येथे संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कार्यक्रमांना रसिकांनी भरभरुन दाद दिली. विविध प्रातांतील कला प्रकार, नृत्य, युवक युवतींनी मनापासून सादर केली. प्रत्येक राज्यातील परंपरा थोड्या फार फरकाने वेगळ्या असतात. अशा कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांची ओळख होत असते. विशेष म्हणजे लोककलांचे यथार्थपणे जनतही होते.

प्रत्येक तरुणांमध्ये कोणती ना कोणती कला असतेच या कलेचे प्रकटीकरण होत नाही व त्यांच्यामधील कला सादर करण्याचा त्यांना संधी सुद्धा मिळत नाही म्हणून अशाच काही कार्यक्रमांची नियोजने आपल्याला कराव्या लागतात. त्यामुळे त्यांची कला ही सादर करण्याची संधी त्यांना मिळते व इतरांना पाहून त्यांच्या मध्ये जिद्द सुध्दा निर्माण होते की, खरचं आपण आपल्यातले गुण सुध्दा युवकांपूढे सांगायला पाहिजे व आपली कला सादर केली पाहिजे. दोन चार मित्रांसोबत हास्य – विनोदात अशा कलांची उधळण होते. त्याला दादही मिळते. अशा कलागुणांना वाव मिळण्यासाठी कोणते तरी व्यासपीठ असावे लागते आणि अशा महोत्सवाच्या निमित्ताने ते मिळते. अनेक गुणी कलावंत नंतरच्या आयुष्यात कलाक्षेत्रात नावलौकिकही मिळवितात.

तरुणांना योग्य त्या मार्गदर्शनाची, त्यांनी आपल्याला दिलेल्या प्रोत्साहनाची गरज असते. त्यामुळेच आपण कुठेतरी प्रगतीच्या मार्गावर वळू शकतो. त्यामुळेच कुठल्याही महोत्सवात सहभागी होणाऱ्या युवकांची वेगळीच लगबग आणि तयारी सुरु असते. कलेचे सादरीकरण उत्कृष्ट व्हावे यासाठी महिनाभर आधी तालीमही घेतली जाते. त्याचा खुप चांगला परिणामही दिसून येतो.

अलीकडे बरेच मुले आणि मुली अभ्यासाकडेच लक्ष केंद्रीत करीत असतात. शाळा-महाविद्यालयातील शिक्षण आणि शिकवणी यातच ते अडकले असतात पुस्तकी शिक्षणाव्यतिरिक्त दुसरे जग त्यांना माहित नसते. अशा महोत्सवांच्या माध्यमातून कलाक्षेत्राच्या जीवनाची, त्यातून मिळणाऱ्या आनंदाची अनुभूती मिळते. अशा महोत्सवातूनच जीवनाचे खरे शिक्षण मिळत असते. या महोत्सवाच्या निमित्ताने ठिकठिकाणच्या महाविद्यालयातील विद्यार्थी एकत्र येतात व प्रत्येकातील कलागुणांची ओळख झाली . मैत्रीचे नवे धागे गुंफले गेले. अनुभवाची शिदोरी मिळावी, प्रत्येकात एक नवा उत्साह आणि आनंद निर्माण झाला. हे आनंदाचे क्षण अशा महोत्सवामुळेच मिळतात.

*''जय जय करने वाले की, जय जयकार नही होती*
*कोशिष करने वाले की, कभी हार नही होती ...!''*

❑ ❑ ❑

# पर्यावरणाचे श्रद्धामधून संवर्धन


**सुनिल किसनराव मसराम,** बी.ए. भाग ३

सह्याद्रीत फिरताना विशेषत: गावाजवळच्या डोगरात जंगलाचे छोटे तुकडे दिसतात. बऱ्याचदा हे तुकडे आजुबाजूच्या जंगलापेक्षा जास्त हिरवेगार दिसतात. गावात चौकशी केल्यास समजते की, हे जंगलाचे तुकडे म्हणजे 'देवराई'

जंगलांच्या व्यवस्थापन व संरक्षणाची जबाबदारी ही वन विभागावर असते. पण जंगल देवाचे आहे या श्रध्देने गावांनी पूर्वीपासून काही जंगल वाचविले आहे. हे या जंगलांनाच देवराई असे म्हणतात.

देवराई मधून कोणाला जळावू लाकूड, इमारती लाकूड न्यायला, गुरु चारावयला बंदी असते. परंतु संकटकाळी म्हणजे खूप दुष्काळ पडला किंवा इतर आपत्ती आली तर गावातील लोक या जंगलांच्या वापरांचा निर्णय घेतात. या संरक्षणामुळे अशा देवरांयामध्ये अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती सापडतात. शास्त्रज्ञांच्या मते, या देवराईत दुर्मिळ वनस्पती जातीचा खजिनाच आहे. याचबरोबर अन्य वन्य जीवांना सुध्दा येथील शिकारबंदीमुळे संरक्षण मिळते. अशा देवरायांमुळे व काही अभयारण्यामुळे ती अजूनही जिवंत राहू शकली आहे. या प्राण्याला निवारणासाठी उंच व घनदाट वनराई लागते ती फक्त अशा अभयारण्यांत व देवरायांतच शिल्लक राहिली आहे.

बऱ्याचदा देवराया नदी उगमापाशी आढळतात. भीमा नदी भीमाशंकरच्या देवराईत उगम पावते तर महाबळेश्वरचा पूर्ण परिसरच पावन व त्यामुळे लोकांच्या श्रध्देचा आहे येथे पाच नद्या उगम पावतात. नदी उगम व त्या भावेतीच्या परिसरात देवरायांच्या अशा संरक्षणामुळे पाणी मातीचे सुध्दा संरक्षण होते. तसेच पाण्याचा निचरा वाढतो. गावातले पाणी साठे यामुळे वर्षभर चालू राहतात. श्रध्देतून




जंगलांचे संवर्धन जगाच्या अनेक भागात, विविध धर्मात आदिवासी भागात आढळून येते. युरोपातील चर्च, वने हे श्रध्देतून संवर्धनाचे उदाहरण आहे. देवरायांप्रमाणे देवतळी सुध्दा आहेत. बरेचदा देवाजवळच्या तळ्यांमध्ये मासेमारी व इतर उद्योगांना मनाई असते. यामुळे यातील जीवांचे संरक्षण होते व पण पाणी ही शुध्द राहते. कोकणात अशी तळी खूप आढळतात. अनेक मशिदींतही अशी तळी आढळतात. विशिष्ट जातीच्या सोनेरी माशांचे तेथे संवर्धन केले जाते. मध्य महाराष्ट्रातील काही गावांत गवताळ कुरणेही देवाच्या श्रध्देपाटी संरक्षित आहेत.

या संरक्षण परंपरेतील मोठा वाटा हा तेथील स्थानिक पातळीवरील निर्णय घेण्याच्या पध्दतीत आहे या देवराया लोकांनी संरक्षित केल्यामुळे त्यांच्या रक्षणासाठी नियमही त्यांनीच बनविले. शतकानुशतके हे नियम लोक पाळत आहेत. देवरायांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची मालकी किंवा व्यवस्थापनाचे प्रकार आहेत. त्यामुळे देवराया एका कुटुंबाच्या किंवा एका व्यक्तिच्या तर काही गावाच्या किंवा काही देवळाच्या मालकीच्या असतात. यामुळे कधी कधी एका गावात अनेक देवराया सुध्दा आढळतात. श्रध्देपोटी देवरायाच संरक्षित आहे असे नाही. विदर्भातील प्रत्येक आदिवासी एक वृक्ष/पक्षी/किटक इत्यादीला कुंटुबांचा देव मानतो. त्यामुळे या जातीला हे कुंटुंब कोणतेही नुकसान पोहचवत नाही. भारतातील अनेक भागांत वड, उंबर, पिंपळाच्या जातींच्या झाडाची पूजा करुन त्यांना संरक्षण दिले जातेच. पर्यावरण रक्षणाला आस्थेची जोड दिल्यास निश्चितच पर्यावरण रक्षणास मदत होईल.

❑ ❑ ❑

# नाते निसर्गाशी

**अश्विनी अशोकराव चापेकर,** बी.ए. भाग ३

मानवाचे निसर्गाशी नाते फार प्राचीन आहे. आमच्या पूर्वजांनी या निसर्गाच्या कुशीत राहूनच वेदांची रचना केली. किंबहुना या निसर्गानेच मानवाला वेळोवेळी समृध्द केले आहे. तुकाराम महाराजांनी निसर्गाशी सोयरिक जोडली होती. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' म्हणून ते मोठ्या प्रेमाने सांगतात संसारातील कटकटींनी ग्रासलेल्या तुकोबांना घरापासुन दूर अरण्यात वृक्ष-वेलींच्या सहवासात मोकळे वाटत असे. त्या एकांतात ते आपले मन मोकळे करत आणि आत्मसंवाद साधत.

निसर्ग आमचा अन्नदाता आहे. निसर्गाच्या कुशीतून आम्हाला षड्रसयुक्त अन्न मिळते. निसर्गाने दिलेल्या पाण्यानेच आमची तहान भागते. निसर्ग आम्हाला विविध प्रकारची औषधे देतो. त्यातूनच आमचा 'आयुर्वेद' समृध्द झाला आहे. निसर्ग फार मोठा किमयागार आहे. निसर्गात एवढ्या वनस्पती आहेत पण एक दुसऱ्यासारखी नाही. वनस्पतीच्या पानांचा साधा हिरवेपणा घ्या पण त्यातही केवढी विविधता आहे. निसर्ग विविध फुले फुलवितो. कळीचे सौंदर्य वेगळे आणि फुललेल्या फुलांचे आगळे, फुललेल्या फुलांचा ताटवा तर न्यारेच सौंदर्य उधळतो. फळांचा रस हा माधुर्य, अनुपम, आंबट, गोड, तुरट, मधुर आणि कडूसुध्दा!

निसर्ग हा माणसाचा जिवाचा सखा आहे. उन्हापासून माणसाला वाचवण्यासाठी वृक्ष सावली देतो. ग्रीष्माच्या दाहकतेपासून माणसाला वाचवण्यासाठी पावसाचा वर्षाव होतो. पर्वतांच्या उंचीमुळे वादळी वाऱ्यापासून रक्षण होते. झाडांची मुळे जमिनीत खोलवर गेल्यावर जमिनीची धूप थांबवतात. झाडांच्या श्वसनामुळे अशुध्द वायू कमी होवून माणसाला प्राणवायू मिळतो. निसर्गातील विविध प्राणी, किटके हे देखील जणू काही माणसाच्या सुखाचाच विचार करतात. मधमाश्याच्या मेहनतीतून माणसाला मधुर मध मिळतो. तुतीच्या पानांवर पोसणारा रेशमाचा किडा आपल्या समर्पणातून माणसाला मऊ सूत, रेशीम धागा देतो.




निसर्ग हा एक मोठा दाता आहे. किंबहुना आपल्याकडे जे जे काही आहे ते दुसऱ्याला द्यावे हा संदेश निसर्ग पावलोपावली देत असतो. उंच कड्यावरुन कोसळणारे धबधबे माणसाला नयनसुख देतातच शिवाय त्यांच्या शक्तीचा उपयोग करुन माणूस विद्युत शक्ती, ऊर्जा निर्माण करतो. बेधुंद वाहणाऱ्या वाऱ्याच्या सामर्थ्यावर माणसाच्या पवनचक्क्या फिरतात. सतत खळखळाट करणारे सागर मानवाला आपल्या अथांग उदरातून क्षार, शंख, शिपले, मत्स्य धन देतोच पण आता मानवाला अत्यंत आवश्यक असणारे इंधनही देतो.

रत्ने धारण करणारी ही वसुंधरा युगानूयुगे आपल्या अंतरंगातील अमाप संपत्ती माणसांवर उधळत आहे. असे आहे हे मानवाचे अनमोल नाते निसर्गाशी.

पण...पण माणूस मात्र आज बेकाम झाला आहे. निसर्गाशी असलेले आपले नाते तो विसरला आहे. निसर्गाने युगानूयुगे दिलेले वैभव, सुबत्ता यांची त्याला आठवणही राहीली नाही. क्षुल्लक स्वार्थापाई तो झाडे तोडतो, जंगले उद्ध्वस्त करतो, नद्यांचे गोड पाणी दूषित करतो, सागरात आपला केरकचरा फेकून त्याच्या

अथांगतेलाही अडसर निर्माण करतो. नैसर्गिक टेकड्या, डोंगर, तलाव आपल्या वास्तव्याने दूषित करतो आणि मग मागे उरते केवळ प्रदुषण! आपल्या शिकारीच्या हौसेपोटी माणसाने आज कित्येक निसर्गदत्त पशु, पक्षी नष्ट केले आहेत. अरण्ये उजाड केली आहेत. माणसाला निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याचा जणू विसरच पडला आहे. निसर्गात असलेले स्वत:चे स्थान जणू विसरलाच आहे. या कारणांमुळेच मानवांना निसर्गाच्या प्रकोपाला तोंड द्यावे लागते आणि जर मानवाला निसर्गाचा प्रकोप किंवा लहरिपणा पाहावयाचा नसेल तर मानवाला त्याचे जे अनमोल नाते निसर्गाशी प्राचीन काळापासून चालत आलेले आहे ते टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

❑ ❑ ❑

## प्रेम

आहेस तू सावरायला
म्हणून पाहयला ही आवडतं
आहेस तू मनवायला
म्हणून रुसायला ही आवडतं
आहेस तू डोळे पुसायला
म्हणून रडायला ही आवडतं
आहेस तू समजून घ्यायला
म्हणून चुकायला ही आवडतं
आहेस तू पहायला
म्हणून सजायला ही आवडतं
आहेस तू ऐकाला
म्हणून बोलायला ही आवडतं
आहेस तू जवळ घ्यायला
म्हणून तुझ्या मिठीत ही शिरायला आवडतं
आहेस तू सोबतीला
म्हणून जगायला ही आवडतं

**कु. रुषाली रामभाऊ वानखडे**
बी.ए. भाग २

## संगणक युग

आऊटेड झालय आयुष्य
स्वप्नही डाऊनलोड होत नाही
संवदेनांना व्हायरस लागलय
दु:ख सेंड करता येत नाही

जुने पावसाळे उडून गेलेत
डिलीट झालेल्या फाईल सारखे
रेंज नसलेल्या मोबाईल सारखे

हँग झालेल्या पी सी सारखी
मातीची स्थिती वाईट
जाती माती जोडणारी
कुठेच नाही वेबसाईड

कॉम्प्युटच्या चिप सारखा
माणूस मनानं खुजा झालाय
अन मदर नावाचा बोर्ड
त्याच्या आयुष्यातून वजा झालाय

विज्ञानाच्या गुलामगिरीतून
केवढी मोठी चूक
रक्तांच्या नात्यांनाही
आता लागतं फेसबुक

असं कसं हे संगणक युग
जिथे नाती संपली...
अन् फार्मोलिटीज्‌ची
माहिती वाढली...!

**कु. वैष्णवी सु. दोडके**
बी.ए. भाग १

# प्रेमाची कळी

प्रेमाची ही एक कळी होती
कुठेतरी माझ्या मनामध्ये
रुजली होती
कारण माझ्या मनामध्ये एक परि होती
मी कॉलेजला येताच
ती माझ्याकडे बघत होती
वाऱ्यांच्या झोक्याने खुलत होती
दोन प्रेमाचे शब्द विचारण्यासाठी
सदा ती उगळत होती
कारण प्रेमाची ही एक कळी होती
मी कॉलेजला येताच ती
सकाळी उमलत होती
आणि सर्व परिसरामध्ये
तिच्या प्रेमाचा सुंगध
पसरवुन होती
मी कॉलेजला असतांना
ती बागेमध्ये रमत होती.
मी कॉलेजमधून सायंकाळी
घराकडे जातांना
ती मनाने व शरीराने कोसळली
होती कारण ती एक
बागेतील गुलाबाची कळी होती.

**रोशन राजपालजी धुर्वे**
एम.ए. भाग २ (इतिहास)

# पहिला पाऊस

उन्हाळ्याच्या कडक उन्हीनंतर
पडणारा पावसाळ्याचा पहिला
पाऊस आपले नाते निसर्गाशी
असल्याचे सांगुन जाते

गार गार वारा हा
आप-आपसातील प्रेमाची
चाहूल देवून जाते

कड्कड् वाजणाऱ्या
बिजल्या देखील शाळेच्या घंटेची
चाऊल देवून जाते

पाणी पडताच दरवळणारा
मातीचा सुंगध शेतकऱ्यांना
नवीन नवीन जगण्याची
आस देवून जाते

ह्याच पावसाळ्याच्या थेंबाना
मन:पूर्वक धन्यवाद करावेसे वाटते

**कु. कल्याणी गोपाळराव चोपडे**
बी.ए. भाग ३

# सुविचार

पुस्तकाशिवाय केला जाणारा
अभ्यास म्हणजे आयुष्य होय.

**कु. रुषाली रामभाऊ वानखडे**
बी.ए. भाग २

# मेरी आदतें

किसी को तकलीफ देना मेरी आदत नही।
बिन बुलाया मेहमान बनना मेरी आदत नही।।

मै अपने काम मे रहता हूं नवाबो की तरह
परायी खुशीयो के पास जाना मेरी आदत नही।

सबको हंसता ही देखना चाहता हूँ मै।
किसी को धोखे से भी रुलाना मेरी आदत नही।

बाँटना चाहता हूँ तो बस प्यार और मोहब्बत
युं नफरत फैलाना मेरी आदत नाही

जिंदगी मिट जाये किसी की खातीर तो गम नही।
कोई बददुआ दे मरने की यु जीना मेरी आदत नही।

सबसे दोस्ती की हैसीयत से बोल रेती हूँ
किसी का दिल दुखांना मेरी आदत नही।

दोस्ती होती है दिलोसे चाहने पर
जबरदस्ती दोस्ती करना मेरी आदत नाही ।

**अंकीता गजाननराव तायवाडे**
बी.कॉम. भाग २

# माँ और पिता

''माँ'' एक ऐसी बँक है, जहाँ
आप हर भावना और दु:ख जमा कर सकते है।
और ''पिता'' एक क ऐसा क्रेडिट कार्ड है।
जिनके पास बॅलेन्स ना होते हुए भी
सपने पूरे करने की कोशिशि करते है।

**सविता भिमराव पुनसे**
बी.ए. भाग ३

# सुविचार

* ''खुशिया बांटने से बढती है खुशी ''।

* चांद ने भी कि होगी सुरज से मोहब्बत तभी तो
चांद पे दाग है।
मुमकिन है चांद से भी हुई होगी कोई बेवफाई तभी
तो सुरज में तहकती हुई आग है।

**महादेव मसाने**
बी.ए. भाग – २

# इंग्रजी विभाग

# PROBLEMS OF INDIAN FORMERS

**Aliya Raheman Shah,** B.A. III

India is an agriculturla country. Nearly 70% of the population is engaged in agriculture. There is ample land in India. There is brights sunshine to fertiilize the soil. There are rains to help the growth of the crops. There are rivers and streams to supply water to the fields yet the Indian farmer is poor. He has many problems before him.

India presents a paradox-pouerty in the land of plenty. The Indian farmer cannot get the bare neccessaties of life. He is in debt. He is superstitious. For him old is always gold. He does not change with the times. He spends about six months in daing nothing till the rains, he had nothing to do His crops suffer if the rain are untimely. He is uneducated. He does not use mordern means and methods of cultivation sometimes he has no money to buy seeds manures and fertilizers He cannot pay the cess for the water gram dams. He cannot save his crops from floods and droughts. The Indian farmer must get proper guidance and help. He is a plaughman. He cultivates land by the age-old plough. He must use tractors. A tractor man will gert better crops thain the plough man. There should be co-operative societies to help farmers. We should dig wells and build storage tanks. Dams will irrigate his fields. Crops will not suffer if there is no rain.



He should get a good price for his crops he should be above want. Agriculture should be profitable Roods should be built to join village. Co-oprerative farming. Should be encourgged farmers should live in heat houses. villages should be cleam. Farmers are the sons of the soil. They should face no problems. When we solve the problems of farmers the problems of India will be solved.

# Brahma

**Ku. Ashvini Arunrao Raut,** B.A. II

The poem begins by examining the common sensical view that the spirit ends with ones death eventh ought the body may be destroyed Brahma which resides in each Individual as the fountain of life never ceases to exist

When the body is desttroyed the poet maintains the spirit will appear again likely in a diftterent form by employing the examples of both the slayer and the siain the speaker is suggesting not only the prevelence of their view but also the dichotomy recurs in the second stanza in which opposite Nations such as far and near, shadow and sunlight vanishing and appearing and shame and fame are juxiaposed to the speaker who unifies the universe the seemingly unbridgeable Nifference between opposite concepts can be perfectly resolved, hence the paradoxical statements Brahma's great power is furter decribed in the third stanza, where the spirit states that it comprehends yet transcends everyting both the doubter and the doubt the subject and object and matter and mind. In additin the rhyme scheme befittingly reinforces the spirits in terwecuing power, yielding a sense of wonder based on unusud metrical summetru different from the other worldly spirit in Hinduism however the transcendental spirit represented by Brahma in this poem leads the follower not to heaven but to this world woord by using the conjunction but in the laststaizd emerson prepares his reader for his own interpretation to the universal spirit the concluding statment that justifies self sufficient eistence in this world this poem greatly influenced by a sacred text of hinduism katha upanishad Brahmais a philosophical explication of the universal spirit by that name the poetic form of elegiac quaterain is used to represent the solemn nalture of the subject throughout the poem, Brahma appears as the only speaker sustaining the continu of the work that the spirit is the only speaker siggnifies not only its absoulte nature but also its susaining power upower which existence of the entire unierse melaprorically the poem is based.

❑ ❑ ❑

# Mother

A mother
Love always unconditionally
She teaches many
lessons of life beautifully..!
A mother
cares always endlesly
She sacrifies self-lessly...!!
A mother
Wishes the best things
of life heartily
She proides all her love
always so happily...!!!
A mother
is a refiection of god undoubtedly...!!!!

**Ku. Vaishnavi S. Dodke**
B.A. I

# Corruption

**Ku Mayuri Rajendra Bhuyar,** B.A. III

Corruption is an issue that adversely offects Indians economy of central state and local government agencies. Not only has if held the economy back from reaching new heights but rompant corruption has stunted the country's develpment.

What is the actual meaning of corruption ?

corruption is dishonest sction that destroys people's trust. News of corruption as your bank might make you close your account and invest your money Some Where else.




A study conducted by Transporency International in 2005 recorded that more than 927 of Indias had at some point or another paid a bribe to a public official to get a job done. In a study conducted in 2008 Transparency international reported about 50% of Indias had first hand expirience of paying bribes or using contact to get services performed by public offices. Trunsparency International's 2017 corruption perception Index ranks the contry 81st place out of 180 contries. The largest contributors to corruptions are entitlement program and social spending schemes enacted by the indian government. Examples include the Mahatma Gandhi national Rural Employment Guarantee At and the National Rural health mission other areas of corruption include India's trucking industry which is forced to pay billions of rupees in bribesannuelly to numerous a regulatory and police stops on interstate highways.

4 Types of political Corruption.

1) Payoffs and Bribes - Bribery may be one of most common types of political corruption.

2) Graft and embezzlement some elected officials are tasked with the oversight of larg sums of money.

3) Blackmail and extortion - Political offices can provided their officials with a great deal of power.

A 2006 report claimed state-funded construction activites in Uttar Pradesh. Such as road building were dominated by can struction mafias. Consisting of cabals of corruption public works officials materials suppliers. Politicions and construction contractors.

Problems casued by corruption in government funded projects are not simited to the test of other pradesh According to the world bank aid

programmes are beset by corruption bad administrution and under payments. As an example the report cites that only 40% of grain handed out for the poor reaches its intened target. The world Bank study finds that the public distribution progrummes and social spending contracts have proven to be a waste due to corruption for example the government implemented the Mahatma Gandhi National Rural exployment Guarntee Act. On 25 August 2005. The central Government outlay for this walfare scheme is 4000 crore after 5 years of implemention in 2011 the programme was widely criticised as no more effective than other poverty reduction programmes in inaid.

Despite its best intentions. MGNREGA faces the challenges of Corrup officials reportedly pocketing money on behalf of fake rural employees poor quality of the programme infrustructure land unintended distructive effect on poverty.

❑ ❑ ❑

## A Prayer

O God !
I thank you
for courge to avoid wrong
and for brothrly love
I am sorry I've offenday you.
you are so good
I promise ot try
To act kindly towards others
And to be better in future
Help me and my country men.
To serve you and India Lovingly.

**Mahadev Masane**
B.A. III

## Herman Melvine

This poem develops the idea of artistic inspiration in peaceful moments one contemplates an undiscovered or unexplored idea many possibilities arise in the mind about what could come of it if certain measures are taken melville describes some contrasts that must mesh together in order to wrestie and Art. Which is protrayed as an angle.

These things are a flame heating whilst a wind freezes simultaneas ously a patience and an anticipation. Pridetuness and humilityaudacious natures and pride. There is also love and hate, complete opposites and instinct and studying melville states that these must fuse with jacobs heart.

**Swamini Dnyaneshwar Warghat**
B.A. II

## Success

Nothing succeeds like success
your success depends on
your attitude to life
The secret of success is
Singlee mindedness
success requires hand work
training and discipline
If you can cope with these
opportunities are every where
success is often a matter
of hanging on longer, when other's
have given up
search for better way's to he things
and four will find success
Be what are capable of becoming
Tame charge of your life
become the person you
would like to be.

**Ku. Kalyani Ganpatrao Chopde**
B.A. III


# विभागीय वार्षिक अहवाल

भारतीय विद्यामंदिर, अमरावती

द्वारा संचालित

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी

जि.अमरावती




# सातपुडा

## वार्षिकांक : सत्र २०१८-१९

* मुख्य संपादक *

**डॉ. सुरेश भ. बिजवे**

प्रभारी प्राचार्य

भारतीय महाविद्यालय, मोर्शी

* सह संपादक *

डॉ. भगवान जे.साबळे,

डॉ.जयमाला एल.रामटेके, डॉ.सावन एम.देशमुख

प्रस्तुत वार्षिकांकात प्रकाशित झालेल्या साहित्यातील मते, विचार व कल्पना संबंधित लेखकांची आहेत. त्या मताशी संस्था, प्राचार्य, महाविद्यालय व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. - संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्र व मैत्रिणींनो,

सन् २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा 'सातपुडा' वार्षिकांक प्रकाशित करताना मनस्वी आनंद आणि अभिमान वाटतो. महाविद्यालयाच्या विविधांगी प्रगतीचा आलेख तसेच युवा पिढीची धडपड, यश व युवा स्पंदन यांचे प्रतिबिंब म्हणजे 'सातपुडा' वार्षिकांक.

नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या सातपुडा पर्वताच्या नयनरम्य सानिध्यात वसलेल्या मोर्शी येथे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेता, शिक्षण प्रेमी व्यक्तींनी आपल्या उपक्रमातून भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालयाची स्थापना १९७० मध्ये केली. छोट्याशा या शैक्षणिक रोपट्याचे आता वटवृक्षामध्ये रूपांतर झालेले आहे. संस्था चालकांच्या प्रेरणा, संस्थापक अध्यक्ष यांच्या आशावीर्दाने आज महाविद्यालयाने आपले ४९ वर्ष पूर्ण केले आहे व आजही महाविद्यालय आपली शैक्षणिक सावली मोर्शीसह आजुबाजूच्या ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांना देत आहे. आपल्या या महाविद्यालयाची सतत यशाकडे वाटचाल सुरू असून शिक्षणासह क्रीडा, सामाजिक क्षेत्र आणि सांस्कृतिक क्षेत्रातही प्रगतीपथावर आहे.

महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वी ते पदवी व पदव्युत्तर पर्यंतच्या कला व वाणिज्य शाखेचे वर्ग सुरू आहेत. महाविद्यालयातील कला शाखेतील पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना मोर्शी शहराबाहेर जाऊन पदव्युत्तर शिक्षण घेणे शक्य नव्हते. ही अडचण लक्षात घेता मागील सहा वर्षांपासून कला शाखेतील राज्यशास्त्र व इतिहास या विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय महाविद्यालयाने करून दिली आहे. तसेच महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थिनींसाठी त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेला गृहअर्थशास्त्र हा विषय महाविद्यालयाने सुरू केलेला असून त्याला विद्यार्थिनींकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय इंग्रजी वाङ्मय व मराठी वाङ्मय हे विषयही महाविद्यालयाने सुरू केलेले आहे तर कार्यात्मक इंग्रजी हा विषय विद्यार्थ्यांना उपयोगी ठरत आहे. महत्त्वाचे म्हणजे महाविद्यालयात २०१३-१४ या शैक्षणिक सत्रापासून ११ वी विज्ञान व २०१४-१५ पासून १२ वी विज्ञान हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला असून रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र या विषयाची अद्यावत व सुसज्ज अशी प्रयोगशाळा विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे २०१४-१५ या शैक्षणिक सत्रापासून एम.कॉम. (मराठी) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. याशिवाय २०१६-१७ च्या शैक्षणिक सत्रापासून बी.एस्सी. भाग-१, २०१७-१८ पासून बी.एस्सी. भाग-२ व २०१८-१९ पासून बी.एस्सी. भाग-३ या अभ्यासक्रमास प्रारंभ करण्यात आलेला आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत महाविद्यालयामध्ये दि.३० जानेवारी २०१९ रोजी पदवीदान समारंभ संपन्न झाला. महाविद्यालयामधून विविध अभ्यासक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच पदवी प्रदान करण्याचा प्रसंग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

आजच्या काळात व्यावसायाभिमुख शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता वर्ग ११ आणि १२ या उच्च माध्यमिक स्तरावरील व्यावसायिक शिक्षण किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिल्या जात आहे. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम राबविल्या जातात. त्यात पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असतानाच रोजगाराभिमुख शिक्षण प्राप्त करून स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने करिअर ओरीएन्टेड अभ्यासक्रम, करिअर कौन्सलींग सेल व समान संधी केंद्राची सुरुवात महाविद्यालयाने केलेली आहे. याशिवाय महाविद्यालयात विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार, व्यवसाय मार्गदर्शन केन्द्र असून या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थी घेत आहेत.

शैक्षणिक अभ्यासक्रमांसोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्या जाते. त्यात बहुसंख्येने विद्यार्थी सहभागी होतात. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे आयोजित सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने दरवर्षी सहभागी होतात. सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून डॉ.भगवान साबळे, डॉ.संदीप राऊत, प्रा.व्ही.व्ही. खांडेकर व डॉ.एल.आर.टेंभुर्णे आदि प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सातत्याने प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रम संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जोपासना वृद्धिंगत करण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयाच्या रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप राऊत, डॉ. सावन देशमुख व डॉ. जे.एल.रामटेके सातत्याने प्रयत्न करतात.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना सर्व क्षेत्रात यश मिळावे या उद्देशाने व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. तसेच आरोग्यविषयक, आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा याशिवाय शैक्षणिक, सामाजिक, कायदेविषयक व सांस्कृतिक या सर्व दृष्टींनी जागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. शिक्षक, पालक व विद्यार्थी या घटकांमध्ये सुसंवाद साधता यावा म्हणून पालक-शिक्षक संघ, माजी विद्यार्थी संघही कार्यरत आहे.

जोपर्यंत विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहात नाही तोपर्यंत शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांना चालना मिळणार नाही हे निर्विवाद सत्य असल्यामुळे महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.एस.व्ही.टोपरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे विद्यार्थी

विविध क्रीडा स्पर्धेत सातत्याने सहभागी होतात. महाविद्यालयामध्ये मैदानी खेळ, व्यायाम शाळा व इनडोअर खेळांची व्यवस्था करण्यात आली. विद्यापीठाच्या युवा महोत्सवात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग असतो.

२०११-१२ या वर्षांपासून मराठी विभागाचे डॉ.बी.जे.साबळे यांनी 'पालवी' हस्तलिखित काव्यसंग्रह सुरू करून विद्यार्थ्यांना लेखनास प्रवृत्त केले व त्यांना हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून दिले. डॉ.एस.बी.बिजवे, डॉ.जे.एल.रामटेके, डॉ.आर.जी.बांबोळे, डॉ.कु.एल.आर.टेंभुर्णे, डॉ.एस.व्ही.टोपरे, डॉ.संदीप राऊत, डॉ.सावन देशमुख व डॉ. भगवान साबळे यांनी त्यांच्या विषयात संशोधन कार्य पूर्ण केले असून याचा लाभ आपल्या अभ्यासक्रमात करीत आहे. अशा या सर्व तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या मार्गदर्शनाद्वारा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे. महाविद्यालयातील डॉ.संदीप राऊत यांनी स्व.बबनदादा मेटकर स्मृती विचार प्रबोधनमालेअंतर्गत संत गाडगे बाबा यांच्या जीवनकार्यावर ५१ विचारपुष्प गुंफले. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक सहकार्याने महाविद्यालयातील मुलींकरिता वस्तीगृहाचे काम पूर्ण झाले आहे.

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचा महाविद्यालयाचा वार्षिकांक आपल्या सर्वांच्या सहकार्याने वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे. हा अंक तयार करण्यासाठी आमच्या संपादक मंडळाने जी मेहनत घेतली त्याचे फलस्वरूप म्हणून हा 'सातपुडा' वार्षिकांक होय. या वार्षिकांकामध्ये विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख, साहित्य वाचावयास मिळेल त्याचप्रमाणे महाविद्यालयातर्फे राबविले जाणारे विविध उपक्रमांची माहिती मिळेल. या दृष्टिकोनातून हा वार्षिकांक वार्षिक घडामोडींचा लेखाजोखा असून प्रत्येक कृतीचे प्रतिबिंब आपल्याला यात दिसून येईल. महाविद्यालयाच्या या शैक्षणिक प्रगतीच्या वाटचालीमध्ये संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोग, शासनाच्या शैक्षणिक विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व हितचिंतक यांचे सहकार्य लाभत आहे आणि भविष्यातही आपला या महाविद्यालयावरील स्नेह असाच कायम राहील, नव्हे तो वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा व खात्री बाळगतो.

**डॉ. सुरेश भ. बिजवे**
प्रभारी प्राचार्य
भारतीय महाविद्यालय, मोर्शी

# संपादकीय...

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील सुप्त साहित्यिक गुणांना, त्यांच्यातील हळव्या कवी मनाला कोठेतरी आपले हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या भावना आणि सुप्त गुणांची जाणीव सहकारी मित्रांसोबतच इतरांना व्हावी या हेतूने गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयातर्फे 'सातपुडा' हा वार्षिकांक प्रकाशित केल्या जातो.

संगीतातील सप्त स्वर, इंद्रधनुचे सात रंग त्याचप्रमाणे सात पर्वतांच्या रांगामुळे निर्माण झालेले सातपुडा पर्वत. सातपुडा म्हणजे सात उत्तुंग पर्वत रांगाचा घडून आलेला मेळ, यात असलेली जैवविविधता, नैसर्गिक सौंदर्य, प्रेक्षणीय स्थळे यामुळे 'सातपुडा' ने संपूर्ण जगात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. सातपुडा पर्वताच्या शेजारी असलेल्या या महाविद्यालयाच्या वार्षिकांकाचे म्हणूनच आम्ही 'सातपुडा' असे नामाभिदान केले आहे. विद्यार्थ्यांमधील कवी आणि लेखक मनाला सातपुडा वार्षिकांकाच्या माध्यमातून आम्ही हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून दिले आहे. अशा या कलाप्रेमी विद्यार्थ्यांच्या बाबतीत कवी कुसुमाग्रजांच्या खालील ओळी ओठावरती येतात,

''अनंत अमुची ध्येय शक्ती, अनंत अमुची आशा, किनारा तुला पामराला''

या वृत्तीचा वसा आणि वारसा आमचे विद्यार्थी जोपासत आहेत. विद्यार्थ्यांनी असेच लेखन करीत राहावे आणि यशाची शिखरे गाठावित ही सदिच्छा !

या अंकासाठी ज्या विद्यार्थ्यांनी आपले साहित्य उपलब्ध करून दिले, त्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच भारतीय विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, हितचिंतक व स्नेही यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे संपादक मंडळ आभारी आहे.

दर्जेदार टाईप सेटींग व डिझाईनिंग आणि दर्जेदार छपाई वेळेच्या आत करून हा देखणा अंक आपल्या सर्वांच्या हाती दिला ते सरस्वती प्रिन्टर्सचे श्री.सुधाकर वडुरकर हे धन्यवादास पात्र आहेत. मोठ्या कल्पकतेने व श्रमपूर्वक तयार केलेला हा सातपुडा वार्षिकांक  आपल्या मनी रुजावा ही अपेक्षा.

संपादक मंडळ
सातपुडा वार्षिकांक
२०१८-२०१९

# अंतरंग


प्राचार्याचे मनोगत –
संपादकीय –


## अहवाल


सांस्कृतिक विभाग १
राष्ट्रीय सेवा योजना ३
इंग्रजी विभाग ५
मराठी विभाग ५
इतिहास विभाग ६
राज्यशास्त्र विभाग ६
भूगोल विभाग ७
वाणिज्य व अर्थशास्त्र विभाग ७
गृहअर्थशास्त्र विभाग ८
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग ९
शारीरिक शिक्षण विभाग १०
विज्ञान शाखा १०


## मराठी व हिन्दी विभाग


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज–कु. नम्रता नंदकिशोर खोडे १३
माझा जीवन प्रवास–कु. मनिषा बाळकृष्णराव राऊत १४
गाडगेबाबांच्या किर्तनातील तत्त्वज्ञान–कु. प्रणल प्रमोदराव निभोंरकर १५
सुविचार–कु. दिपाली विनायकराव कवाडे १६
पर्यावरणाचा ऱ्हास–कु. वैष्णवी विजयराव केमेकर १७
स्त्री जन्म–कु. पायल मो. कडुकर १८
बापाच्या काळजातून–कु. श्रद्धा संजय गायकवाड १८
माहेर–संजय विश्वासराव इंगळे १८
मुलीचे शिक्षण हेच समाजाचे रक्षण–कु. नेहा अंबादास मसतकर १९
माझी ती मैत्रिण–रामेश्वर फगनु इवने २०
जीवनाची नाती–कु. जोत्स्ना रामभाऊ चव्हाण २०
मी कोण?–कु. मिनाक्षी मो. पापडकर २०
खरंच २०२० साली भारत महासत्ता बनेल का?–चेतन विलासराव वानखडे २१
जागतिकीकरण–राहुल जानराव कुरवाळे २३
साफल्य–अमरदीप प्रल्हादराव अमझरे २५
स्त्री–पुरुष समानता–कु. प्रतिक्षा चंद्रशेखर गतफणे २५
जीवन आणि शिक्षण–कु. प्रगती अरविंदराव राऊत २६
पर्यावरण समतोल आजची भीषण समस्या–कु. समिक्षा दिवाकर वानखडे २७
साफल्य–अमरदीप प्रल्हादराव अमझरे २४
स्त्री–पुरुष समानता–कु. प्रतिक्षा चंद्रशेखर गतफणे २५
जीवन आणि शिक्षण–कु. प्रगती अरविंदराव राऊत २६
पर्यावरण समतोल आजची भीषण समस्या–कु. समिक्षा दिवाकर वानखडे २७
२१ व्या शतकातील युवकांचे योगदान–प्रितम जनार्दनराव पडोळे २९
आयुष्यासाठी पुस्तक–कु. श्रुती रामदासराव महल्ले ३०
आई–ज्योती प. मरकाम ३०
समाज सुधारकांना समजून घेताना–कु. भारती पांडुरंजी अडमासे ३१
करिअर घडविताना–कु. दिपाली वि. कवाडे ३३
चांदणी–कु. गौरी चंद्रशेखर जाणे ३४

हसणे-कु. नुतन गजाननराव इंगोले ३४
नशीब-कु. आशा हि. गिरारे ३४
संत गाडगे बाबांचे सामाजिक कार्य-कु. माधुरी प्रकाशराव पाचारे ३५
मानवता हिच माणसा तुझी ओळख-कु. पूनम वि. पाटील ३६
मातृभाषा आणि शिक्षण-कु. तन्वी ज्ञानेश्वरराव राऊत ३७
पर्यावरण व्यवस्थापन-कु. अंजली बाबाराव समरीत ३८
आयुष्य-विजय गंगाधरराव साऊत ३९
कविता-उमेश कुरवाळे ३९
विज्ञान युगात भरकटलेली तरुण पिढी-कु. प्रतिक्षा चरणदास परतेती ४०
शिक्षणाची आवश्यकता-कु. श्रध्दा गजानन राऊत ४२
मैत्री-अभिनव शरदराव मलासपुरे ४३
स्त्री भ्रूणहत्या-कु. पुजा मोहनराव लाडविकर ४४
भ्रष्टाचार-अंकुश सुनिलराव बेहरे ४५
कधी असही जगावं लागतं-कु. नेहा प्रकाशराव पवार ४६
सुखाचे सोबती-कु. स्नेहा बुरंगे ४६
संतांचे महत् कार्य-योगेश रामदासराव बोरवार ४७
श्रीमंत-कु. दिशा दिपकराव गाडे ४८
आठवण-कु. दिशा दिपकराव गाडे ४८
आजची शिक्षण पद्धती-निखिल राजेंद्रराव माने ४९
मैत्री-हरीश जगदिशराव तळोकार ५०
प्रयत्न-कु. दिपाली सुनिलराव कोहळे ५०
चारोळी-अमरदीप प्रल्हादराव अमझरे ५०
आजचा भारत-कु. प्रिती रुपरावजी बुन्हाटे ५१
संत गाडगे बाबा : एक आकलन-कु. अंजली लक्ष्मणराव रायजादे ५२
जीवन आणि शिक्षण-कु. रिता सुधाकरराव जपुलकर ५३
सुविचार-कु. शिल्पा मनोहरराव उईके ५३
तरुणांची उदासिनता-अमर विनोदराव चौधरी ५४
कलागुणांना वाव-कु. कविता हरिचंद्र उईके ५५
पर्यावरणाचे श्रद्धामधून संवर्धन-सुनिल किसनराव मसराम ५६
नाते निसर्गाशी-अश्विनी अशोकराव चापेकर ५७
प्रेम-कु. रुषाली रामभाऊ वानखडे ५८
संगणक युग-कु. वैष्णवी सु. दोडके ५८
प्रेमाची कळी-रोशन राजपालजी धुर्वे ५९
पहिला पाऊस-कु. कल्याणी गोपाळराव चोपडे ५९
सुविचार-कु. रुषाली रामभाऊ वानखडे ५९
मेरी आदते-अंकीता गजाननराव तायवाडे ६०
माँ और पिता-सविता भिमराव पुनसे ६०
सुविचार -महादेव मसाने ६०


## इंग्रजी विभाग


PROBLEMS OF INDIAN FORMERS-Aliya Raheman Shah 63
Brahma-Ku. Ashvini Arunrao Raut 64
Mother -Ku. Vaishnavi S. Dodke 64
Corruption-Ku Mayuri Rajendra Bhuyar 65
Herman Melvine-Swamini Dnyaneshwar Warghat 66
A Prayer-Mahadev Masane 66
Success-Ku. Kalyani Ganpatrao Chopde 66

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी



प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांच्या समवेत
वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद.



प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांच्या समवेत
कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद.



प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांच्या समवेत
एच.एस.सी.व्होकेशनल शाखेचे प्राध्यापक
व शिक्षकेतर कर्मचारी



प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांच्या समवेत
कार्यालयीन कर्मचारी

# क्षणचित्रे



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना
संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.आर.बी.बिजवे व उपस्थित मान्यवर



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.अनंतराव सोमवंशी व उपस्थित मान्यवर



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
संस्थेचे सरचिटणीस मा.डॉ.सतिश कुळकर्णी व उपस्थित मान्यवर



वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन
करताना सुप्रसिद्ध साहित्यिक मा.डॉ.सतीश तराळ
व उपस्थित मान्यवर



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
संस्थेचे सचिव मा.श्री. सलील चिंचमलातपुरे व उपस्थित मान्यवर



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रास्ताविकपर भूमिका विशद
करताना प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे व उपस्थित मान्यवर

# क्षणचित्रे



रासेयो शिबीराच्या समारोपीय समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे उपाध्यक्ष मा.अनंतराव सोमवंशी व उपस्थित मान्यवर


राष्ट्रीय एकात्मता कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सदस्य मा.प्रा.महाजन सर व उपस्थित मान्यवर


माजी प्राचार्य जी.एस.मेश्राम यांच्या सेवापूर्ती समारोपाप्रसंगी सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.रमेश भ.बिजवे


सेवापूर्ती समारोहाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना माजी प्राचार्य मा.जी.एस.मेश्राम



विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या फेअरवेल कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवे



इतिहास विभागातर्फे आयोजित कार्यक्रमास उपस्थित मान्यवर


# क्षणचित्रे



अर्थशास्त्र अभ्यासमंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी
मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य सुरेश भ. बिजवे




अर्थशास्त्र अभ्यासमंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य तडसर सर




इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी
मार्गदर्शन करताना मा.प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे



इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी मान्यवर




'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' निमित्त आयोजित काव्यवाचन
स्पर्धेप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.जे.एल.रामटेके




राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची पंचायत समिती,मोर्शी
येथे भेट

# क्षणचित्रे




पंचायत समितीच्या भेटीत डॉ. रजनिश बांबोळे
प्रास्ताविक करताना




वित्तीय साक्षरता अभियान व वक्तृत्व स्पर्धा बक्षीस वितरण
समारंभाप्रसंगी मनोगत व्यक्त करताना
प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ. बिजवे व उपस्थित मान्यवर




रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिर प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
प्राचार्य मा.डॉ. सुरेश भ. बिजवे




रासेयो अंतर्गत कार्यक्रम प्रसंगी विचार व्यक्त करताना
प्राचार्य मा.जी.एस.मेश्राम व उपस्थित मान्यवर




डॉ.एस.आर.रंगनाथ जयंती प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
प्रा.ए.,एस. पाझरे




रासेयो शिबीराप्रसंगी मार्गदर्शन करताना
मा.श्री.सलील चिंचमलातपुरे,सचिव, भारतीय विद्यामंदिर,अमरावती

# क्षणचित्रे



मा.स्व.श्रीधरराव चिंचमलातपुरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संस्थेचे सचिव मा.सलिलचंचमलातपुरे यांच्या तर्फे भूगोल विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यास रोख पारितोषिक व स्मृतीचिन्ह प्रदान करताना मान्यवर




रासेयो अंतर्गत आरोग्य शिबीरादरम्यान मार्गदर्शन करताना मा.श्री. शिरसाट सर व उपस्थित मान्यवर



बी.एस्सी. शाखेच्या विद्यार्थ्यांचा वेलकम प्रोगाम प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य मा.सुरेश भ. बिजवे



रासेयो विभागाच्या वतीने आयोजित वृक्षारोपण उपक्रमाप्रसंगी वृक्षारोपण करताना मान्यवर




मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त आयोजित काव्यवाचन स्पर्धेमध्ये पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना ग्रंथभेट प्रदान करताना मान्यवर




वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांची मोर्शी येथील ॲक्सीस बँकला भेट

# क्षणचित्रे




अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची
नव्या ऑरेंज प्रोसेसिंग युनिटला भेट.



संसदीय अभ्यास वर्गाकरिता राज्यशास्त्र विभागाची
विद्यार्थिनी कु. राणी बिलोणकर सहभागी




कारागृहात बंदीजनांना राख्या बांधताना
रासेयो स्वयंसेविका



डॉ. जे.एल.रामटेके यांच्या सेवापूर्ती समारोहाप्रसंगी
सत्कार करताना संस्थेचे पदाधिकारी



रासेयो शिबीराच्या समारोपाप्रसंगी गावकऱ्यांना
भेटवस्तू देताना मान्यवर




भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम जन्मदिन वाचन प्रेरणा दिन प्रसंगी
प्राचार्य मा.सुरेश भ. बिजवे, प्रमुख वक्ते डॉ.संदीप राऊत,
डॉ.चंदू पाखरे व उपस्थित प्राध्यापक वृंद

# क्षणचित्रे




महात्मा गांधी जयंती निमित्ताने मार्गदर्शन करताना डॉ. संदिप राऊत व उपस्थित मान्यवर




मराठी विभाग आयोजित दि.२७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रज जयंती निमित्त प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवो, प्राध्यापक व विद्यार्थी



मराठी विभाग आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देताना प्राचार्य डॉ.सुरेश भ. बिजवे




वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांची कणक शेवळी केंद्र, मोर्शी येथील उद्योगाला भेट



अर्थशास्त्र व गृहअर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची निल नमकिन कंपनी, चिंचोली गवळी येथे भेट



आंतरमाहाविद्यालयीन 'युथ फेस्टीवल' मध्ये समूहगानप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी

# क्षणचित्रे



आंतरमहाविद्यालयीन 'युथ फेस्टीवल' मध्ये
स्कीट सादर करताना महाविद्यालयीन विद्यार्थी



महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेप्रसंगी खेळाडूंना शुभेच्छा देताना
प्राचार्य जी.एस.मेश्राम



रासेयो विभागाच्या वतीने आयोजित शिबिराप्रसंगी
बंधाराची पाहणी करताना मान्यवर



गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने पोण आहार सप्ताहाच्या
निमित्ताने आयोजित उपक्रमाप्रसंगी प्राचार्य मा.डॉ.सुरेश भ.बिजवे



स्वच्छता मोहिम प्रसंगी रासेयो स्वयंसेवक



प्रा.डॉ. एल.आर.टेंभुर्णे यांच्या ग्रंथाचे विमोन करताना मान्यवर

# क्षणचित्रे



### कु. पुजा प्रदीपराव राऊत

एम.ए. भाग–२ (इतिहास)

उन्हाळी २०१८ या परीक्षेमध्ये एम.ए. (इतिहास) अभ्यासक्रमात सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावती गुणवत्ता यादीत ८ वे स्थान प्राप्त.



### मो.यासिम अ. सलाम सौदागर

एम.कॉम. भाग–१ (कलरकोट)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बेसबॉल संघात निवड.


ऑल इंडिया बेसबॉल टुर्नामेंट कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे सहभाग



### कु. दिव्या संजयराव कुमरे

बी,ए. भाग–१

राष्ट्रीय एकात्मता शिबीर (राष्ट्रीयस्तर) बरकतउल्ला विश्वविद्यालय, भोपाळ येथे सहभाग (युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, नवी दिल्ली)



### प्रतिक जगन्नाथ वहिले

बी..ए. भाग–२

राष्ट्रीय एकात्मता शिबीर (राष्ट्रीयस्तर) बरकतउल्ला विश्वविद्यालय, भोपाळ येथे सहभाग (युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, नवी दिल्ली)



### कु. स्वामिनी ज्ञानेश्वरराव वरघट

बी.ए. भाग–२

गणतंत्र दिन पथसंचालन पूर्व राज्यस्तरीय निवड शिबीर, पुणे व

प्रेरणा–२०१९

राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबीर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती येथे सहभाग

# क्षणचित्रे




### अमरदीप प्रल्हादराव अमझरे
बी.ए. भाग–२
राज्यस्तरीय साहसी शिबिर, चिखलदरा येथे सहभाग



### हरिष जगदिशराव तळोकर
बी.ए. भाग–२
प्रेरणा –२०१९, राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे सहभाग



### कु. शुभांगी गजाननराव खुजे
बी.ए. भाग–२
प्रेरणा –२०१९, राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे सहभाग



### धीरज भानुदास पोटपिटे
बी.कॉम. भाग–१
प्रेरणा –२०१९, राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे सहभाग



### प्रणय भाऊराव भगत
बी.कॉम. भाग–२
आव्हान–२०१९, राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीर
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे सहभाग



### अभिनव शरदराव मलातपुरे
बी.ए. भाग–२ (इतिहास)
राज्यस्तरीय साहसी शिबीर, चिलखलदरा, येथे सहभाग